
भुकेली रात्र
नारायण धारप


भुकेली रात्र
नारायण धारप

# भुकेली रात्र

नारायण धारप

भुकेली रात्र
कथासंग्रह
नारायण धारप
•
प्रकाशन क्रमांक - 1544
•
प्रकाशक
साकेत बाबा भांड
साकेत प्रकाशन प्रा. लि.
115, म. गांधीनगर, स्टेशन रोड
औरंगाबाद - 431 005
फोन- (0240)2332692/95.
www.saketpublication.com
info@saketpublication.com
•
पुणे कार्यालय
साकेत प्रकाशन प्रा. लि.
ऑफिस नं. 02, ‘ए’ विंग, पहिला मजला
धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, 373 शनिवार पेठ
कन्या शाळेसमोर, कागद गल्ली, पुणे -411 030
फोन- (020) 24436692

## प्रकाशकीय

नारायण धारप हे नाव आताच्या वाचन करणाऱ्या पिढीला नवीन असलं, तरीही आपल्या रहस्यमय लेखनाने त्यांनी एक काळ गाजवला होता, ही गोष्ट कधीच न विसरण्यासारखी आहे. गेल्यात शतकातील साठच्या दशकात त्यांनी लेखनाला सुरूवात केली आणि त्यानंतर अखेरपर्यंत ते सातत्याने लिहित राहिले आहेत. मराठी साहित्यात रहस्यकथेचे आणि कादंबरीचे दालन समृद्ध करणारे जे काय आहे जे काही मोजकेच स्वतंत्र लेखन करणारे लेखक आहेत, त्यांत नारायण धारपांचे स्थान अव्वल आहे.

कथानकात पुढे काय होणार याची उत्सुकता कायम ठेवत, वाचकाला आपल्या लेखनात गुंतवून ठेवणे, इतकेच नाही तर त्या वातावरणाचा एक भाग बनविण्याचे कसब ज्या काही लेखकांना साध्य झाले; त्यापैकी नारायण धारण एक आहेत, की गोष्टही आवर्जून नमूद करण्यासारखी आहे. त्यामुळेच दूरदर्शन आणि इतर प्रसारमाध्यमांची फारशी चलती नव्हती, त्या काळात सामान्य वाचक अतिशय आतुरतेने त्यांच्या लेखनाची वाट पाहत असत. वाचनालयात विशेषत: सर्क्यूलेटिंग लायब्ररीजमधून त्यांची पुस्तके वाचायला मिळविण्यासाठी वाचक रांगा लावीत असत, ही गोष्ट त्यांच्या लेखनाची वाचकप्रियता स्पष्ट करण्यास पुरेशी आहे.

माणसाला नेहमीच कोणतेही रहस्य जाणून घेणारी मुळातच उत्कंठा असते. हे समाधान वाचनातून मिळते, तितके दुसऱ्या कोणत्याही माध्यमातून मिळत नसल्यामुळे वाचनाकडे आकर्षित झालेली नवी पिढी रहस्यमय कथा, कादंबऱ्याच्या प्रतीक्षेत आहे. या वाचकांनी वाचनाची भूक भागविण्यासाठी नारायण धारप यांचे रहस्यमय साहित्य पुन्हा नव्याने प्रकाशित करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे.

नारायण धारप यांचे रहस्यमय साहित्य चांगल्या आणि दर्जेदार स्वरूपात प्रकाशित केल्यामुळे वाचकांना त्याचा अतिशय योग्य प्रकारे आणि मनासारखा आस्वाद घेता येईल, असे वाटते. नव्या स्वरूपातील या अस्सल मराठी रहस्य साहित्याचे वाचक नक्कीच स्वागत करतील, अशी खात्री आहे.

-प्रकाशक

# १. भुकेली रात्र

रात्रीची शांतता पसरताच परत एकदा समुद्राच्या आवाजाने मदनला जाग आली. लाटांची गर्जना सारी रात्र व्यापून टाकीत होती, प्रचंड लाटांचा घनगंभीर आवाज सारा अवकाश भारून टाकीत होता. मदन धावत धावत सज्जात आला. ओघळत्या चंद्रप्रकाशात कॉलनीतली घरं निष्प्राण कलेवरांसारखी उभी होती आणि त्यांच्यापलीकडे जेमतेम शंभर पावलांवरच उसळत्या लाटांची फेसाळती चंदेरी कड दिसत होती. पुढे शानवाझ कॉलनी होती. ती आधीच पाण्याखाली गेली होती. काही दुमजली घरांच्या वरच्या टोप्याभोवती, काही नारळांच्या झाडांभोवती पाणी फेसाळत होतं. पाण्याचे बारीक तुषार त्याच्यापर्यंत पोचत होते. हवेत खाऱ्या पाण्याचा उग्र-तिखट दर्प भरून राहिला होता नजर जरा पुढे गेली की, सागरावरून येणाऱ्या महाप्रचंड लाटांच्या लांबच्या लांब रेषा दिसत होत्या...

मदन सज्जातून खाली आला. समोरची बंगल्याची ओळ ओलांडून पाण्याच्या सीमेपाशी आला. गारेगार पाण्याचा पायाला स्पर्श होताच तो दचकून मागे सरला. त्याची नजर तेथूनच मागे, त्याच्या घराकडे गेली.आत खोलीत मोहना, त्याची पत्नी झोपली होती. शांतपणे; पण तिला आणखी किती रात्री अशी शांत झोप मिळणार होती? का तिला या सागराची जाणीवच असणार नाही?

मदन समोर पाहत होता. पाण्याची प्रगती कोठपर्यंत झाली आहे याचा अंदाज घेत होता. रात्री-रात्रीगणिक पाणी फुटाफुटांनी पुढे सरकत होते. खळखळत्या लाटा रिकाम्या अंगणातून पुढे सरकत होत्या. कुंपणाच्या खांबांपाशी पांढरे फेसाचे फवारे उडवीत पुढे पुढे येत होत्या... मदन किती वेळचा तरी त्या उसळत्या लाटांकडे पाहत उभा होता. छपरांतून आणि झाडांतून त्या झेपावत होत्या... रात्रीच्या वाऱ्यावरून काळया ढगांची रांगच्या रांग तरंगत चालली होती. पण ढगांची सावली पाण्यावरून सरसरत गेली तरी तिथे अंधार होत नव्हता. फेसाला अंगचाच एक निळसरसा प्रकाश होता. मदनचे पुढे आलेले हातही त्या निळसर प्रकाशात कसे तकतकीत दिसत होते...मेणाचा मुलामा दिल्यासारखे...

सरतेशेवटी सागरलाटा परत मागे मागे जायला लागल्या. एक एक रस्ता, एक एक बंगला, एक एक बाग त्यांच्याखालून सुटायला लागली. निळसर हिरव्या पाण्याची रेषा झपाट्याने मागे मागे चालली. त्याचबरोबर ती घनगंभीर गर्जनाही मागे मागे चालली. मदन त्या दिशेने धावत निघाला; पण रस्त्याचे एक वळण घेऊन तो पुढे येईपर्यंत पाण्याची चकाकती रेषा क्षितिजाच्या रेषेला जाऊन भिडलीही होती. थकून मदन काही वेळ तिथेच उभा राहिला आणि मग रखडत्या पावलांनी घरी परत आला आणि गादीवर आडवा झाला; पण उशीवर डोकं टेकवलं तरी कानात स् स् स् आवाज येतच होता. नाडीचा होता की रक्ताभिसरणाचा होता की त्या क्षणभंगुर लाटांचा होता?

"मोहना, काल परत मला समुद्र दिसला. सकाळी चहासाठी ते दोघे टेबलापाशी बसल्यावर मदन म्हणाला." मोहना काही वेळ गप्प बसून मग म्हणाली,

"तुम्हाला माहीत आहे, समुद्र इथून ऐंशी मैल तरी दूर आहे. मदनकडे पाहता पाहता एका

बोटाने तिचा केसाच्या एका बटेशी चाळा चालला होता.''
''सकाळी अंगणात पाहिलंत? काही खूण होती का त्या पाण्याची?''
''पण मोहना! मी प्रत्यक्ष डोळयांनी पाहिला म्हणून सांगतो ना?''
''मदन-''
मदन सावकाश उभा राहिला. त्याने दोन्ही हात मोहनासमोर धरले.
''मोहना, पाण्याचे तुषार माझ्या हातांवर येत होते. लाटांचं पाणी माझ्या पायाभोवती खळखळत होतं. ते काही स्वप्न नव्हतं!''
''स्वप्नातच सारं पाहिलेलं असणार तुम्ही! मोहना खिडकीकडे पाठ करून मदनकडे वळत म्हणाली. जणू काही ते त्याचं चमत्कारिक रात्रीचं जगच ती नजरेआड करण्याचा प्रयत्न करीत होती.'' ''मदन, तुम्ही पुन्हा एकदा त्या डॉक्टर भरूचांना भेटा बरं! मला आताशी तुमच्या या स्वप्नाचं भयच वाटायला लागलंय!''
मदन सावकाश खिडकीकडे वळला. समोरच्या बंगल्यावर, त्यांच्या मागच्या झाडांच्या शेंड्यांवर, त्याच्याही मागच्या देवळाच्या कळसावर त्याची नजर खिळली होती. चेहऱ्यावर एक मंदसे हास्य होते. हे बघ मोहना, या साध्या गोष्टीनं इतकं घाबरून जायचं काय कारण आहे? तशी किती साधी गोष्ट आहे. रात्री झाली की मला समुद्राच्या लाटांचा आवाज ऐकू येतो. मी बाहेर गेलो तर चंद्रप्रकाशात खळाळणाऱ्या समुद्राच्या लाटा मला दिसतात. काही वेळ मी त्यांच्याकडे पाहतो नि मग परत येऊन झोपतो. मदन बोलायचा थांबला. तेव्हा थकल्याने त्याच्या गौरवर्णी गालावर फिकटशी लाली आली होती. अजून तो त्या मधल्या दुखण्यातून पहिल्यासारखा खणखणीत बरा झाला नव्हता. गेले सहा महिने तो कामावरच जाऊ शकत नव्हता; पण मला एका गोष्टीचं नवल वाटतं. पाणी नेहमीसारखं वाटत नाही. असं चमकदार प्रकाशित वाटतं. आणि मला अशी शंका येते की त्याचा खारटपणाही जास्त असावा.
''पण मदन!'' मदनच्या शांतपणाने गोंधळून गेलेली मोहना असहायपणे इकडे तिकडे पाहत म्हणाली, ''बाहेर खरा समुद्र नाही आहे, तो केवळ तुम्हाला एकट्यालाच दिसतो, इतर कोणाला दिसत नाही, जाणवत नाही हे नाही का तुमच्या ध्यानात येत?''
एवढ्यात नसेल, पण काही दिवसांनी त्यांनाही दिसायला लागेल.
मदन त्याच शांत आवाजात म्हणाला. स्वत:शी गुणगुणत तो बाहेर आला आणि वळून परत त्याच्या सिटिंगरूममध्ये गेला. आजारपणात दुपारच्या विश्रांतीसाठी याच खोलीत त्याने दिवाण टाकला होता. शेजारीच एक लहानसं टेबल होतं, एक पुस्तकांचं बसकं कपाट होतं. आता मदन दिवाणावर बसला आणि टीपॉयवरचा मोठा शंख त्याने हातात घेतला. आजारपणात जेव्हा त्याला हलायचं नव्हतं, वाचूनही डोळयांना शीण यायचा तेव्हा तो हाच शंख हातात घेऊन त्याच्याकडे तासनतास पाहात वेळ घालवायचा. शंखाच्या दातेरी कुंतलाकार वक्र रेषांवरून नजर सरकत सरकत अनंतातच जायची... महाप्राचीन सागरात, लक्षावधी वर्षांपूर्वी हा शंख निर्माण झाला होता. हे प्रदीर्घ, अकल्पनीय प्राचीनत्व शंखाच्या वक्राकार रेषांत गोठल्यासारखे वाटे. हा शंख म्हणजे कालकुपीच होती जणू काही. त्यात एक अपरिचित, अज्ञात, अतिप्राचीन विश्व साठवलं होतं... सवयीने त्याने शंख कानाला

लावताच आतली ती ह म् म् म् ची प्राचीन गर्जना घुमायला लागली... मदनचे हात कंगोऱ्यांच्या वलयांवरून फिरत होते. ब्रेल लिपी अशीच असते, तो मनाशी म्हणत होता. पण ब्रेल वाचायला काय आंधळंच व्हायची जरूरी आहे का? हा लक्ष लक्ष वर्षांचा इतिहास तर या शंखावरच्या दातेरी रेषाजालांत सांकेतिक भाषेत लिहिलेला नाही ना? की त्यावरून बोटं फिरताच मनातली एखादी गुप्त कळ फिरवली जावी आणि त्या गुहाद्वारातून तो अतिप्राचीन सागर उसळत, धो धो करीत त्याच्या मन:पटलावर यावा?

मोहना खोलीत आली आणि मदनपाशी येऊन बसली.

‘मदन, माझं एक ऐकाल का?’

‘काय?’

‘आज रात्री तुम्हाला लाटांचा आवाज ऐकू आला की मला जागी करा. आपण दोघंही बाहेर जाऊन पाहू. अं?’

तिच्या खांद्यावर हलकेच हात ठेवीत मदन म्हणाला, ‘मोहना, तुला तो समुद्र दिसला, न दिसला तरी त्याला काय महत्त्व आहे? महत्त्वाची गोष्ट ही आहे की तो मला स्वत:ला दिसतो.’

जराशी उन्हं वर आल्यावर मदन गळ्याभोवती मफलर गुंडाळून बाहेर पडला. याच वाटेने तो कालच्या चांदण्या रात्रीही गेला होता; पण तेव्हा सागराच्या उसळत्या, फेसाळल्या लाटा पाहत उभा होता; आता बंगल्याची द्वारे उघडली होती, मालक झाडांना पाणी देत होते, बायका दोऱ्यांवरून धुणी वाळत घालत होत्या, मुलं खेळत होती, भांडत होती. पाण्याचा तर मागमूस नव्हताच; पण गवत आणि झाडं तीनचार महिन्याच्या कोरड्या उन्हाने सुकून गेली होती. रस्त्याच्या कडेने धुळीचा बारीक थर साचला होता. हीच धूळ वाहनांनी, वाऱ्याने उडून झाडाच्या पानांवरून पसरली होती.

रस्ता सुमारे फर्लांगभर सरळ गेला होता आणि देवळाच्या चौकाला जाऊन मिळत होता. डोळ्यांवर हाताची झापड करून मदनने देवळाच्या कळसाकडे नजर वळवली. सनल्याच्या संताच्या मूर्तीपर्यंत लाटा पोचलेल्या दिसल्या होत्या. इतकं सर्व स्पष्ट दिसल्यावर त्या दृश्याला स्वप्न तरी कसं म्हणायचं!

चौक ओलांडला की रस्त्याला उतार लागत होता. तिथे चौकात उभं राहून पुढच्या उतरत्या रस्त्याकडे पाहता पाहता मदनच्या मनात असा एक चमत्कारिक विचार आला की खरोखर काही कारणाने इथे महापूर आलाच तर येथवर खरोखरच खोल पाणी येईल. हा मोठा खळगा किंवा खाच जवळजवळ मैलभर पसरली होती. चारपाच रस्ते ओलांडले की एक लहानशी टेकडी लागत होती, त्या टेकडीच्या पायथ्यापर्यंत ही सखल जागा होती आणि आता मदनला आठवलं की रात्री त्या लाटांच्या कल्लोळातून आपल्याला ती बोडकी टेकडी एखाद्या किल्ल्यासारखी वर आलेली दिसली होती, खालच्या खडकावर खोल समुद्राच्या मोठमोठ्या लाटा आपटत होत्या, त्या आघाताने जल कणांचा प्रचंड नागफणा हवेत वर वर चढत गेला होता आणि मग घडी पडून खाली येत होता.मागे मागे जाणाऱ्या पाण्यावर पसरत होता. किती स्पष्ट आठवण! फरक असलाच तर तो एवढाच होता की रात्री टेकडी जरा जास्त उंच व कराल दिसली होती. जणू काही लक्षावधी वर्षांच्या जलाघाताने तिला

अजून मऊसर, मुलायम आकार आला नव्हता. घडवला गेला नव्हता मदनला वाटलं, एखाद्या रात्री त्या टेकडीवरच जाऊन झोपावं. मग सागर लाटा धडकायला लागल्या, तुषारांचा वर्षाव सुरू झाला की त्याला आपोआप जाग येईल.

रस्त्यावरून रहदारी सुरू झाली होती. स्कूटरवरचे, वाहनातले लोक आपल्याकडे जरा नवलाने पाहत आहेत याची मदनला कल्पना होती. आधीच कॉलनीत मदनची जरा विक्षिप्त अशी ख्याती होती. त्यात आणखी भर नको असा विचार करून मदन जागचा हलला. आजूबाजूच्या घराबागांकडे त्याचं लक्ष होतं- पण पाण्याखाली बुडाल्याची कोठेही एवढीशीही खूण नव्हती.

तसं पाहिलं तर गेल्या वीस-पंचवीस दिवसांतच मदनला रात्रीचा हा सागराचा देखावा दिसायला लागला होता; पण पहिल्या क्षणापासूनच त्याच्या मनात या समुद्राच्या खरेपणाबद्दलची एक पक्की खात्री होती. रात्रीतून हा अवचितपणे घोंगावत येणारा खवळता सागर एकदा मागे मागे गेला की मागे आपली काहीही निशाणी ठेवत नाही हे तर मदन प्रत्यक्षच पाहत होता. वास्तविक ती सर्व शेकडो घरं खोली पाण्याखाली बुडत होती. त्यांच्यातले लोक बुडून गतप्राण व्हायला हवे होते. पण ते या जलावरणाखाली निश्चितपणे झोपत होते हेही त्याला दिसत होतं. कदाचित म्हणूनही असेल; पण त्याला या शेकडो लोकांबद्दल कसलीही चिंता वाटत नव्हती. ही विसंगती समोर दिसत असूनही समुद्राची सत्यता त्याने संपूर्णपणे स्वीकारली होती. इतकी की, एका सकाळी अभावितपणेच तो मोहनाला म्हणाला होता- ‘काल रात्री अगदी जवळून मला लाटांचा आवाज ऐकू आला...अन् बाहेर जाऊन पाहतो तो एकदोन फर्लांगावर सागराची घुसळती सीमा होती.’ सुरुवातीस मोहना नुसतीच हसली होती. तिला तो त्याचा भ्रम वाटला असेल, स्वप्न वाटलं असेल किंवा त्या आजाराचा सूक्ष्म अवशेष वाटला असेल. पण मग तीनचार दिवसांनी रात्रीची कसल्या तरी आवाजाने ती जागी झाली आणि समोर पाहते तो मदन, धापा टाकणारा, घामाने डवरलेल्या चेहऱ्याचा; त्याच्या डोळ्यातली ती विलक्षण तकाकी तिला मुळीच आवडली नाही आणि मग तिच्या नकळत तीही जरासा रिकामा वेळ मिळाला की कानोसा घेऊ लागली, सागराचा आवाज कानावर येतो का याचा अंदाज घ्यायला लागली, कारण तिला खरी अस्वस्थता मदनच्या वागण्यानेच आली होती. समजा, सर्व काही त्याचे भ्रम असले, तरीही त्याच्या जगाच्या प्रलयकालाचा हा क्षण, सर्व स्वाहाकारी सागराचं हे भयानक आक्रमण. हे सर्व मदन इतक्या शांतपणे, इतक्या स्थितप्रज्ञतेने का स्वीकारीत होता?

देवळाची मागची बाजू अजून डेव्हलप व्हायची होती. देवळाच्या मागच्या वरवंडीवर संध्याकाळचे अनेक लोक येऊन बसत असत. मात्र आता सकाळच्या वेळी तिथे कोणी नव्हतं. त्या वरवंडीवरच चालून चालून थकलेला मदन आता बसला. पायाखाली पांढरट रंगाची वाळू होती. एका काटकीने वाळूत रेघोट्या काढता काढता त्याला वाटलं, ही वाळू-रेतीही इथे अशी लक्षावधी वर्षे आहे. घरातल्या शंखातून जो एक अतिप्राचीन कालाचा गुंजारव निघत होता. त्याचाच काहीसा अनुवाद या रेतीतूनही जाणवत होता. मनातली एक अस्वस्थ अगम्य तार छेडण्याची शक्ती या साध्या पांढऱ्या रेतीतही होती.

समोरच जमीन उतरत गेली होती. पुढे हिरवी शेतं होती आणि त्या शेतातूनच अर्धवट आवरण घेतलेली ती पांढरी टेकडी सरळ वर आली होती. निळसर आकाशाविरुद्ध कोरली गेली होती आणि आता मदनला प्रथमच दिसलं की, टेकडीच्या उतारावर एक शेड उभारण्यात आली होती आणि तिथे आसपास ( अगदी अंगठ्याएवढ्या दिसणाऱ्या ) काही माणसांची काहीतरी हालचाल चालली होती. टेकडीवर एक जुनी, पडीक अशी कसली तरी खाण आहे एवढंच मदनला माहीत होतं. तिथे आता हे लोक काय करीत असावेत याचा मात्र त्याला काहीही अंदाज करता येत नव्हता. सारा दिवसभर त्याच्या नजरेसमोर तेच ते टेकडीच्या खांद्यावरच्या सूक्ष्म माणसांच्या हालचालीचं चित्रच येत होतं. काही काल तर त्याला रात्रीतून येणाऱ्या सागराचाही विसर पडला होता.

तसा तो विचार मनाच्या पार्श्वभूमीवर सतत असायचा. एकच आशा त्याला त्या महाभयानक आपत्तीविरुद्धही धीर देत होती. त्याची खात्री होती की आज ना उद्या, केव्हातरी इतरांना सर्वांनाच हा रात्रीतून सळसळत येणारा समुद्र जाणवायला लागेल, दिसायला लागेल

रात्री तो झोपायला खोलीत आला तर कॉटशेजारच्या एका आराम खुर्चीत मोहना ठाण मांडून बसलेली. तिचा चेहरा मोठा निश्चयी दिसत होता.

‘मोहना! आज काय विचार आहे तुझा?’

‘मी रात्रीची जागी राहणार आहे. आज मी वाट पाहायचं ठरवलं आहे.’

‘पण कशाची?’

‘तुमच्या त्या समुद्राची! पण तुम्ही काळजी करू नका, माझ्याकडे लक्षही देऊ नका. दिवा मालवून मी अशीच बसून राहणार-’

‘मोहना! काही क्षण मदनला शब्दच सुचेनात. एवढा सर्व उपद्व्याप करून तू काय साधणार आहेस?’

‘ते सांगायला हवं का?’

मदन कॉटवर बसला. त्याला मोहनाची काळजी वाटत नव्हती; पण असं मात्र वाटत होतं की तिचा या प्रकरणात शक्य तितका कमी संबंध यावा.

‘हे बघ, मोहना, असं कशावरून की मला समुद्र अगदी खऱ्या, शब्दश: अर्थाने दिसतो? तो भ्रम, भास, स्वप्नातला देखावा नसेल कशावरून?’

‘नाही.’ शांतपणे मान हलवीत मोहना म्हणाली, ‘मला तसं वाटत नाही; पण तरीही खरा प्रकार काय आहे तो मला जाणून घ्यायचाय.’

मदन कॉटवर आडवा होता होता म्हणाला, करते आहेस ते बरोबर आहे याची खात्री तुला खात्री वाटते ना? हा मार्ग जर चुकीचा निघाला तर.

पण मदन! मोहना पुढे वाकत म्हणाली, तुम्ही सर्व काही किती शांतपणे स्वीकारता आहात! त्याचीच तर मला खरी भीती वाटते! तुम्ही भयभीत झाला असतात, गर्भगळीत झाला असतात तर मला असली काळजी वाटली नसती.

मदन काही बोलला नाही. बोलण्यासारखं काही राहिलंच नव्हतं. तसा निजल्यानिजल्याच

तो अंधारलेल्या खोलीतल्या त्याच्याकडे पाहणाऱ्या मोहनाच्या पांढुरक्या चेहऱ्याकडे पाहत होता आणि पाहता पाहता गुंगत होता.

लाटा खळाळत होत्या. दूरवरून येणारा फेसाळ तुषारांचा स् स् स् आवाज मदनला झोपेच्या अमलाखालून खेचून काढत होता. डोळे उघडताच दूरवरच्या प्रचंड लाटांचा गंभीर आवाज त्याच्या कानात घुमत होता. मदन कॉटवरून उतरला, भराभरा कपडे चढवायला लागला. पाणी जास्त वेळ टिकणार नव्हतं. ते माघारी फिरण्यापूर्वीच त्याला पोचायला हवं होतं. खोलीबाहेर पडता पडता त्याची नजर मोहनाकडे गेली. तिला आरामखुर्चीतच गाढ झोप लागली होती. तिच्या निद्रिस्त चेहऱ्यावरून लाटांनी परावर्तीत केलेल्या चंद्रप्रकाशाच्या मंदतीक्र लहरी एकामागून एक अशा जात होत्या.

मदन घराबाहेर आला. रस्त्याचा पृष्ठभाग ओला झाला होता, चंद्रप्रकाशात तकाकत होता; मदन अनवाणी पावलांनीच पाण्याच्या सीमारेषेपाशी आला. ह् श् श् श् श् आवाज करीत एक लाट पायावर आदळली. पाणी गार होतं, निळसर प्रकाशाने लवलवत होतं. मदन गुडघ्यावर बसला. पाण्याची दुसरी लाट त्याच्या छातीपर्यंत आली. फेसाळता पृष्ठभाग डोळयांच्या अगदी जवळ आला. पाण्यात तरंगणारे असंख्य अतिसूक्ष्म जीव त्याला क्षणमात्र दिसले. आणि मग पाणी परत झपाट्याने मागे गेलं. मागे मागे.

ओले कपडे सर्वांगाला चिकटले होते. तसाच बसून मदनने नजर त्या खळाळत्या लाटांवरून दूरवर फिरवली. चंद्रप्रकाशात न्हालेली घरं पाणी कापणाऱ्या नौकांसारखी दिसत होती. काही एव्हाना पार पाण्याखाली गेली होती. देवळाचा अर्धा कळसही पाण्याखाली गेला होता आणि अजून पाणी ओसरण्याची चिन्हं दिसत नव्हती. लाटांचे तुषार एव्हाना मदनच्या घरापर्यंत पोचायला लागले होते.

लाटांचा जोर जरासा कमी होण्यासाठी मदन कडेवरच थांबला होता. ती संधी मिळताच तो टेकडीच्या वाटेने निघाला. पाणी एव्हाना समोरच्या बंगल्यांच्या जोत्यांपर्यंत पोचलं होतं. कुंपण, फुलझाडं आणि अंगण केव्हाच बुडाली होती.

टेकडीपासून तीन एक फर्लांगावर पोचल्यावर मदनला खऱ्या खोल पाण्याचा गर्जणारा आवाज जाणवायला लागला. पाण्यातून चालल्याने तो विलक्षण थकला होता. दम घेण्यासाठी तो तिथल्याच एका खांबाला टेकून उभा राहिला. पाण्याच्या फेसाळ लाटा गुडघ्यापर्यंत पोचत होत्या. परत जाणारी प्रत्येक लाट त्याला आपल्याबरोबर खेचून नेऊ पाहत होती. खांब घट्ट धरून त्याने टेकडीकडे नजर टाकली.

त्याच क्षणी त्याला ती स्त्रीची आकृती दिसली. ढगांचं आवरण जरा दूर झालं होतं, चंद्रप्रकाश खाली ओघळला होता आणि मदनला ती आकृती दिसली होती. उंच, काळ्या कपड्यातली स्त्री, वाऱ्याने केस मागे भुरभुरत होते, अंगावरचं वस्त्र मागे फडफडत होतं. टेकडीच्या टोकाला, उभ्याच्या उभ्या कड्याच्या काठावर एक दगडी वरवंड होती, त्या वरवंडीवर ती स्त्री उभी होती आणि तिच्या पायाशी, पण खोलवर, चकाकत्या उसळत्या लाटांचा कल्लोळ चालला होता.

मदनला अशी तीक्र इच्छा झाली की त्या स्त्रीपाशी आपण जाऊन पोचलंच पाहिजे. तो टेकडीच्या दिशेने पळत पळत निघाला. रस्ता वळणे घेत होता, घरं मध्ये येत होती आणि

ती स्त्री दृष्टीआड जात होती. मध्येच एकदा त्याला त्या स्त्रीची उभीच्या उभी, पांढऱ्या शुभ्र चेहऱ्याची काळी छायाकृती तुषारांच्या पडद्यातून स्पष्ट दिसली. पाण्याचा जोर ओसरला, पाणी माघारी वळलं. घरं सावकाश वर यायला लागली. सागर मागे मागे...चालला होता. त्याच्या बरोबरच तकाकते तुषार, खळबळाट आणि हालचाल जणू काही रात्रीतली चेतनाच मागे मागे खेचली जात होती.

शेवटचा बुडबुडा फुटला, सागराची अस्पष्टशी सीमारेषा दूरवरच्या क्षितिजामागे गेली...मदनची नजर टेकडीचा माथा शोधत होती, पण ती मघाची रहस्यमय आकृती कोठेच दिसत नव्हती. मदन माघारी फिरला. रस्ते रिकामे होते. खाऱ्या पाण्याचा शेवटचा उग्रखारट दर्प वाऱ्याबरोबर वाहून नेला जात होता. चालता चालता मदनचेही कपडे आपोआप वाळत होते.

"मोहना, मला वाटतं एकूण सगळा काही तरी भासाचाच प्रकार होता. स्वप्नही असेल. काय असेल ते असो, आता ते संपलेलं दिसतंय. मला निदान काल रात्री तरी काहीही दिसलं नाही." सकाळी मदन म्हणाला.

"देवाचीच कृपा म्हणायची. पण तुमची खात्री आहे ना, मदन?"

"मग? त्याशिवाय का बोलतोय? मदन हसत म्हणाला, कदाचित रात्री तू माझ्यावर पहारा ठेवून होतीस त्याचाही परिणाम असेल हा!"

"मग आजची रात्रही मी तसेच लक्ष ठेवणार आहे." मदन काही बोलणार तोच हात वर करून मोहनाने त्याला गप्प केलं, काहीही सांगू नका, मी ठरवलंय ते ठरवलंय. मला काल रात्रीच्या जागरणाचा काहीही त्रास झालेला नाही. आता पक्कं ठरवलंय की याचा एकदा कायमचाच निकाल लावून टाकायचा. मोहना बोलायची थांबली. बशीत कप गोलगोल फिरवताना तिच्या कपाळावर एक बारीकशी आठी उमटली होती. कसं नुसतं ऐकल्याने मन बिथरतं पाहा. मलासुद्धा रात्री एकदोनदा भास झाला की समुद्राचा आवाज कानावर येतोय; पण आवाज ठाम नव्हता. थकल्यागत, आंधळ्यासारखा वाटत होता. लक्षावधी वर्षांच्या दीर्घ निद्रेनंतर एखादं काही तरी जागं झाल्यावर कसं धडपड करील. तसंच वाटत होतं-

सकाळी मदन जो बाहेर पडला तो तडक त्या टेकडीच्या रोखानेच निघाला. रात्रीचा तो देखावा त्याच्या मन:पटलावर इतका ठाम उमटला होता की आपली चूक होणार नाही ही त्याची खात्री होती. टेकडी चढता चढता वाटेत त्याला ती शेड लागली. कालच्यासारखीच तिथे आजही काही तरी हालचाल चाललीच होती. टेकडीचा माथा रिकामा होता. खालून त्याला काल रात्री जी एक वरवंडी वाटली होती ती नैसर्गिकरीत्याच सरळ रेषेत झिजलेला एक कातळ होता. तिथे मदनला ती स्त्री दिसली होती. बरोबर त्याच ठिकाणी उभा राहून त्याने खाली पाहिलं.

आता खालचं गवत वीस-पंचवीस फुटांपेक्षा जास्त खोल वाटत नव्हतं. पण काल रात्री त्याला हाच कडा खूपच उंच वाटला होता. केवळ खालून पाहत होता म्हणून एवढा फरक खासच पडणार नाही. ही जमिनीची भर मागाहून पडली होती. तो प्राचीन सागर कड्याच्या पायथ्याशी होता तेव्हा उंची खूपच असली पाहिजे. ती स्त्री कोण होती?

मध्यरात्रीची इथे कशाला आली होती? आपल्यासारखीच तिचीही नजर अशी लक्षावधी वर्षं मागे पोचत होती का? मनाशी विचार करीत करीत मदन माघारी वळला. वाटेत त्या शेडपाशी थांबला.

गेल्या काही दिवसांत तो स्वत:च्याच या चमत्कारिक समस्येत इतका गुरफटला होता की आसपासच्या जगाचा त्याला विसरच पडला होता. इथे या पडीक दुर्लक्षित खाणीपाशी या लोकांचा काय उद्योग चालला आहे हेही त्याला माहीत नव्हतं. आता तो थांबून पाहू लागला तेव्हा त्याला दिसलं की खाणीच्या मूळच्या तोंडावरच एक वाश्यांचा तिवाडा उभारण्यात आला होता; मध्ये एक चाक होतं, चाकावरून दोरी खाली गेली होती. आता जेव्हा वरच्या लोकांनी दोरी खेचली तेव्हा आतून सावकाश सावकाश एक लाकडी प्लॅटफॉर्म वर आला. प्लॅटफॉर्मवर दोरीच्या आधाराने एक गृहस्थ उभे होते. खाणीच्या तोंडाशी प्लॅटफॉर्म येताच त्यांनी बाहेर पाय ठेवला. प्लॅटफॉर्म परत खाली गेला. हातांना लागलेली व पँटच्या गुडघ्यावरची माती झटकत झटकत ते गृहस्थ मदनपाशी येऊन उभे राहिले.

''मला जरा माफ करा हं- पण हे काय, काय चाललं आहे ते मला कृपा करून सांगाल का?'' ती खाण पुन्हा वापरात आणणार आहात का?

''नाही-नाही-'' ते गृहस्थ जरा हसत म्हणाले. युनिव्हर्सिटीतर्फे एक रिसर्च कँप चालविण्यात येत आहे. एक पॅलेंटालॉजिस्ट आहे, एक जिऑलॉजिस्ट आहे, दोघं आर्किऑलॉजिस्ट आहेत. शेवटच्या वर्षातले काही विद्यार्थीही आले आहेत. सहायक म्हणून.

''पण हीच नेमकी जागा कशी निवडलीत?''

''आम्ही आळशी पडलो ना! अहो, खणायचं काम काय सोपं असतं का? स्ट्रॅटिफिकेशनचा अभ्यास करायचा म्हणजे खणणं आलंच की! मग कोणीतरी सुचवलं की इथे चांगला दीडशे फुटांचा शाफ्ट आयताच तयार आहे. पण मिस्टर! ती फार लकी गोष्ट ठरली बरं का! शोधूनही सापडल्या नसत्या अशा काही गोष्टी इथे पाहायला मिळाल्या. आहे का दोन मिनिटं वेळ? या जरा इकडे म्हणजे दाखवतो.''

स्वत:च प्रश्न विचारलेला असल्याने मदनला त्यांच्या बोलावण्याला नकारही देता येईना, तेव्हा नाईलाजाने तो त्या गृहस्थांमागोमाग शेडमध्ये गेला. एका कोपऱ्यात टारपॉलीनखाली काहीतरी झाकून ठेवलेलं होतं. त्या टारपॉलीनला हात घालता घालता ते गृहस्थ म्हणाले,''अगदी अनपेक्षितपणे आम्हाला एक अस्थींचा थर सापडला आहे. जबड्यांच्या आणि कवट्यांच्या रेषांवरून आमचे पॅलेन्टॉलॉजिस्ट तर्क करतात की हे क्रोमॅग्नॉन वंशातले लोक असावेत.''

टारपॉलीन वर गेलं. पांढऱ्याशुभ्र अस्थी खालच्या मातीवर पसरल्या होत्या. त्यांच्यातले काही काही तुकडे जुळवून कोणीतरी एक अर्धवट मानवी आकार तयार केला होता. त्या आकाराकडे पाहता पाहता मदनच्या डोक्यात एकदम कलकल सुरू झाली. क्वचित वेळी नजर साफ नसली की एकीच्या जागी दोन वस्तू दिसतात. आणि मग एकदम दोन्ही प्रतिमा एकत्र येतात व मेंदूला दृश्याचा अर्थबोध होतो. मदनसाठी तोही असाच एक अभिज्ञानाचा क्षण होता.

रात्री उलटत होत्या. खसखसता, तकाकता चंदेरी सागर फुटाफुटाने मदनच्या घराच्या जवळ जवळ येत होता. दररोज रात्री मदन जागा होत होता, शेजारच्या निद्रिस्त मोहनाला न उठवता अलगद घराबाहेर पडत होता. त्या उसळत्या, फेसाळत्या लाटांतून टेकडीच्या दिशेने जात होता. रोज रात्री कड्याच्या टोकावर त्याला ती मुक्त केसांची, फडफडत्या वस्त्रातली स्त्री दिसत होती. कड्याच्या टोकावर उभी राहून ती पायाखालच्या खोलवरच्या पाण्याकडे पाहात असायची.
पण मदनने कितीही आटापिटा केला तरी हा रात्रसागर माघारी फिरण्यापूर्वी तो काही त्या स्त्रीजवळ पोचू शकत नव्हता. मध्येच केव्हातरी लाटांचा जोर ओसरायचा, पाणी पाहता पाहता मागे फिरायचे, जिथे लाटा होत्या तिथे आधी नुसता फेस, मग नुसते बुडबुडे, मग काहीही नाही. मदन थकून त्या ओलसर, पाहता पाहता कोरड्या होणाऱ्या रस्त्यावर बसकण मारायचा. असाच तो एका खांबाच्या आधाराने थकून टेकलेला असताना गस्ती पोलिसांना दिसला होता.
आणि असाच एकदा तो परत आल्यावर त्याला बाहेरचा दरवाजा आपण मागे लावून घेतला नव्हता असं दिसलं होतं आणि चहाच्या वेळी मोहना त्याच्याकडे पुन्हा पुन्हा पाहत होती. तिला दिसलं की विश्रांतीने मदनमध्ये काही सुधारणा तर नाहीच, उलट तो जास्तच खंगला होता. डोळयांभोवती खोल काळी वर्तुळं आली होती. गाल चोपल्यासारखे आत गेले होते. गळयापाशी मोठा खळगा पडला होता.
"मदन, तुम्हाला तो रात्रीच्या स्वप्नाचा त्रास तर होत नाहीय् ना? आताशी तुमचा चेहरा किती ओढल्यासारखा दिसायला लागलाय् !"
मान नकारार्थी हलवीत, चेहऱ्यावर उसने हास्य आणीत मदन म्हणाला,
छे ग! आता काही त्रास नाही. कदाचित या सकाळसंध्याकाळच्या रपेटींनी वाजवीपेक्षा जास्त चालणं होऊन थकवा येत असेल-
टेबलावर कोपरं टेकवून वरती त्याने हात एकमेकात गुंतवले होते. आता मोहनाचं लक्ष त्याच्या हाताकडे गेलं. एकदम पुढे वाकून तिने त्याचा हात हातात घेतला. दोन्ही हातांवर, पंज्यावर व मागेही, कितीतरी ओरखडे होते. काहीकाहीवर तर अजूनही साकळलेल्या रक्ताची लाल काळी रेषा होती.
हे काय हो मदन? मोहना विचारत होती. रात्रीच्या त्याच्या वाऱ्या! पाण्यातून खांबाचा, कुंपणाचा आधार घेत त्या टेकडीकडे जायची केलेली धडपड! त्याने मोहनाला काहीतरी स्पष्टीकरण देऊन वेळ मारून नेली.
चहा झाल्यावर तो व्हरांड्यात आला. सूऱ्याची उन्हं एकेक जागा टिपून सोन्याने मढवीत होती. एक क्षणभर मदन तो स्वप्नसागर विसरला. हे रोजचं जग किती सुंदर आहे! त्याला विलक्षण आर्त जाणीव झाली. आता हे जग त्याच्या हातातून रेतीसारखं निसटून जायला लागल्यावर त्याला त्याचं आकर्षण जाणवायला लागलं होतं! एक क्षणभर विलक्षण आवेगाने त्याने व्हरांड्याची जाळी दोन्ही हातांनी घट्ट धरली. आणि मग एक दीर्घ नि:श्वास सोडून हात खाली घेतले.
व्हरांड्यातून तो आला, दिवाणावर बसला. त्याचा हात सवयीने त्या मोठ्या शंखाकडे

गेला; पण त्याने हात एकदम मागे घेतला. हा शंख कोठून आला? कोणत्या प्राचीन सागराचं पाणी त्याच्या वलयातून वाहिलेलं आहे? कोणत्या अतिप्राचीन सागरात याची कणाकणाने निर्मिती झाली आहे? हा कानाला लावला की कोणत्या प्राचीन सागराची गर्जना कानात घुमायला लागते? पुराणात वर्णन केलेल्या जादूच्या, भारलेल्या शंखासारखा तर हा नाही ना? की याच्या दंतेरी कुंतलाकार वक्र रेषांवरून बोटं फिरायला लागली की काल सहस्रकांनी ओलांडला जावा? आणि एक प्राचीन, नवजात, कह्यरी जग नजरेपुढे उलगडावं?

आजवरच्या सर्व आठवणी एकत्र आल्या आणि एक चित्र साकार झालं. का आणि कसं त्याला माहीत नव्हतं; पण रात्री त्याचा एका अतिप्राचीन कालखंडात प्रवेश होत होता. शरीरातील असंख्य पेशींवर कोरली गेलेली ही एखादी आठवण होती? हा एखादा पूर्वानुभव होता? का त्या भारलेल्या शंखाने उभी केलेली मायावी सृष्टी होती?

मायावी तर खरीच, पण ( निदान त्याच्यासाठी तरी ) एका अर्थाने अगदी सत्य. त्याला त्या स्वप्नसागराचे तुषार जाणवत होते, त्याला तो खारट, गार वारा जाणवत होता. त्याची खात्री होती की त्या सागरात त्याला बुडवण्याचीही शक्ती होती. पण हे सर्व त्याच्यासाठी खरं असेल तर मग ती कड्याच्या काठावरची स्त्रीही खरीच असणार! पण ती होती तरी कोण? त्याला ती का दिसत होती? रोज दिसणारा देखावा ही पुनरावृत्ती होती का त्यात काही बदल होत होता? आणि घटना एखाद्या क्लायमॅक्सकडे चालल्या होत्या? आणि तो क्लायमॅक्स काय होता? त्याची व त्या स्त्रीची भेट? का ही भेटही पूर्वी, फार फार पूर्वी झाली होती, हीही एक आठवणच होती आणि तो आता परत एकदा त्या अनुभवातून जात होता?

पण हा विचार करता करता मदनच्या डोळ्यासमोरचं रोजचं जग धूसर झालं होतं. डोळ्यांसमोर चांदण्यातल्या तुषारांचा मोहक पिसारा उलगडला होता. आणि त्या पिसाऱ्यातून कड्यावरची स्त्री त्याला अंधुकशी दिसत होती. ती त्याला बोलावीत होती का?

आणि सरतेशेवटी सागरलाटा त्याच्या बंगल्याला येऊन स्पर्शल्या होत्या. व्हरांड्यात उभा राहून मदनने आपली स्तिमित नजर क्षणभर त्या चमचमत्या, खळाळत्या, उसळत्या, फेसाळत्या विशाल जलपृष्ठावरून फिरवली. कदाचित आजचीच नियतीची रात्र होती?

त्याच्यासाठी तरी असणार होती. क्षणमात्र त्याला मोहनाची आठवण आली. घरावरून पाणी गेल्यावर उद्या सकाळी काय? इतरांसारखीच तीही त्यातून सुखरूपपणे बाहेर येईल? का घरातल्या शंखाचा प्रभाव तिच्यावरही पडला होता? ( तीही एकदा म्हणाली होती, ‘मला लाटांचा अस्पष्टसा आवाज ऐकू आला!’ ) काही झालं तरी त्याच्यात व तिच्यात ही पाण्याची भिंत उभी राहणार होती. काहीतरी बदललेलं असेल. कायमचं.

पाणी गुडघ्यापाशी आलं, कमरेपाशी आलं, एखादी लाट छातीपर्यंतही पोचत होती. थंडीसाठी घातलेला स्वेटर आता अवजड होऊ लागला होता आणि या घुसळत्या कोमटसर पाण्यात त्याची आवश्यकताही नव्हती. मदनने अंगातला स्वेटर काढून पाण्यात फेकून

दिला आणि आणखी खोल पाण्यात प्रवेश केला.
पायाखालचा आधार निसटला तर तो पोहत होता, नाहीतर पाण्यातून चालत होता; पण त्याची नजर सर्वकाळ त्या कड्यावर होती. कड्याभोवती तर आता तुषारांचं सतत वादळ चाललं होतं. कड्यावरची कृष्णवस्त्रातली स्त्री मधूनमधून संपूर्ण अदृश्य होत होती. आता मदन तिकडे चालला होता.
पाण्यात चमकते कण होते. एकपेशी व्होल्व्हा असतील किंवा नवजात अल्गी असतील. ते एक प्रकारच्या अंतस्थ निळसर प्रकाशाने लवलवत होते. तुषाराचे खारट कण डोळयात जात होते, डोळे चुरचुरत होते; पण पाऊल पाऊल करीत शेवटी तो टेकडीच्या पायथ्याशी एकदाचा पोचला आणि थकून तिथेच विश्रांतीसाठी बसला.
कड्याच्या कंगोऱ्यातून जाणारा वारा, दूरवरून सरसरत येणाऱ्या लाटा, अवकाशात उधळलेला तुषारांचा फवारा. प्रत्येकाला स्वत:चा एक सूर होता. सर्वांची मिळून एक लय झाली होती. या हालचालीच्या आणि या रुद्रसंगीताच्या पार्श्वभूमीवर ती स्त्री कड्याच्या काठावर उभी होती. त्याच लयीच्या धुंदीत मदन ते ओले, निसरडे कातळ झराझरा चढून वर गेला. हा सर्व देखावा दृष्टीआड होण्यापूर्वी त्या स्त्रीजवळ पोचायचं या एकमेव विचाराने त्याचं मन संपूर्णपणे व्यापलं होतं.
तो माथ्यावर पोचला. वाऱ्यावर उडणाऱ्या केसांनी आणि फडफडणाऱ्या कृष्णवस्त्राने तिचा चेहरा आच्छादला गेला होता. ती आपल्यापासून दूर जात आहेस मदनला वाटलं. ओरडून तिला थांबायला सांगायची त्याची धडपड होती; पण श्वास छातीत रुकला होता. दमछाट झाली होती. श्वास घेण्यासाठी तरी त्याला थांबावंच लागलं. त्या क्षणापुरत्या सर्व चित्तवृत्ती स्तब्ध झाल्या होत्या. टॉरपॅडोच्या गर्भातल्या शांततेसारखा एक क्षण. अमूल्य सुवर्णाचा परत न येणारा.
ती स्त्री कोण होती? तो इथे कशासाठी आला होता? तो स्वत:ला या स्वप्न-जगतात का गुंतवून घेत होता? ती स्त्री तरी खरी होती का त्याच्याच पराभूत, दुखावलेल्या मनाने उभं केलेलं एक प्रतीक होतं?.
मग वादळ घोंगावत आलं, त्या शांत क्षणाचा चक्काचूर झाला.
ती स्त्री हलत होती, त्याच्यापासून दूर दूर जात होती.
थांब! जाऊ नकोस. थांब! मदन ओरडला; पण त्याची आरोळी वाऱ्याने हिसकावून घेतली, दशदिशांना भिरकावून दिली.
मदन धावत धावत पुढे निघाला. थांब! तो पुन्हा एकदा ओरडला.
त्या कोलाहलातूनही ती हाक तिच्यापर्यंत पोचलेली दिसत होती, कारण ती थांबली आणि सावकाश सावकाश स्वत:भोवती फिरली. काळे केस चेहऱ्याभोवती गोल गोल फिरले आणि मग चेहऱ्याच्या दोन्ही बाजूंनी खाली आले. जो चेहरा पाहण्यासाठी मदन वादळ वाऱ्यातून इथपर्यंत आला होता तो चेहरा आता त्याला दिसला.
कोनाकोनांनी घडवलेल्या त्या चेहऱ्यावर नाक नव्हतं. ती एक कवटी होती. डोळयांच्या खोबणी रिकाम्या होत्या. नाकाच्या जागी त्रिकोणी फट होती आणि पांढऱ्या हाडातील पांढरे दात भीषण हास्यात विचकले होते...मग काळ्या वस्त्राखालून दोन हात वर आले.

सांगाड्याचे. दोन अस्थींचे हात. पांढऱ्या फेक काड्याकाड्यांचे ते दोन हात दोन बाजूला पसरले. त्यांच्याखाली काळं वस्त्र अभद्र पंखांसारखं फडफड पसरलं. वस्त्र नव्हतं, ते पंखच होते.

तुषारांवर आरूढ होऊन एखाद्या नरकपक्ष्यासारखी ती काळी आकृती त्याच्या दिशेने झेपावत आली.

मदन काहीतरी ओरडला, पण सागरवाऱ्याच्या कल्लोळात त्याचे शब्द त्यालाही ऐकू आले नाहीत. तो धडपडत मागे सरला. मागे पाय कशाला तरी अडकला. त्याचा तोल गेला.

त्याच्यामागेच खाणीच्या शाफ्टभोवतीचं रिफाडाचं कामचलाऊ रेलिंग होतं. ते त्याच्या वजनाखाली कचकन मोडलं आणि मदन त्या फळकुटांबरोबर त्या अंधाऱ्या विवरात कोसळला.

संशोधकांची पहिली तुकडी सकाळच्या उन्हात टेकडीवरच्या खाणीपाशी हजर झाली होती. सर्वजण त्या मोडक्या रेलिंगकडे नवलाने पाहत होते. रात्रीच्या अंधारात एखादं जनावर चुकून त्या वाटेने आलं असेल असाच विचार सर्वांच्या मनात होता. खाली जाणारा पाळणा पुन्हा एकदा नीट झाल्यावर त्यांचं काम पूर्ववत सुरू झालं आणि मग त्या मोडक्या रेलिंगचा विचार त्यांच्या मनातून पार दूर गेला.

खालच्या कॅलशिअम कार्बोनेटच्या थरात आणखी अस्थी सापडल्या होत्या. माणसाच्याच होत्या. सर्व वरती आणून त्यांची जुळणी केल्यावर दोन सांगाडे तयार होत होते. एक स्त्रीचा आणि एक पुरुषांचा. दोन्ही कोमॅगनॉन वंशातले होते. फार फार पूर्वी इथे सागर होता. त्याच्या किनाऱ्यावर मासेमारी करणारांची वस्ती होती. त्या वस्तीतले ते दोघं असावेत. मग पृथ्वीपृष्ठाच्या उलथापालथीत इथला सागर नष्ट झाला होता आणि अर्थात काठावरची मानव वस्तीही; पण खरा प्रश्न हा होता की त्यांच्या अस्थी या कार्बोनेटच्या थरात कशा आल्या?

कारण हा कार्बोनेटचा थर जवळजवळ वीस कोटी वर्षांपूर्वी ट्रायासिक पिरीयडमध्ये सागरतळाशी साचत साचत जमा झाला होता. आता त्याची जाडी किमान एक मैल तरी होती आणि खाण तर केवळ पंचवीस वर्षांपूर्वी खणण्यात आली होती. या समस्येला काही सयुक्तिक स्पष्टीकरण सापडणार होतं, का ही एक अस्पष्टीकृत, वादग्रस्त वस्तुस्थिती राहणार होती?

आणि इकडे मोहना हातातल्या स्वेटरकडे पाहत होती. तिला सकाळी-सकाळीच तो बागेच्या फाटकापाशी सापडला होता. मदनचा स्वेटर. त्याला दोनचार सराटे चिकटले होते; पण तो स्वेटर तोंडापाशी आणताच मोहनाला एक उग्र दर्प जाणवला होता. खारट दर्प. खाऱ्या पाण्याचा वास. तिला एकाएकी हुंदका आला.

मदन रात्रीच केव्हातरी गेला होता. नेहमीसारखा चहासाठीही थांबला नव्हता. मोहना त्याची वाट पाहत होती; पण आतल्या आत कोठेतरी एक कळ येत होती. मनात अशी एक अभद्र शंका येत होती की मदन परत येणार नाही, तिला परत कधी दिसणार नाही.

त्याचा तो स्वप्नातला सागर कधी नजरेआड गेलाच नव्हता.

आणि शेवटी एका काळरात्री त्या सागराचं आकर्षण मदनच्या शक्तीपलीकडचं ठरलं होतं

आणि शेवटी मदन तिकडे गेला होता. आपला बळी घेतल्याशिवाय त्या सागराचं समाधान कसं होईल?

का अजूनही त्याची भूक भागली नव्हती? अजूनही काळया रात्रीतून तो खळबळत, उसळत, फेसाळत येणार होता का?

□□

# २. शाप

त्या गावाचं नाव मी सांगत नाही. एक म्हणजे नावाला महत्त्व नाही. अशा अर्थाने की पुढे वर्णन केलेले प्रसंग एका अर्थी तिथं घडले, एका अर्थी घडले नाहीतही- गोंधळ होतो ना वाचताना? माझाही गोंधळ झाला होता आणि अजूनही होतो- जेव्हा केव्हा ती आठवण निघते तेव्हा होतो.

तेव्हा त्या गावात दोन सव्वादोन वर्षांच्या अवधीत पुढे वर्णन केलेले सर्व प्रसंग घडले. सुरुवात-मध्य-आणि शेवटही. सुरुवात संशय येणार नाही इतक्या साधेपणाने झाली, मध्यात साजेसा गूढपणा होता. पण शेवट अकल्पनीय झाला, रक्तच भीतीने गोठवून बर्फ करणारा झाला. माझी बदली झाली नसती तर मी दीर्घ मुदतीच्या रजेवर गेलो असतो इतका भयानक अनुभव.

चंद्रकांत शिवराम गोईत्रीकर हे त्या गृहस्थांचं नाव-सारं गाव आणि नंतर मीही त्यांना चंदूकाकाच म्हणायचो. त्यांचं कापडाचं दुकान होतं. इतकी उघडउघड अयशस्वी दुकान मी उभ्या जन्मात पाहिलेलं नाही. पॉलिश उडालेलं काऊंटर, जुनाट काळवंडलेली तडे गेलेल्या काचांची कपाटं, एकुलता एक धुळीने माखलेला पिवळा बल्ब, भिंतीशी एक पट्टीचं काळं बाक, दोन घडीच्या पत्र्याच्या खुर्च्या; मागच्या रंग उडालेल्या भिंतीवर पिवळटलेली दत्ताची तसबीर; किती तरी वर्षांचा जुना कागदी फुलांचा हार तसबिरीला घातलेला. दुकानातल्या कोणत्याही वस्तूवर कधीही फडकं म्हणून फिरलेलं नाही- दुकानात कधी ( निदान माझ्या पाहण्यात तरी ) गिऱ्हाईकही आलेलं नाही.

पण अर्थात चंदूकाकांना गिऱ्हाईकाचीच काय, पण धंद्याचीही आवश्यकता नव्हती. त्यांचे मुलगे चांगले शिकले सवरलेले होते. एक मुंबईला होता, एक दिल्लीला होता. जावई मध्यपूर्वेत कोठेतरी होता.दिल्लीच्या मुलाने एका भेटीच्या वेळी दुकान असलेला सर्व वाडाच विकत घेऊन टाकला होता. शिवाय दोन्ही मुलं महिन्याकाठी चंदूकाकांना नियमितपणे पैसे पाठवीत असत.

धंदा करण्याचं चंदूकाकाचं हे वेड तसं खर्चिक नव्हतं, निरुपद्रवी होतं, असाच विचार मुलांनी केला असेल. पत्ते, जुगार, मद्य, रेसिंग, नंबर, सट्टा याच्यापेक्षा हे बरंच होतं की! चंदूकाका मात्र सर्वांना सांगत, मी नाही हो कोणावर अवलंबून! मी माझा आपला मिळवता आहे!

मुलांना यशस्वी करण्याचं खूप मोठं काम चंदूकाकांनी केलं होतं. ते तरी कितीकांना जमतं? चंदूकाकांची ही लहानशी प्रौढी सर्वजण खपवून घेत.

***

ऑफिसमधल्या एका सहकाऱ्याबरोबर रस्त्याने चाललो असल्याने त्याने मला दुकानात नेले. चंदूकाका, हे आमच्या ऑफिसातले देशपांडे. एवढ्यातच बदलून आले आहेत. यांनाही बुद्धिबळाचा शौक आहे बरं का- त्याने चंदूकाकांशी माझी अशी ओळख करून दिली. मित्राच्याच खर्चाने समोरच्या हॉटेलातला चहा झाला. (चंदूकाकांच्या दुकानात चहा

अनेकदा झाला- पण चंदूकाकांनी स्वत: कधीच चहाचे पैसे दिले नाहीत. तीही एक ट्रॅडिशनच पडली होती.)

ही माझी व चंदूकाकांची पहिली भेट. त्यावेळी अर्थात त्यांच्या सर्वच लहान सहान गोष्टी माझ्या लक्षात आल्या नाहीत; पण आमच्या नंतर अनेक भेटी गाठी होत राहिल्या आणि आता चंदूकाका म्हटलं की त्यांची संपूर्ण आकृती डोळयांसमोर उभी राहते. ते मध्यम उंचीचे होते. शरीरयष्टी किरकोळ होती. (काऊंटरवर सारखं वाकून उभं राहूनही असेल ) पाठीला थोडा बाक आला होता. पांढऱ्या शुभ्र केसांची एक रिंग सोडता डोक्याला तुळतुळीत टक्कल पडलं होतं. वर्ण गोरापान होता. अंगात बिन कॉलरचा शर्ट असायचा. खाली धुवट धोतर. डोळयांना सिल्व्हर फ्रेमचा चष्मा. नाक मोठे धारदार; पण सहवासानंतर मला समजलं, चंदूकाका वागायला अगदी साधे, सरळ मार्गी होते.

शनिवारी आणि रविवारी दुपारी आमच्या बुद्धिबळाच्या बैठका होऊ लागल्या. चंदूकाका माझ्या मानाने खेळण्यात फारच पटाईत होते; पण त्यांच्याशी सतत खेळून माझ्याही खेळात सुधारणा होत होती. काही गेम्स अगदी अटीतटीचे होत आणि एकदा तर मात करून मी त्यांना धक्का दिला होता; पण हे पुढचं झालं. खेळण्यासाठी आम्ही दुकानामागची खोली वापरत असू. दुकानातूनच एक दार मागच्या खोलीत उघडत होतं. खोलीला मागे खिडकी होती. बाहेर एक लहानसं अंगण होतं- गवत तणाने भरलेलं. वीस एक फूट अंतरावर वाड्याची मागची भिंत होती. भिंत कसली? सुटया दगडांची उतरंडच. त्या उतरंडीमागे रिकामी बखळ होती. उतरंडीचा मधला भाग कोसळला होता आणि दहा बारा फुटांचं खिंडार पडलं होतं.

‘कोयनेच्या भूकंपाचा धक्का बरं का देशपांडे!’ चंदूकाका हसत हसत म्हणाले, थट्टा नाही करीत. खरोखरच त्या पहाटे गडगडाट होऊन दगड पडले. केव्हा तरी रचून घ्यायला हवेत- आम्ही खिडकीपासच्याच टेबलावर पट मांडायचो. तिथून बाहेर नजर गेली की ती उतरंड, ते खिंडार व मग त्यामागची बखळ दिसायची. एव्हाना गडगडत पडलेल्या दगडांवर माती साचली होती. गवत, लहान लहान झुडपं उगवली होती. थोडक्यात ती लहानशी पायवाटच तयार झाली होती; पण चंदूकाका इतके दिवस मागच्या खोलीत येतच नसावेत. एकटे कशासाठी येतील? आणि म्हणून त्या उतरंडीकडे आणि पलीकडच्या बखळीकडे त्यांचं लक्ष गेलं नसावं.

आमच्या बैठकी सुरू झाल्यानंतर त्यांचं लक्ष तिकडे गेलं. माझ्या लक्षात ती गोष्ट यायलाही बरेच दिवस जावे लागले. आठवड्यातून दोनदा दुपारचे आणि एखाद्या वेळी संध्याकाळचे असे ते मला भेटणार. इतर वेळी ते दुकानात, घरात एकटेच होते. त्या शनिवारी दुपारी मी त्यांच्याकडे आलो. दुकानाची बाहेरची एक फळी नेहमीसारखीच लोटलेली होती. मी आत आलो. चंदूकाका दुकानात नव्हते; पण बरेच वेळा ते मागच्या खोलीतही पटाची मांडामांडी करीत असत आणि आता आमच्या मैत्रीतला औपचारिकपणा गेला होता. तेव्हा त्यांना हाक वगैरे मारण्याच्या भानगडीत न पडता मी सरळ मधला पडदा दूर करून आतल्या खोलीत आलो.

चंदूकाका खोलीत होते. खिडकीतून बाहेर पाहत होते. त्यांच्या चेहऱ्याची एक बाजूच मला

दिसत होती आणि म्हणून कदाचित मी त्यांना हाक मारली नाही, काही आवाज केला नाही, मी आल्याची खूणही दिली नाही. कारण त्यांच्या चेहऱ्यावरचे भावच मोठे विलक्षण होते. विलक्षण एकाग्रता होती, नवलही होतं. जीवघेणी ओढही दिसत होती. असे हे परस्पर विरोधी भाव ऊनसावलीसारखे चेहऱ्यावरून सरकत होते. मध्येच त्यांची मान जराशी वळली. त्यांना मी दिसलो. ते केवढ्यांदा दचकले! काही वेळ माझी ओळखच पटत नसल्यासारखे माझ्याकडे पाहतच राहिले आणि मग त्यांच्या चेहऱ्यावर एक मंदसर हास्य आलं. स्वत:शीच मान हलवीत ते म्हणाले,

'देशपांडे, ती मागची बखळ मोठी चमत्कारिक दिसते हो!'

मी खिडकीपाशी जाऊन खिडकीतून बखळीवर नजर टाकली.

'चमत्कारिक म्हणजे कशी म्हणता चंदूकाका?'

'सुरुवातीस नाही- पण जितकं जितकं जास्त वेळ तिकडे पाहात राहावं तितकी तितकी ती जास्त जास्त लांब पसरत गेल्यासारखी वाटते.'

दुकान चालवण्याचा वृथा अट्टाहास सोडला तर एकंदरीत चंदूकाका व्यवहारीच. तसा वायफळ बडबड करणारा, कल्पनांत रमणारा माणूस नाही. आयुष्यात अनेक बरेवाईट अनुभव घेतलेला. बालिश अल्लड भाबडेपणा केव्हाच नाहीसा झालेला. तेव्हा त्यांच्या तोंडचे ते शब्द मला जरा विशेषच वाटले. मघापेक्षा जरा जास्त लक्ष देऊन मी ती बखळ पाहिली. संपूर्ण ओसाडच होती. खाली गवत, तण, सराटे आणखी काही रानटी झुडपं दिसत होती. एखादी बाभूळ होती. एकदोन पांगारी होत्या. मला वनस्पतींची नावं माहीत नव्हती; पण चंदूकाकांना वाटत होता तसा आकर्षकपणा त्या देखाव्यात मुळीच नव्हता. उलट तिकडे पाहता पाहता मन विलक्षण उदास मात्र होत होतं. यात त्यांना कसलं आकर्षण? मी तेव्हा तो विषय लांबवला नाही. आता मला समजलं की त्या भयानक शोकांतिकेची ती सुरुवात होती; पण ही पार्श्वबुद्धी आहे. आधी कळलं असतं तरी मी घटनांचा प्रवाह बदलू शकलो असतो का? मला शंकाच आहे.

त्या दुपारपासून माझ्या असं ध्यानात आलं की जेव्हा जेव्हा मी त्यांच्याकडे यायचो तेव्हा तेव्हा चंदूकाका दुकानात नसायचेच. मागच्या खोलीतल्या त्या खिडकीपाशी उभे राहून त्या ओसाड बखळीकडे पाहत असायचे. दोन तीनदा असं झालं आहे की त्यांना कशाचं, मी आल्याचं, भानच नसायचं. त्यांना जे काही दिसत असेल त्यात ते पूर्ण गढून गेलेले असायचे, चेहऱ्यावर उत्कंठा आणि भीती याचं एक विलक्षण मिश्रण असायचं. त्यांचं लक्ष वेधून घ्यायला मला घसा साफ करण्याचा, पावलाचा, दरवाजाचा असा कसलातरी आवाज करावा लागे.

आमचा डाव बसायचा; पण मला अशी शंका यायला लागली होती की चंदूकाकांच खरं लक्ष बुद्धिबळाच्या डावात नाही. ते खेळताहेत, गप्पा मारताहेत, पण हा सर्व देखावा आहे. नाटक आहे. त्याचं खरं लक्ष मागच्या त्या बखळीकडेच आहे. कितीतरी वेळा मनात आलं की त्यांना प्रत्यक्षच एकदा विचारून शहानिशा करून घ्यावी; पण मग जीभ अडखळली. समजा, एखादा माणूस आपल्या घराच्या मागच्या खिडकीतून बाहेर पाहतोय- स्वत:च्याच अंगणाकडे पाहतोय- त्याला जाब विचारायचा? कोणत्या शब्दांत? कसा? तेव्हा मी गप्पच

बसलो आणि मागाहून सतत पश्चात्ताप करण्याची पाळी आली. (मनात असाही एखादा चोरटा विचार येतो- आपल्या बुद्धिबळाच्या डावापासूनच ही सुरुवात झाली!)
चंदूकाकांच्या प्रकृतीवरही परिणाम होत होता. शरीर आणखीच कृश दिसू लागलं. पाठीचा बाक आणखीच वाढला. डोळयात पूर्वीचीच चकाकी होती; पण चकाकी हसऱ्या डोळयांतही असते. तापाने फणफणलेल्याच्याही डोळयात असते. मला चंदूकाकांची ही उत्सुक अवस्था आवडली नाही.
एका रविवारी चंदूकाका दुकानात नव्हते, मागच्या खोलीतही नव्हते. खोलीचं अंगणाकडे जाणारं दार उघडं होतं; पण ते अंगणातही नव्हते. मी अंगणात एक चक्कर मारली आणि शेवटी त्या पडक्या उतरंडीपाशी येऊन समोरच्या बखळीवरून नजर फिरवली.
मला चंदूकाका दिसले नाहीत; पण समोर पाहता पाहता मनावरून विलक्षण उदासीनपणाची भावना सरकत गेली. एखादी गारेगार पाण्याची लाट यावी तशी. शरीराबाहेरचंच काहीतरी मनावर झाकोळा आणत होतं, मनाला गुदमरवून टाकत होतं, मनातला आनंद, समाधान-सुखाचा प्रकाश मालवून तिथे निराशा, विफलता, उद्विग्नतेचा अंधार करीत होतं. मला त्या बखळीकडे पाहायचं नव्हतं. मला तिथून हलायचं होतं; पण डोळे मिटत नव्हते, पाय हलत नव्हते. त्या रिकाम्या, मरगळलेल्या गवताझुडपांनी भरलेल्या ओसाड बखळीवरून नजर फिरवता फिरवता मनात जी एक जाणीव जन्माला आली तिला उत्कंठाच नाव द्यायला हवं. कदाचित असंही असेल की मनाच्या एखाद्या शाबूत, तटस्थ, विचारशील भागाला या अनैसर्गिक आकर्षणाचं. या एकाएकी आलेल्या उदासपणाचं कारणही शोधून काढायचं असेल. असाही एक धावता विचार मनात आला की मनावरचं हे आकर्षण रोजचं, नैसर्गिक नाही, कारण त्याचा रोख मनात खोलवर रुजलेल्या, नेहमी अव्यक्त पातळीवर राहणाऱ्या एखाद्या अतिप्राचीन अवशेषावरही असेल. ते काहीही असो. मी त्या पडक्या वरवंडीपासून हललो नाही. वाळकं पिवळं गवत वाऱ्याच्या एखाद्या झुळकीबरोबर मधूनच हलत होतं. वठलेली झाडं-झुडपं कशी चित्रांसारखी उभी होती. विशेष म्हणजे त्या सर्व बखळीवर एकही पक्षी, कीटक, फुलपाखरू भिरभिरताना दिसत नव्हतं. फक्त गवत, झुडपं, झाडं.
पण तरीही मनाला सारखं वाटत होतं की या ठिकाणी काहीतरी रहस्य दडलेलं आहे. मनाला काहीतरी खटकत होतं. वाटत होतं की नीट लक्ष देऊन, बराच वेळ निरखून पाहिलं तर ते रहस्य आपल्याला नक्कीच उमजेल.
आणि त्या बखळीकडे पाहता पाहता अशी एक विचित्र जाणीव झाली की समोरच्या देखाव्यात, परस्पेक्टिव्हमध्ये काहीतरी बदल होत आहे. बदल गवतात किंवा झाडाझुडपात होत नव्हता, तरीही बखळीचा विस्तार मोठा होत होता. आधी एवढंच वाटलं की बखळ मूळच्या कल्पनेपेक्षा बरीच मोठी आहे; पण जरा वेळाने वाटायला लागलं की ही साधी बखळ नाही. एकरोएकर, कदाचित मैलोमैल पसरलेला माळ आहे. जर का या वरवंडीतून मी माळावर पाऊल टाकलं अन् चालायला लागलो तर तो पार करायला मैलोमैल अंतर तुडवावं लागेल का नको? जायला काय हरकत आहे? आत गेल्याखेरीज त्याचा शेवट कोठे आणि कसा होतो हे कळणार तरी कसं? आणि ते तर कळायला हवंच! अशी जबरदस्त

इच्छा झाली की एक झेप घेऊन वरवंड ओलांडावी आणि त्या हलत्या पिवळया गवतात घुसावं, पाहावंच एकदा आत काय आहे ते! खरं म्हणजे मी अगदी तेच करण्याच्या बेतात होतो-

तेवढ्यात मला चंदूकाका दिसले. उजव्या बाजूच्या गवतातून ते एकदम बाहेर आले. गवत इतकं उंच नव्हतं; पण चंदूकाका आधीच बुटके. त्यात पाठीला बाक आलेला आणि शिवाय ते जरासे पुढे वाकून चालले होते. ते गवताबाहेर आले आणि स्वत:च्या घराकडे नुसते पाहतच राहिले. जणू काही त्यांनी हे घर ( किंवा कोणतंही घर! ) जन्मात कधी पाहिलंच नव्हतं. त्यांचे कपडे अस्ताव्यस्त झालेले होते. सर्व अंगाला गवताची पानं, सराटे, वाळक्या काटक्या चिकटल्या होत्या. त्यांची नजर चारी बाजूंना गरागरा फिरत होती. माझी अगदी खात्री झाली की परत माघारी वळून त्या गवतात परत घुसायचा त्यांचा विचार होता. तेवढ्यात मी त्यांना मोठ्यांदा हाक मारली,

‘चंदूकाका!’

त्यांची नजर एकदोनदा माझ्यावरून गेली, मग माझ्यावर खिळली आणि मग नजरेत सावकाश, सावकाश ओळख उमटली. चेहरा पूर्ववत झाला. ते सावकाश वरवंडीतून अंगणात आले. खांदे खाली गेले होते. पावलं रखडत होती. ते माझ्यापुढं घरात आले आणि एका खुर्चीत धपकन कोसळून बसले. मी आत आलो. त्यांच्याकडे एकच नजर टाकली. त्यांना आता काही विचारण्यात अर्थ नव्हता. ते पार थकले होते. मी त्यांना आधी माठातलं थंडगार पाणी दिलं आणि म्हणालो, चंदूकाका फक्कडसा चहा बनवू का?

त्यांनी नुसतीच मान हलवली. चहा बनवून त्यांच्यासमोर कपबशी ठेवीपर्यंत ते काहीच बोलले नाहीत. मग चहाचा पहिला, गरमागरम घोट घशाखाली उतरताच म्हणाले, वा! झक! त्यांनी चहा अधाशासारखा घटाघटा घेतला. त्यांचा हात कापत होता. कप बशीवर किणकिणत होता.

चंदूकाका, मी आता जातो, पण आज तुम्ही घरातच राहा बरं का! वर न पाहताच त्यांनी मान हलवली. खरा प्रकार काय घडला होता हे जाणून घेण्याची उत्कंठा मी कशीतरी दाबली आणि त्यांचा निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशी दुपारी मी त्यांच्याकडे आलो तेव्हा ते बरेच सावरलेले दिसले. थकवाही गेला होता. आमची एक गेमही झाली; पण एकूण त्यांचं मन व्यग्रच होतं. आदल्या दिवशीच्या प्रकारावर चकार शब्दानेही संभाषण झालं नाही; पण मला त्यांच्यातला बदल जाणवत होता. त्यानंतर या ना त्या निमित्ताने जवळ जवळ रोजच माझी त्यांच्याकडे चक्कर होत होती. मला अशी अंधुकशी आशा वाटायला लागली की त्या बखळीचा मामला ते विसरून जायच्या बेतात आहेत.

पण पुढच्याच शनिवारी मी आतल्या खोलीत जातो तर चंदूकाका परत एकदा त्या वरवंडीपाशी बखळीकडे पाहात उभे! मी हाका मारताच ते आत आले खरे, पण मोठ्या विलक्षण अनिच्छेनेच. परत एकदा मागच्याच सर्व प्रकाराची पुनरावृत्ती सुरू झाली. त्या चमत्कारिक बखळीचा त्यांच्यावर पुन्हा एकदा जबरदस्त पगडा बसला होता त्यात शंका

राहिली नाही.

त्यांच्याबद्दल मनात आपुलकी निर्माण झाली होती. त्यांच्या प्रकृतीला, मन:स्वाथ्याला असलेला धोकाही दिसत होता. म्हणून शेवटी मी धाडस करून या विषयाला वाचा फोडलीच. माझ्या बाजूने जमला, आठवला तो सर्व युक्तिवाद मी केला. त्यांचं उतार वय, ढासळतं प्रकृतिमान, एकटेपणा, दुकानाकडे दुर्लक्ष. आधीच त्यांना गावातले लोक विक्षिप्त म्हणत. हा प्रकार कोणाच्या कानावर गेला तर चंदूकाकांवर वेडपटपणाचाही आरोप व्हायचा!

'चंदूकाका मी गेले सात दिवस थांबलो. मनातली उत्कंठा कशीतरी आवरली. आता सांगा बरं मागच्या शनिवारी नक्की काय झालं? तुम्हाला नक्की काय अनुभव आला? काय दिसल? तुम्ही वखळीतून अशा भयभीत, गोऱ्यामोऱ्या, घामेजल्या चेहऱ्याने का बाहेर आलात?''

चंदूकाकांनी चष्मा उतरवून ठेवला, हाताच्या बोटांनी डोळे चोळीत एक मोठा उसासा टाकीत ते म्हणाले,''देशपांडे, या नसत्या चवकशा केल्याबद्दल वास्तविक मला तुमचा राग यायला हवा; पण मला तुमचा हेतू समजतो. तो चांगला आहे. तेव्हा ऐका. त्या मागच्या बखळीत, किंवा बखळीचं काही तरी रहस्य आहे. ते शोधून काढल्याखेरीज जिवाला स्वस्थता लाभणार नाही. आकार, अंतर म्हणा, रचना म्हणा- रहस्य कशात आहे मला माहीत नाही, पण ते मला उकललंच पाहिजे. एक प्रकारचं आव्हानच वाटतंय ते मला. त्याच्या मुळाशी पोचलंच पाहिजे. रात्रंदिवस चोवीस तास माझ्या मनात केवळ तोच एक ध्यास आहे. लोक मला वेडपट म्हणतील म्हणता? म्हणू देत! माझा नाइलाज आहे. ही आसक्ती काही केल्या सुटत नाही.''

चष्मा परत नाकावर चढवीत, कपाळाला आठ्या घालून, वरच्या मळकट कडीपाटाकडे पाहत चंदूकाका पुढे म्हणाले, ''त्या शनिवारी-शनिवारीच नाही का? मला एक मोठा नवलाचा, विलक्षण, भयकारक अनुभव आला देशपांडे. मी त्या पडक्या वरवंडीपाशी उभा होतो आणि बखळीत प्रवेश करायची इच्छा अगदी अनावर झाली. सर्व विचार दूर सारून मी आत प्रवेश केला अगदी कितीतरी वर्षात अशी उल्हासाची, आनंदाची, अपेक्षेची भरती आल्याची आठवणीत नाही. खरं म्हणजे ते शब्दात मांडताच येत नाही. पण मी त्या बखळीत वीस पंचवीस पावलं गेलो असेन नसेन तोच मनाची सगळी उभारी कोसळली. मनावर विफलतेची, उद्विग्नतेची, खिन्नतेची दाट काळीकुट्ट छाया आली. जीव कसा होरपळल्यासारखा झाला. सर्व जग, सर्व काही शून्यवत, मातीमोलाचं वाटायला लागलं. त्याचंही वर्णन करता येत नाही. मी थांबलो, माघारी येण्यासाठी वळलो. आणि मला परत येताच येईना. तुमचा विश्वास बसणार नाही; पण मला परत यायची वाटच सापडेना! दिशांचा अंदाज पार गेला होता. कोणत्या दिशेला जायचं हेच समजेना. आपल्याला ते गवत इकडून फारसं उंच वाटत नाही; पण तिथे जमिनीला काहीतरी उतार असला पाहिजे. गवत चांगलं डोक्यावर जातं. गवतापलीकडचं, गवताशिवाय दुसरं काही दिसतच नाही.''

''मी सांगतो त्यावर तुमचा विश्वास बसणार नाही. देशपांडे, मी त्या बखळीत चांगला तासभर भटकत होतो. त्या गवताच्या जंजाळात शिरल्यावर ती बखळ भलतीच मोठी वाटायला लागली. असं वाटत होतं की बघताबघता, क्षणाक्षणाला अंतरं, मापं बदलताहेत.

कोठेही वळलं तरी समोर आपला लांबच लांब पसरत गेलेला गवताचा विस्तार आहेच! कदाचित मी गोलगोल चकराही मारीत असेन-कोणी सांगावं? जंगलात माणसाची वाट चुकली की तो म्हणे असाच गोलगोल फिरतो; पण हे काही जंगल नव्हतं. ही साधी बखळ होती- नाही, देशपांडे, साधी नाही-''

चंदूकाका स्वत:शीच मान हलवत होते. मी कितीतरी मैल पायाखाली तुडवले असले पाहिजेत. तुमचा माझ्यावर शब्दांवर कदाचित विश्वास बसणारही नाही. तशी माझी अपेक्षाही नाही. काय झालं, अनुभव काय आला तो मी तुम्हाला सांगितला आहे. बखळीतून बाहेर यायची वाट मला सापडली ती अगदी निव्वळ योगायोगाने. मध्येच एकदा वळलो तो मी गवताबाहेर, बखळीच्या कडेला. समोर माझं घर! पण त्याहीपेक्षा एक विलक्षण गोष्ट. ऐका- मी बाहेर आलो होतो खरा; पण आसपास गवताचा आडोसा नाही असं दिसताच मला विलक्षण भीती वाटायला लागली! असं वाटायला लागलं, केव्हा एकदा त्या गवतात घुसतो आणि स्वत:ला लपवून टाकतो! ही परस्परविरुद्ध भावना समजतच नाही. आत प्रवेश केला की मन इतकं खिन्न, उदास, विफल होऊन जातं- पण बाहेर आलं की क्षणभर चैन पडत नाही. सारखी आतली ओढ लागते!

''पण देशपांडे, मला ते कोडं सोडवायलाच हवं! तिथे आत काहीतरी अनैसर्गिक आहे. जमिनीतल्या वायूंचा हा मानसिक परिणाम आहे, का तिथे खरोखरच काही अमानवी अस्तित्वाचा संचार आहे, का तिथली- हवा-पाणी-जमीन-भूमितीच वेगळी आहे ते मला शोधून काढायचंय. त्याखेरीज मी गप्प बसणार नाही आणि मी मनात एक योजनाही आखली आहे. नीट विचाराने पक्की झाली की अमलात आणणार आहे.''

चंदूकाकांच्या शब्दांचा माझ्या मनावर मोठाच परिणाम झाला. मला स्वत:ला जो अगदी लहानसा अनुभव आला होता तो विचारात घेता चंदूकाकांचं बोलणं वायफट कसं समजायचं? मी त्यांना त्यांच्या विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला नाही; पण असं बोलतानाच मला समजत होतं की आपले प्रयत्न पाण्यात जाणार आहेत. मी त्यांचा निरोप घेतला तेव्हाच मनाला भावी दुर्घटनांची चाहूल लागली होती; पण मी एक त्रयस्थ आणि माझी कारणं इतकी अविश्वसनीय. मी काय करू शकणार?

***

या ना त्या कारणाने मला पाचसहा दिवस चंदूकाकांकडे जाताच आलं नाही. शेवटी शनिवारी दुपारी मला वेळ मिळाला. दुकानाची पुढची फळी नेहमीसारखी उघडी होती; पण दुकानातून आतल्या खोलीत पाय टाकताच मन चमकलं. दोन दिवस माणसांचा वापर नसला तरी जागेला एकदम एक अवकळा येते किंवा कदाचित मनातल्या विचारांचाही तो परिणाम असेल. खोली रिकामी होती, बेवारशी दिसत होती. अंगणातलं दार उघडं होतं. अंगणही रिकामं होतं.

शेवटी मी त्या वरवंडीपाशी येऊन त्या रहस्यमय बखळीकडे पाहत उभा राहिलो. गवताची पिवळी वाळकी पानं खसखस करीत एकमेकांवर घासत होती. वेडीवाकडी झाडं वठल्यासारखी उभी होती. त्या गवतांच्या पात्यांच्या हलण्याखेरीज इतर हालचाल नव्हती आणि त्या खसखशीशिवाय इतर आवाज नव्हता. फुलपाखरं फडफडत नव्हती, टोळ-कीटक

चर्रर्रप करीत नव्हते, पक्ष्यांची किलबिल नव्हती. काही नाही. नुसती स्तब्धता.
खाली पायापाशी काहीतरी पांढरं दिसलं म्हणून मी नजर खाली वळवली. एका चांगल्या खूप मोठ्या दगडाला सुतळी चांगले पाचसहा वेढे देऊन बांधली होती आणि ती सुतळी वरवंड ओलांडून समोरच्या वाळक्या गवतात दिसेनाशी झाली होती. हीच ती चंदूकाकांची योजना तर! ग्रीक पुराणकथेतल्या मीनॉटॉरच्या गुहेत प्रवेश करणाऱ्या नायकाची क्ऌप्ती! चंदूकाकांनी सुतळीचा मोठा गुंडा विकत आणला होता. त्याचं एक टोक इथे गुंतवलं होतं आणि पावला पावलागणिक सुतळी उलगडीत ते आत शिरले होते. कितीही वळणं घेतली, कसेही मागे पुढे चालले तरी परत यायची वेळ आली तर ती सुतळी गुंडाळत यायचं. ती सुतळी त्यांना बरोबर बाहेर घेऊन येणार हीच त्यांची योजना असली पाहिजे.
मला त्यात काही दोषार्ह वाटलं नाही आणि मनात जरा सुटल्याचीच भावना आली. एक म्हणजे त्यांना आता धोका दिसत नव्हता. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यांची तर्कबुद्धी, विचारशक्ती काम करीत होती. हे काही वेड्याचं काम नव्हतं. जाईनात का त्या बखळीत- अजूनही ते त्या गवतातच असतील. त्यांची वाट पाहत मला थांबायला काय हरकत होती? भटकू देत त्यांना त्या गवतात- अगदी कंटाळा येईस्तोवर भटकू देत. त्यांना हाक मारायचीच नाही. अगदी नॉशिया येईपर्यंत त्यांना फेऱ्या मारू देत. म्हणजे मग त्या जागेचं आकर्षण कमी होईल. कदाचित काही दिवसांत ते हे आपलं फॅड विसरूनही जातील.
मी परत खोलीत आलो. टेबलावर बुद्धिबळाचा डाव मांडला. समोर चंदूकाका आहेत अशी कल्पना करून एक गेमही पुरी केली. अर्धा तास गेला. खोलीतलं सामान पाहिलं. दोनतीन जुन्या पोथ्या होत्या, संतांची एकदोन चरित्रं होती. एक कीर्तनाचं पुस्तक होतं. ती पुस्तकं चाळण्यात वीस मिनिटं घालवली मी. आता तास होत आला होता. मनाला पुन्हा एकदा ती अस्वस्थता जाणवायला लागली. चंदूकाका बखळीत गेल्याला खरा वेळ तरी किती झाला होता? मी तासभर इथे होतो, त्याच्या आधी किती वेळापूर्वी ते तिकडे गेले होते? त्यांचे उतारवय, गेल्या काही महिन्यांत मनावर आणि शरीरावर आलेला ताण, ती कृश शरीरयष्टी...खरं म्हणजे मला त्यांच्याबद्दल जरा काळजीच वाटायला लागली.
पुन्हा एकदा मी बाहेर आलो. त्या वरंवडीपाशी उभा राहून, मग दगडावर चढून, चंदूकाका कोठे दिसतात का पाहिलं. ते दिसत नाहीत असं पाहून त्यांना आधी साध्या आवाजात आणि मग खूप मोठ्याने हाका मारल्या; पण हाका मारतानाच मला विलक्षण जाणीव झाली की, माझा आवाज त्या फिकुट-वाळक्या-पिवळया गवताच्या कडेपलीकडे जातच नाही आहे. जणू काही त्या गवतापाशी पोचताच त्या ध्वनिलहरी अडवल्या, दाबल्या, शोषल्या जात होत्या. गवताच्या कडेपलीकडे आवाज पोहोतच नव्हता!
माझ्या हाकांना काहीही प्रतिसाद आला नाही. कदाचित दाट गवताने माझी हाक त्यांच्या कानापर्यंत पोचलीच नसेल. शिवाय वयोमानाप्रमाणे त्यांची श्रवणशक्तीही क्षीण झाली असावी. एकच मार्ग उरला होता. त्या बखळीत जाऊन त्यांना शोधून काढून परत आणणं आणि ते वाटत होतं तितकं कठीण नव्हतं. कारण त्यांनी बांधलेली सुतळी समोरच होती. ती हातात घेऊन नुसतं चालत राहायचं की चंदूकाकांची भेट व्हायचीच.
मी वरवंडी उतरलो. सुतळी उचलून हातात घेतली आणि बखळीतल्या त्या गवतात प्रवेश

केला. गवताच्या खसखशीशिवाय दुसरा आवाज नव्हता; पण समोर मोकळी जागा दिसत होती. सुरुवातीस चांगलीच प्रगती होत होती; पण काही अंतर चालून जाताच मला दिसलं की गवताची देठं जाड जाड व्हायला लागली आहेत, गवत अगदी दाटीवाटीने उगवलं आहे. मध्ये मोकळी जागा नाही. मला गवत दोन्ही हातांनी दूर करून मगच पुढं जावं लागत होतं आणि चारी बाजूंनी जसं हे दाट गवत आलं तसं पुन्हा एकदा मनावर निराशेचं ते मळभ आलं. ती जाणीव विलक्षण तीव्र होती; जहरी होती. ही जागा खरोखरीच विचित्र होती. इथे काहीतरी अनैसर्गिक होतं खास. असं वाटायला लागलं की या वीस पंचवीस पावलांत आपण रोजचं साधंसुध जग पार मागं टाकल आहे आणि एका अगदी नव्या अपरिचित जगात प्रवेश केला आहे...तण-सराटे-गवत-काटेरी झुडपांनी भरलेलं, सतत कानाशी खसखस करणाऱ्या उंचच उंच गवती पात्यानं झाकलेलं जग...जिथे आवाज साधे नाहीत, जिथे हालचाली साध्या नाहीत, जिथे प्रत्येक लहान सहान गोष्टीत विकृती, दुष्टता भरलेली आहे...

आणि मध्येच हातात सुतळीचं टोक आलं. सुतळी तुटली होती. मी हातातल्या त्या टोकाकडे कितीतरी वेळा मूढपणे पाहत होतो. अनेक गोष्टी होत्या; पण डोक्यात त्यांचा अर्थ शिरायला जरा वेळ जावा लागला हे एक आणि महत्त्वाचं म्हणजे चंदूकाकांना परत यायची वाट सापडणार नव्हती. मागे सुतळी तुटली आहे याची त्यांना कल्पनाच नसेल. ते आपले खोट्या सुरक्षिततेच्या भावनेने हातातला गुंडा उलगडत पुढे पुढे चाललेच असतील. सुतळी त्यांच्याबरोबर ओढली गेली असली पाहिजे. कारण त्या तुटक्या टोकाच्या आसपासचा बराचसा भाग मी पायाखाली तुडवला, पण सुतळीचं दुसरं टोक काही मला सापडलं नाही.

मी जर आता त्यांच्या शोधावर आणखी पुढे गेलो तर मला तरी परत यायची वाट सापडेल का? त्यांच्या जोडीला मीही त्या जंजाळात हरवून जायचा. आणखी कोणाला मदतीला बोलावावं का? पण त्यात आणखी वेळ जायचा...आणि वेळ तर फार महत्त्वाचा होता. आधीच उशीर झाला होता. चंदूकाकांपाशी अगदी लवकरात लवकर पोचायला हवं होतं. कारण आता त्यांना धोका होता याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका राहिली नव्हती. तिथेच उभा राहून, हाताचा कर्णा करून, मी त्यांना खूप मोठ्याने चार पाच हाका मारल्या; पण आसपासच्या त्या गवताच्या उभ्या भिंतीतच माझी हाक शोषली जात होती. हाकेला ओ आली नाही.

शेवटी मी हातात सुतळीचं टोक घेऊन, त्याकडे विमनस्कपणे नुसता पाहत उभा राहिलो. जो शोध मी सुरुवातीस घ्यायला हवा होता, तो घ्यायची आता मला आठवण झाली. सुतळी तुटली कशी? दगडात अडकली कशी? काट्यात सापडली? मी टोक हातात घेऊन नीट पाहिलं... आणि तिथे, भर दुपारी चांगल्या दुपारच्या उन्हात मला दरदरून घाम फुटला...कारण सुतळी आपोआप तुटली नव्हती; सुतळीवर कुरतडल्यासारख्या खुणा होत्या. हिरवट रंगाचे एकदोन डाग होते... हे कुतरतडण्याचं काम करणार कोण- किंवा काय- होत? एखादा उंदीर?घूस? का आणखीच काहीतरी. मी आलो त्या वाटेकडे पाहिलं. एव्हानाच चंदूकाकाचं घर दिसेनासं झालं होतं. समजा, ही सुतळी आणखी मागे तुटली-

तोडली नाही, तुटली- तर मला परत जायची वाट सापडेल का? भीती आली ती एखाद्या तुफानी लाटेसारखी आली. गेलीही तशीच...स्वत:च्या वेडपट कल्पनेचं मलाही जरा हसू आलं. ही मानसिक विफलता-जमिनीतून येणाऱ्या एखाद्या विषारी वायूचा परिणाम नसेल कशावरून? तो नैट्रोजन ऑक्साईड का काय- तो गॅस हुंगला की लोक नाही का हसत? त्याला लाफिंग गॅस म्हणतात-तसाच एखादा वायू इथे जमिनीतून बाहेर झिरपत नसेल कशावरून?

छे! वेळ दवडण्यात अर्थ नव्हता. चंदूकाकांचा शोध घ्यायला हवा होता. पुन्हा एकदा मी त्यांना हाक मारली. आताची हाक विहिरीच्या तळाशी उभा राहून वर तोंड करून मारल्यासारखी नुसतीच माझ्याभोवती घुमत घुमत वर गेली होती.

मी सरळ पुढे निघालो. गवताच्या देठांची आता जाड जाड ताटं झाली होती. पावलापावलागणिक मला ती दोन्ही हातांनी बाजूला करून त्यांच्यातून वाट काढावी लागत होती. आधीच दुपारची उन्हाची वेळ. त्यात हे चारी बाजूंनी गवत. वारा अजिबात नाही. नवल नाही, मी अगदी घामाघूम झालो होतो. डोकंही दुखायला लागलं होतं. मधून मधून समोरचा देखावाही अस्पष्ट झाल्यासारखा वाटत होता. पुन्हा एकदा ती जमिनीतल्या विषारी गॅसची कल्पना मनात येऊन गेली. सगळीकडून कुंद, दाटून आलेलं मोठ्या वादळापूर्वी कसं गुदमरायला होतं तसं वाटत होतं.

दम घ्यायला मी काही क्षण थांबलो. चारी बाजूला उंच गवत होतं. सुतळी सोडल्यावर मी कोणत्या अंगाला वळलो हे आठवत नव्हतं. क्षणभर मला खरोखरच भीती वाटली की आपलीही वाट चुकली की काय? अगदी हास्यास्पद विचार, नाही का? दोन अडीच एकरांची बखळ, भर दुपारची वेळ...दोन अडीचशे पावलांवर बांध येईल, कुंपण येईल, रस्ता तरी येईल...पण तरीही मी स्वत:शीसुद्धा हसलो नाही. ती जागाच तशी होती. तिथे माणसाचं हास्यच थिजून जात होतं. तिथे प्रसन्नतेचा लवलेशही नव्हता. घाम पुसून मी पुढे निघालो.

नक्कीच माझ्या मेंदूवर परिणाम होत होता. कारण गेली काही मिनिटं मला वाटायला लागलं होतं की गवतात मी एकटा नाही. अंगावर एक शहारा येऊन मला जाणवलं होतं की माझ्याशिवाय, माझ्यामागेच त्या गवतात कोणीतरी- का काहीतरी- आहे. तसा काही आवाज कानावर आला नव्हता- किंवा आला असेलही, पण मला जाणवला नसेल- पण एकाएकी माझी अगदी शंभर टक्के खात्री झाली की माझ्या मागोमाग त्या गवतातून कोणीतरी चोरून, लपतछपत, सरपटत येत आहे.

कोणाचं तरी आपल्यावर अगदी बारीक लक्ष असल्याची जाणीव झाली आणि हे निरखून पाहणारं दुष्ट होतं. घातकी होतं.

क्षणभरच असा मोह झाला की वाट फुटेल तिकडे अगदी जोराने पळावं; पण दुसऱ्याच क्षणी मनाची प्रतिक्रिया बदलली. भीतीची जागा संतापाने घेतली. अविचार, संताप. त्या घाणेरड्या बखळीचा संताप. चंदूकाकांचा संताप. माझ्या स्वत:च्या मूर्खपणाचा संताप. इतका वेळ मनात कोंडून राहिलेल्या, धुमसणाऱ्या भावनांना आता संतापाच्या रूपाने बाहेर वाट मिळाली. त्या उद्रेकात भीती कोठच्या कोठे नाहीशी झाली. मनाशी असा

निश्चय केला की आता या प्रकरणाच्या अगदी मुळाशी गेल्याखेरीज राहायचंच नाही. यापुढे असा छळवाद अजिबात सहन करायचा नाही.
मी पावलांवर गर्रकन वळलो आणि गवतात ज्या बाजूला माझ्या पाठलागावरचा तो कोणी दबा धरून बसला असण्याची शक्यता होती, त्या बाजूच्या गवतात एकाएकी जोरात घुसलो आणि दोन पावलांवरच थिजून गोठून दगडासारखा थांबलो. राग कोठच्या कोठे गेला. रागाची जागा मनस्वी, जिवाचं पाणी करणाऱ्या भीतीने घेतली.
उंच गवतातून खाली झिरपत येणाऱ्या पिवळट पितळी सूर्यप्रकाशात मला चंदूकाका दिसले...ते खाली बसले होते...दोन्ही हात पुढे टेकले होते...त्यांचा पवित्रा झेपेसाठी टपलेल्या एखाद्या पशुसारखा होता. त्यांच्या चष्म्याचा पत्ता नव्हता, अंगावरच्या कपड्यांच्या चिंध्या चिंध्या झाल्या होत्या; पण त्यांचा चेहरा! डोळे किलकिले झाले होते, दातावरून ओठ मागे गेले होते आणि दात आवळले होते.
माझे पायच जमिनीला खिळून राहिले. त्यांच्यावरची नजरच मला काढता येईना. चष्मा नसल्याने त्यांचे डोळे काहीतरी दिसत होते; पण डोळ्यांतला भाव झाकत नव्हता. नजर खुनशी होती, माझ्यावर एकटक खिळली होती. नजरेत माझ्या ओळखीचा लवलेशही नव्हता. त्यांच्या केसात, मानेवर, सर्व अंगावरच गवताची पानं, काटक्या होत्या. जणू काही ते गवतातून जमिनीवरून सरपटत गेले होते...एखाद्या हिंस्र पशूसारखे...
पहिले काही क्षण आश्चर्याचा धक्का इतका जबरदस्त होता की माझ्या तोंडून शब्दच फुटेना. एकदोन आवंढे घेतल्यावर मग मला माझा आवाज सापडला. 'चंदूकाका! चंदूकाका!' मी ओरडलो. 'मी देशपांडे!' ओळखलंत ना मला?
उत्तरादाखल त्यांच्या घशातून खोलवरून गुरगुर आली. दात आणखीनच विचकले. त्यांनी शरीर झेप घेण्यासाठी आकसून घेतलं.
प्राणभयाखाली माझ्या मनाने ठाव सोडला. सर्व प्रतिक्रिया प्रतिक्षिप्त होत्या. काहीतरी ओरडत मी एकदम एका अंगाला झुकांडी घेतली आणि तसाच त्या दाट गवताच्या जंजाळात घुसलो. एक सेकंदभरातच एक अमानवी किंचाळी आणि शरीराचा झेप घेतल्याचा आवाज कानावर आला.
भयाच्या अतिरेकाने पायांना वाऱ्याची गती दिली होती. पूर्वी जी गवताची ताटं मला नेट लावून हाताने दूर करावी लागत होती, त्यांच्यातून मी आता मुसंडी मारीत झपाट्याने चाललो होतो. माझ्या मागोमाग काहीतरी माझ्या पाठलागावर असंच गवत-झुडपातून धडपडत येत होतं. माझी एक खात्री झाली होती की आता जर का मी सलामत सुटलो नाही तर माझ्या जिवाची धडगत नव्हती.
हा अनुभव एखाद्या स्वप्नासारखाच वाटत होता. दु:स्वप्नासारखा. जिवाच्या भीतीने कशापासून तरी पळणं. मागून येणारा पाठलागाचा आवाज. तोंडावर गवताच्या ताटांचे फटकारे बसत होते, हातातून सुटलेली एखादी फांदी फट्दिशी चाबकासारखी आपटत होती, काट्याकुट्यांनी तोंड, हात, मांड्या ओरबडून निघत होत्या; पण मला काहीही जाणवत नव्हतं. केवळ एका आणि एकाच गोष्टीवर तन-मन एकाग्र झालं होतं. या सैतानी बखळीतून कसंही करून बाहेर पडायला हवं. पाठलागावर जे काही अमानवी येत होतं

त्याच्या तावडीतून सुटायला हवं.
शेवटी शरीराच्या ताकदीलाही काही मऱ्यादा होत्याच आणि माझं आयुष्य पडलं कारकुनाचं. अशा धावपळीची शरीराला कधी सवय नव्हती. श्वासाश्वासागणिक शरीराला हादरे बसायला लागले. पायांना पेटके यायला लागले. समोरचा देखावा हेलकावे खायला लागला. मध्येच त्याच्यावर रंगीबेरंगी जळती वर्तुळं दिसायला लागली; पण मी थांबलो नाही. मी पळतच होतो.
कारण पाठलागावरचं ते जवळ जवळ येत होतं. त्याचा गुरगुरल्याचा आवाज कानावर येत होता. ते माझ्यासारखं, माणसासारखं पळत नव्हतं. हातांवर आणि पायांवर झेपा घेत येत होतं. एकदा तर त्याची झेप माझ्या पायामागे जेमतेम फुटावर पडली आणि या सर्व धावपळीतही मनाला अशी एक भयानक शंका येत होती की आपली प्रगती होतच नाही आहे. आपण एका वर्तुळातच गोल गोल चकरा मारीत पळत आहोत.
शेवटी अगदी दमछाक होत आली. छातीत आग पेटली होती. श्वास तर हुंदक्यांनी येत होता. असं वाटत होतं की आता दोनचार पावलांतच आपण कोसळणार आहोत...आणि अगदी देवकृपेने, ( मी त्याला योगायोग म्हणत नाही ) माझी अखेरची मुसंडी मला एकदम मोकळ्यावर घेऊन आली. समोरच ती पडकी वरवंड होती. वरवंडीमागे चंदूकाकांच्या घराची मागची बाजू होती.
धापा टाकत, थकव्यावर कशीतरी मात करीत मी वरवंड ओलांडली, आणि दगडांच्या आधाराने उभा राहिलो. मी नुसता उभा होतो. श्वास छातीत पुरेसा भासत नव्हता. मला बाकी कशाची शुद्धच नव्हती. मी मागे नजरही टाकली नाही. ( पण याचं कारण मला सांगता यायच नाही ) अगदी तेव्हाच्या क्षणीही, आणि त्यानंतर सतत माझी एक खात्री होती की, त्या बखळीतल्या राक्षसी गवतात, जे काही माझा पाठलाग करीत होतं ते माझ्या मागोमाग या उघड्यावरच्या मोकळ्या स्वच्छ सूर्यप्रकाशात येणार नाही. यायला धजावणारच नाही. मी मग शरीरातलं सर्व त्राण एकवटून रखडत रखडत कसातरी खोलीत आलो आणि एका खुर्चीत कसातरी आदळलो.
***
हळूहळू दम परत आला. श्वासोच्छ्वास मंदावला; पण भीतीच्या भोवऱ्यात भिरभिरणारं मन शांत होईना. कल्पना वेड्या धावत होत्या. एकीपेक्षा दुसरी जास्त भयंकर होती. शहाणपणाच्या अरुंद मार्गावरून विचार करणं फार फार कठीण जात होतं.
चंदूकाका ठार वेडे झाले होते. कारण काहीही असेल- एखादा असह्य धक्का असेल, माझ्या तर्कातला तो विषारी वायू असेल, मनातलीच एखादी अगम्य जडणघडण असेल- पण ते वेडे झाले होते. समोर जो कोणी दिसेल त्याच्या नरडीचा घोट घ्यायला ते टपले होते. होमीसायडल मॅनिअॅकच की! त्यांच्या मनाचा पार चक्काचूर झाला होता. सर्व मानवता नाश पावली होती. गवतातून माझ्यावर खिळलेले ते रानटी हिंस्र डोळे आठवून आताही अंगावर काटा आला. त्याक्षणीही मला वाटलं, केवळ मृत्यूच त्यांना या भयानक अवस्थेतून सोडवू शकेल...पण ते काम मी कसं अंगावर घेणार? चंदूकाका माझे स्नेही होते. अंतरंगात कितीही बदल झाला असला तरी बाहेरचं कवच मानवीच होतं ना? नाही, माझ्याच्याने ते

व्हायचंच नाही. शेवटी योग्य त्या अधिकाऱ्यांनाच काय कृती करायची ती करू देत.
खिडकीतून एकवार मी त्या बखळीकडे नजर टाकली. वाळकं पिवळं गवत मधूनच हलत होतं. ते आत कोणतं भयानक रहस्य दडवून उभं होतं?
मी दुकानाबाहेर पडलो. चौकीवर गेलो. पोलिसांशी आपला कधी संबंध येतो? ते सर्व रूटीन मला परकं, किचकट, कंटाळवाणं, वैताग आणणारं वाटलं. मी कोण? चंदूकाका कोण? त्यांचा माझा काय संबंध? मी तिथे कशासाठी गेलो होतो? मागच्या खोलीत कशासाठी गेलो होतो? बखळीत कशासाठी गेलो होतो? बखळ कोणाच्या मालकीची आहे? हे अतिक्रमण नाही का झालं? चंदूकाकांना वेड लागलं कशावरून? डॉक्टरांनी तपासलं होतं? बापरे बापरे! त्यांचे प्रश्न संपेनात आणि अर्थात माझी उत्तरं त्यांना मुळीच समाधानकारक वाटत नव्हती. शेवटी चंदूकाकांचा मुलगा मुंबईस सेक्रेटरियटमध्ये आहे म्हणताच मात्र जादूची कांडी फिरल्यासारखं वातावरण बदललं. स्वत: सबइन्स्पेक्टर, एक हवालदार, दोन कॉन्स्टेबल माझ्याबरोबर चंदूकाकांच्या घरी आले.
संध्याकाळ झाली होती, सूर्यास्ताला तासाभराचा अवधी होता. आम्ही सर्वजण चंदूकाकांच्या घराच्या मागच्या अंगणात उभे होतो. सबइन्स्पेक्टरांचा माझ्या हकीकतीवर विश्वास बसला नव्हता.
या समोरच्या मोकळया बखळीत हे- हे कोण गोईत्रीकर, नाही का? गोईत्रीकर लपले आहेत म्हणता? ते अविश्वासाने व उपहासाने म्हणाले.
तोंडातोंडी करण्याची माझ्यात ताकदच उरली नव्हती. मी नुसती मान 'हो' म्हणून हलवली. तोंडाने 'चक' आवाज करीत ते वरवंडी ओलांडून पलीकडे गेले आणि त्यांचे आज्ञाधारक सेवकही त्यांच्या मागोमाग बखळीत गेले.
आधी ते चौघे चांगले स्पष्ट दिसत होते; पण ते त्या गवतात आणखी आत जाताच जरा अंधुक, खूप लांबवर दिसायला लागले. माझ्या तर्कातला तो विषारी वायू त्यांच्या दणादणा आपटणाऱ्या पावलांनी आणखीच जास्त प्रमाणात वर आला असेल. त्यामुळे तर देखावा अंधुक दिसत नसेल? काही वेळाने तर नुसतंच गवत जोरजोरात हलताना दिसायला लागलं. जणू काही त्याच्या देठाशी, बुंध्याशी काहीतरी हालचाल, धावपळ करीत आहे.
अगदी अंधार पडायच्या सुमारास चौघंही बाहेर आले, चौघांचे चेहरे घामाने डबडबले होते; चौघांच्या चेहऱ्यांवर गोंधळल्याचा भाव होता. त्यांना चंदूकाकांचा मागमूसही लागला नव्हता. सबइन्स्पेक्टर बोलले तेव्हा त्यांच्या आवाजातला उपहास पार गेला होता. ते तर जरा वरमल्यासारखेच दिसत होते. 'काही दिसलं नाही बुवा आत!' ते अर्धवट रागाने बोलत होते. त्यात अस्वस्थतेचीही एक छटा होती. डोळे चोळत, अंगावरचे काटेसराटे झटकून टाकीत, मान स्वत:शीच हलवीत ते म्हणाले, 'पण त्या गवतात कोणतातरी लहानसा प्राणी आहे खास! उदमांजर असेल, नाहीतर एखादं रानटी कुत्रं असेल... त्याची खसखस अनेकदा कानावर आली. ते सारखं सारखं मागे येत होतं... एक दोनदा गुरगुरलंही... पण दृष्टीस मात्र पडलं नाही...बाकी काही नाही.'
रानटी, गुरगुरणारं कुत्रं? मी काहीतरी बोलायला तोंड उघडलं आणि वेळीच शहाणपण सुचून तोंड मिटलं. आधीच त्यांना माझा संशय आला होता आणि आता तर ते पराभूत,

उद्विग्न आणि म्हणून रागीट मन:स्थितीत होते. त्यांच्या रागाला खाद्य कशाला पुरवायचं? आणि हे लोक काय करू शकणार होते? काहीही नाही.
खोलीत बसून सबइन्स्पेक्टरांनी सर्व हकीकत माझ्याकडून पुन्हा एकवार वदवून घेतली, हजारदा उलटसुलट प्रश्न विचारले. मग चंदूकाकाचं घर पार वरपासून खालपर्यंत कसून तपासलं. कोणीतीही वस्तू गेली नव्हती, पैसे जागचे हलले नव्हते, मोडतोड नव्हती. पडझड नव्हती, मारामारीची खूण नव्हती.
शेवटी कुरकुरत का होईना, त्यांनी एवढं मान्य केलं की मला बखळीत चंदूकाका शेवटचेच भेटले होते. त्यानंतर वेडाच्या किंवा स्मृतिभ्रंशाच्या झटक्यात ते घर सोडून कोठेतरी निघून गेले असावेत. गवतातल्या त्यांच्या रूपाचं मी केलेलं वर्णन पोलिसांना अतिरंजित, अतिशयोक्तीपूर्ण, कपोलकल्पित वाटत होतं. मी त्यांना तो प्रसंग सांगितला याचाच आता मला पश्चात्ताप होत होता. (स्वत:ची आब राखण्यासाठीही असेल, पण ) पोलिसांनी मला एवढ्यात गाव सोडून न जाण्याची ताकीद दिली. मला चौकशीसाठी चौकीवर पुन्हा एकदा बोलावलं जाईल, जरूर पडल्यास माझंही घर तपासलं जाईल अशी धमकी दिली; पण त्यानंतर मग दटावण्यासारखं काही उरलंच नसल्यामुळे मोठ्या नाराजीनेच मला त्यांनी तिथून घरी जाऊ दिलं.
त्यांच्या ठराविक पद्धतीने त्यांनी नंतर चंदूकाकांचा तपास केला. मी केलेल्या तारेबरोबर दोन्ही मुलगे व जावई गावात दाखल झाले. त्यांनाही मी ( त्यातला भडक, अविश्वसनीय वाटणारा भाग वगळून ) सर्व हकीगत सांगितली पण शेवटी चंदूकाकांची नोंद पोलिस दप्तरात स्मृतिभ्रंश झालेला, वेडा, हरवलेला माणूस अशी झाली आणि हळूहळू सर्वांच्या स्मरणातून ते गेलं.
***
पण मी ते कसा विसरू शकणार? ज्या मला पिवळट गवतात चंदूकाका पशूसारखे खाली हातापायावर बसलेले दिसले होते? ज्या मला त्या अजब बखळीचे जीवघेणे गुणधर्म प्रत्यक्ष अनुभवानेच कळले होते? ज्या माझ्या मेंदूवर तो भयानक पाठलाग स्मृतीच्या पोलादी लेखणीने कोरला गेला होता?
एक कल्पना मनात आली होती ती वर एकदोनदा लिहिलीच आहे. कोयना भूकंपाच्या उद्रेकाने भूगर्भात खोलवर काहीतरी जडणघडण झाली होती. त्याचा परिणाम म्हणून किंवा त्याचा एक भाग, भूगर्भात खोलवर कोंडलेला एखादा विषारी वायू त्या बखळीतल्या जमिनीतून वर झिरपून येत असावा. पशू-पक्षी-कीटक-फुलपाखरांची गैरहजेरी, गवत-तण-झुडपं यांच्यात आलेला रोगट पिवळेपणा हेच दाखवत होता; पण या प्रदूषणांचा मानवी मनावर मी कल्पना करीत होतो तसा परिणाम होईल का? माझ्या परिचयाच्या जीवशास्त्राच्या व रसायनशास्त्राच्या एकदोघा प्राध्यापकाबरोबर एक तात्त्विक बाब म्हणून मी यावर चर्चा केली. त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवात जरी असा प्रकार आला नव्हता तरी असा एखादा वायू असण्याची शक्यता ते नाकारीत नव्हते. उदाहरणार्थ (त्यांनीच सांगितलं) अमेरिकेने एक नवा गॅस तयार केला होता. त्याचा एक भपकारा देताच चांगला मोठा बोकासुद्धा समोर उंदीर येताच इतका घाबरतो की प्राणभयाने पळून जातो!

रणांगणातल्या सैनिकाच्या मोठ्या जमावावर अशा गॅसचा वापर केला तर काय परिणाम होईल? तेव्हा मानवी स्वभावावर परिणाम करणारे वायू असण्याची शास्त्रीय शक्यता नाकारता येत नव्हती. मात्र इथे प्रत्यक्ष तसं काही आहे का, हे तपासणी, नमुना गोळा करून त्याचे विश्लेषण, प्रत्यक्ष जागेवर प्रयोग, हे सर्व केल्याखेरीज काही सांगता येत नव्हतं. ही विचारांची एक दिशा झाली.

विचारांना दुसरीही एक दिशा आहे. या क्षणापर्यंत मी ती कोणाजवळही उघड केलेली नाही आणि गावाचं नाव इत्यादी तपशील यासाठीच दिलेला नाही.

गावाचा जुना इतिहास तपासता तपासता एका मोठ्या चमत्कारिक प्रसंगाची नोंद माझ्या पाहण्यात आली. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर गावात जमना नावाची जख्ख म्हातारी राहात होती. गंडे-दोरे-ताईत-अंगारा करून पोट भरीत होती. कदाचित खरोखरच काही विद्या असेल, कदाचित पोट जाळण्यासाठीही थापाथापी करीत असेल, पण पुढे ट्रॅजिडी आहे. गाव पाटलाचा सहा वर्षाचा मुलगा बेपत्ता झाला. ( पुढे पंधरा दिवसांनी शेजारच्या गावाहून परत घरीही आला. ) पण गावात अशी आवई उठली की जमना पोरांवर मंत्र टाकून त्यांची कुत्री बनवते. पोरासाठी पागल झालेल्या पाटलाने जमनाला पकडली, एका मोकळ्या बखळीत सोडली आणि तिच्यावर सहा-सात भुकेले, राक्षसी धनगरी कुत्रे सोडले. कुत्र्यांनी लचके तोडून तोडून जमनाचा जीव घेतला, तेव्हा म्हणे तिने असा शाप दिला की जो कोणी या बखळीत पाय ठेवेल त्याचंही या माझ्यामागे लागलेल्या वखवखलेल्या, माझा गळा घोटणाऱ्या जनावरासारखं जनावर होईल!

जमना ठार झाली; पण तिचा हा शाप मागे राहिला. ती बखळ सतत अपयशी ठरत गेली. ना तिथे कोणी औत धरला की नांगर घातला. तिथे खट्याळ पोरं कधी दंगा करायला गेली नाहीत. त्या शापाचं विष मातीच्या कणाकणात, गवता-झुडपाच्या पानापानात भिनलं होतं. आजतागायत ती बखळ तशीच ओस पडून होती आणि आता चंदूकाकांची ही हकीकत!

योगायोग म्हणा की काहीही म्हणा, त्या गावाहून माझी बदली झाली आणि गाव सोडायच्या आदल्याच दिवशी मी चंदूकाकांच्या पडीक घराला एकच भेट दिली. दुकानाच्या फळ्या चोरीला गेल्या होत्या. आतल्या सामानाचा केव्हाच लिलाव झाला होता. आता तिथे खाजगी असं काहीच नव्हतं. सर्वांना मुक्त प्रवेश होता.

आमची ती बुद्धिबळाची मागची खोली. धूळ खात पडलेलं टेबल आणि त्या दोन खुर्च्या, क्षणभर मला अगदी भडभडून आलं. चंदूकाका! सारं जग त्यांना एव्हानाच विसरून गेलं होतं. त्यांच्या आठवणीला शेवटचं एक अभिवादन करण्यासाठी मी इथे आलो होतो. मी खोलीच्या दारातून मागच्या अंगणात आलो आणि तिथून त्या वरवंडीपाशी आलो त्या बखळीकडे पाहात उभा राहिलो.

अश्विनातली उदासवाणी (कदाचित माझ्या मूडमुळे) संध्याकाळ होती. त्या उंच वाळक्या गवताच्या शेंड्यांतून वारा विव्हळत वाहत होता. मी इथे कशाला आलो होतो? चंदूकाकांबद्दलची एक शेवटची आशा! बखळीकडे पहिली नजर जाताच मला समजलं की इथे येण्यात आपण चूक केली.

मी त्या गवत-झुडपं-झाडाकडे पाहत असतानाच मला अशी अगदी स्पष्ट जाणीव झाली की पलीकडच्या त्या गवतातून कोणीतरी आपल्याकडे निरखून पाहत आहे. गवताच्या पडद्याआडच काहीतरी आपल्यासाठी टपून बसलं आहे. काहीतरी दुष्ट, काहीतरी भयानक, काहीतरी अमानवी...

मनाचा भीतीने चोळामोळा होत होता आणि तरीही त्याच वेळी अशी एक जबरदस्त इच्छा होत होती की धावत धावत त्या खसखसणाऱ्या गवतात मुसंडी मारावी...पाहता पाहता बखळीचं रूप-आकार-लांबीरुंदी बदलत होती. माझ्यासमोर त्या मळकट पिवळ्या गवताने, काळ्या वठलेल्या झाडांनी, काटेरी झुडपांनी भरलेलं मैलच्या मैल पसरत गेलेलं माळरान पसरलं होतं...आणि तिथून काहीतरी मला बोलवीत होतं...आत गवतात जायला, नाचायला, खालच्या ओल्या भुसभुशीत मातीत गडबडा लोळायला, त्या गवताचे दातांनी कचाकचा लचके तोडायला...वाटत होतं अंगावरची ही जखडणारी ओंगळ वस्त्रं टराटरा फाडून टाकावीत; ओरडत, किंचाळत गुरगुरत त्या छान छान गवतात घुसावं, पळत पळत जावं. तिथे हा आहे, ती आहे...

मी गर्रकन वळलो आणि जवळ जवळ धावतच त्या भयानक घरातून बाहेर पडलो. मागे काही येणार नाही ही खात्री असूनही दहादा तरी माझी नजर खांद्यावरून मागे जात होती...

घरी कसातरी पोचलो आणि देवाचे आभार मानीत नि:श्वास सोडला.

□□

# ३. कवटीतला कैदी

त्या लहानशा घरावर मृत्यूची सावली पडली होती. जणू काही घरातला हवेचा कण आणि कण या अंतिम चेतनेने भारला गेला होता. आत जरी नुसता पाय टाकला तरी समजत होतं की इथे सर्व ठीक नाही...इथे लवकरच काही तरी अशुभ घडणार आहे...

रमाबाई गणपतरावांच्या कॉटशेजारी बसल्या होत्या आणि एक प्रकारच्या सुन्न, विषण्ण, थकलेल्या नजरेने गणपतरावांच्या सुकलेल्या, सुरकतलेल्या पांढुरक्या, म्लान चेहऱ्याकडे पाहत होत्या. गणपतराव आता अक्षरश: अखेरच्या घटका मोजत होते. मनाला खोट्या आशेने फसवण्याची वेळ आता गेली होती. आज, नाही तर उद्या, नाहीतर परवा...एवढ्यातच केव्हातरी गणपतराव हे जग सोडून जाणार होते.

तसं पाहिलं तर गणपतरावाचं वय काही जास्त नव्हतं. जेमतेम पासष्ट. तशी पासष्ट वर्षांची पण खुटखुटीत शरीराची कितीतरी माणसं रमाबाईंना माहीत होती; पण गणपतराव त्यांच्यापैकी नसले पाहिजेत. एवढ्यातच त्यांचा दम संपला होता, पावलं रेंगाळली होती, शरीर थकलं होतं... आणि आता ते आयुष्याच्या सीमारेषेपाशी पोचले होते.

गणपतरावांना लहानसा ठसका लागला. रमाबाई एकदम पुढे वाकल्या. गणपतरावांचे डोळे अगदी सावकाश उघडले. जणू काही त्यांना आपल्या पापण्याही पेलवत नव्हत्या. मग ती नजर सावकाश रमाबाईकडे वळली.

''कसं वाटतं आता? काही त्रास होतोय का?''

''काही नाही-ठीक वाटतंय- ठीक वाटतंय.'' गणपतरावांचा आवाज खोल गेला होता, क्षीण झाला होता; पण शब्द तेच होते. गेली चाळीस वर्षे रमाबाई ते शब्द ऐकत आल्या होत्या. कोणीही त्यांच्यातून काहीही अर्थ काढावा असे शब्द. कांचेसारखे. स्वत:चा काही रंग नसलेले.

''काही आणू का? चहा? कॉफी? पेज?''

''चहा आणतेस का? मात्र साखर जरा जास्तच टाक हं-''

''हो आणते की''- रमाबाई म्हणाल्या आणि उठल्या. पण एव्हानाच गणपतरावांची नजर वर आढ्याकडे गेली होती. त्यांच्याकडे एकदाच पाहून रमाबाई जिना उतरून खाली स्वयंपाकघरात आल्या. गणपतरावांना आवडत असे तसा चहा बनवून केटली आणि कपबशी त्या ट्रेत ठेवू लागल्या; पण चहा मुरण्याची वाट पाहता पाहता त्यांच्या मनात विचार येत होते- गणपतराव आज ना उद्या जाणार...मग काय? तशी पैशाची नड भासणार नव्हती...पण...पण आयुष्यात जी एक भली मोठी पोकळी निर्माण होणार होती ती कशी भरून निघणार? आता त्यानंतर बोलायला कोण होते? त्या कोणाशी बोलणार? कोणावर रागावणार? कोणाला सल्ला देणार? कोणासाठी जगणार?

रमाबाई खोलीत येताच कपबशीच्या किणकिण आवाजाने गणपतरावांचे डोळे उघडले, दाराकडे वळले. त्यांचा आवडता चहा! ऑफिसमधून आल्या आल्या त्यांना असा चहा लागायचा. चहा दिसला की तो आनंद त्यांना डोळ्यातून काही केल्या लपवता यायचा

नाही. चिनीमातीच्या भांड्यातून रमाबाई त्यांना घोटाने चहा देत होत्या. चांगला दीड कप चहा. आपल्या मनात नाराजी उमटत आहे हे रमाबाईंना जाणवलं. त्यांनी मोठ्या प्रयासाने मनाला आवर घातला. त्यांना जर त्यात आनंद असला तर तो उपभोगू का न द्यावा? गोड फार नको- डॉक्टर एकदा म्हणाले होते- पण ते किती पूर्वी! आता कशाला काय अर्थ होता? सर्व काही दोन दिवसांवर आलं असताना...
त्यांची नजर खिडकीबाहेर गेली. बाहेर सोनेरी संध्याकाळ पसरली होती. किती छान ऊन पडलं होतं! नदीकाठची बाग किती प्रसन्न असेल! इथे बसावं लागलं नसतं तर त्या खासच एक चक्कर टाकून आल्या असत्या; पण त्यांना इथून हलता येत नव्हतं.
आता दोनतीन दिवसांचाच अवधी राहिलाय. गणपतराव मध्येच म्हणाले. इतके अचानक की रमाबाई दचकल्याच.
‘‘अं? काय म्हणालात?’’
‘‘म्हटलं की आता मी फार दिवसांचा सोबती नाही...आज, फार झालं तर उद्या... पण आता जायची वेळ आलीय रमा...’’
‘‘अगंबाई! हे काय भलतंच बोलताय आज?’’
‘‘रमा, आता कशाला नाटक करायचं? गणपतराव एक मोठा सुस्कारा टाकीत म्हणाले. तुला, मला, दोघांना माहीत आहे की माझ्या या अगदी अखेरच्या घटका आहेत. आता ते सत्य कशासाठी नाकारायचं? मरण ही काही इतकी अनैसर्गिक गोष्ट आहे का? मुळीच नाही! प्रत्येकावर ती वेळ यायचीच आहे. कशाला डोळेझाक करायची? आधी आधी मला धक्का बसला खूप भय वाटलं पण आता ते गेलं आहे. आता तर मनात जरासं कुतूहलच आहे...आहे तरी कसा मृत्यू हा?’’
रमाबाई गणपतरावांकडे पाहातच राहिल्या. ‘‘बाई! बाई! काय तरी बोलताय! निदान माझा तरी जरा विचार कराल की नाही? मला काय वाटेल असं ऐकून?’’
‘‘तसं नाही ग-तसं नाही ग रमा - तुला दुखवायचा माझा मुळीच हेतू नव्हता; पण सर्व काही एकदा स्वच्छ, मोकळं झालेलंच चांगलं नाही का? दोघांच्या मनावर हा ताण हवा कशाला? चोवीस तास आपण दोघं एकमेकांच्या सहवासात असणार...एकमेकांना कसं आणि किती फसवणार? आणि तुला एक विचारू?’’
‘‘काय?’’ रमाबाई अजून त्या धक्क्यातून पुऱ्या सावरल्या नव्हत्या.
‘‘पुढे काय होणार आहे माझं? हे पाप-पुण्य, हा स्वर्ग-नरक, ही केल्या कर्माची फळं...खरोखर काय होणार आहे माझं?’’
‘‘जन्मभर कधी देवाचं नाव घेतलं नाहीत आता वेळ आली तशी भीती वाटायला लागलीय-’’ रमाबाई जरा तिखट आवाजात म्हणाल्या.
‘‘आणि देव देव केलं असतं तर काय स्वर्गात गेलो असतो?’’
‘‘स्वर्ग सोडा...पण देवासमोर सर्वांनाच जायचंय...’’
‘‘आणि त्याला काय इतर कामं नाहीत? रोज लाखांनी लोक मरताहेत...ते काय देवासमोर रांग लावून उभे आहेत? मी मस्करी करीत नाही, रमा, पण कितीही विचार केला तरी काही उत्तरच सुचत नाही. नुसते प्रश्नच प्रश्न. उत्तर एकाचंही नाही. खरोखर पलीकडे मी

कसा असेन गं?''
''कसे म्हणजे काय? असेच की! आता जन्मभर आहात तसेच!''
''अं हं- मला नाही तसं वाटत'' गणपतराव म्हणाले,''हा जो मी तुला जन्मभर दिसत आलोय तो आतला खरा 'मी' आहेच कशावरून? हा मी शरीरधर्म, संस्कार, परिस्थिती, आनुवंशिकता, स्मृती, अनुभव या सर्वांचा मिळून तयार झाला आहे; पण एकदा का शरीराचे पाश सैल झाले, मी स्वतंत्र झालो, की मग मी कोणीतरी वेगळाच असेन.
''छे! काहीतरीच बडबडताहात!'' रमाबाई त्वेषाने म्हणाल्या.
''काहीतरी नाही रमा. हा विचार करता करताच मला मागची एक आठवण आली. आपण सर्कस पाहायला गेलो होतो. त्याआधी शिकारखाना पाहत होतो. वाघाच्या पिंजऱ्यापाशी उभे होतो. आठवतो का तो वाघ? कसा शांतपणे पहुडला होता...आरामात शेपटी हलवीत होता...गलेलठ्ठ, गुबगुबीत, जराशा मोठ्या बोक्यासारखा... पण खरोखरीच तो तसा होता का? समजा, पिंजऱ्याचं दार उघडलं असतं... पिंजऱ्याबाहेर तो असा शांत, माणसाळल्यासारखा आला असता? मला विचार करता करता वाटलं- आपली ही शरीरं म्हणजे हाडामांसाचे पिंजरेच नाहीत का? आत काय डांबून ठेवलं आहे ते कोणास ठाऊक असतं? एकदा ही पिंजऱ्याची दारं खुली झाली की कोणास ठाऊक बाहेर काय येतं ते!''
''हे पाहा, मी आता एकही शब्द ऐकणार नाही! तुम्ही जर असं काहीबाहीच बडबडणार असाल तर मी इथे थांबतच नाही कशी-''
''अजूनसुद्धा, तू मला बोलू देणार नाहीस का रमा? अगदी शेवटच्या घटकेपर्यंतही मला अबोल ठेवणार आहेस का?''
''तुम्हालाच मागनं त्रास होतो. पडा जरासे. चहा आणू का कपभर?''
''हो आण...आणि साखर जरा जास्तच टाक बरं का...''

***

रमाबाई चहा घेऊन वर आल्या; पण गणपतराव झोपले होते. गेल्या काही दिवसांत त्यांचं शरीर खूपच कृश झालं होतं. पातळ शालीसारखी त्यांची छाती सावकाश वरखाली होत होती. तोंड किंचित उघडं होतं. खालचा ओठ प्रत्येक श्वासागणिक जरासा हलत होता. त्या थकलेल्या चेहऱ्याकडे पाहता पाहता रमाबाईच्या मनात अनेक संमिश्र विचारांचा गोंधळ माजला. काही क्षण त्यांचा या गोष्टीवर विश्वासच बसेना की समोर शांतपणे झोपलेले हे गणपतराव फार तर काही दिवसांचेच सोबती आहेत...काही दिवसांतच ते या जगातून जाणार...मागे राहणार ते एक निर्जीव कलेवर...मघाच्या त्यांच्या चमत्कारिक शब्दातला शरीराचा पिंजरा... पण उघडल्या दाराचा...
आता ते खरे गणपतराव कोठे होते? माणूस झोपला की म्हणे त्याचा अशरीरी आत्मा खूप लांबवर भ्रमंती करून येतो. (फक्त जागतेपणी या प्रवासाची आठवण राहात नाही एवढंच! ) मग आता काय गणपतरावांचा आत्मा त्या नव्या प्रदेशावर नजर टाकायला गेला होता? (जिथे आता त्यांना एवढ्यातच जायचं होतं!) असल्या वेड्यावाकड्या विचारांचा त्यांचा त्यांनाच राग आला; पण राग आला तरी मनातला प्रश्न दूर कोठे होत होता? मृत्यू हा खरा शेवट होता की एक संक्रमण होतं? आणि संक्रमण असलं तर कशात?

संध्याकाळच्या वाऱ्याने खिडकीचा पडदा फडफडत होता. रमाबाई खिडकी लोटून घेण्यासाठी पुढे झाल्या. त्यांच्या घरासमोरच्या ओळीत ( आणि घराच्या दोन्ही अंगांना ) हौसिंग सोसायटीचे बंगले होते. सर्व एकासारखे एक. विटांची दोन मजली खोकीच. खाली दोन खोल्या, वर दोन खोल्या, मागे पुढे बाल्कनी. लहानसं चौरस अंगण. कुंपण. फाटक आणि प्रत्येक खोक्यात दोन-चार-सहा अशी माणसं. असे हे सर्वजण इथे एकत्र का आले होते? आणि आपापली अल्प आयुष्यं जगल्यानंतर कोठे जाणार होते?
गणपतरावांचा रमाबाईंना राग आला. मघाच्या त्यांच्या त्या चमत्कारिक शब्दांनीच त्यांच्या विचारांना ही असली नको ती दिशा मिळाली होती. रागाने त्या गणपतरावांकडे वळल्यासुद्धा; पण ते तसेच शांत झोपले होते. एक सुस्कारा सोडून रमाबाई खाली स्वयंपाकघरात आल्या.
***
गणपतरावांना फारशी भूक लागत नसे तरीही रमाबाई त्यांच्यासाठी मूठभर तांदुळाचा भात नेमाने करीत. पातळसर भातात चमचाभर साजूक तूप, मिठाची कणी, आंब्याच्या लोणच्याचा एवढासा खार...गणपतराव त्यातला चमचा दोन चमचे भात खात. पोटाला काहीतरी धीर, रमाबाईंना वाटे.
आताही त्या तांदूळ धुवून आधणात वैरण्यासाठी ओट्याकडे वळल्या आणि एकाएकी थबकल्या. दाराच्या जरासे आत गणपतराव उभे होते. सर्व शरीरावरून भयाचा सरसरता काटा गेल्यासारखा रमाबाई शहारल्या. आधी त्यांच्या तोंडून शब्दच फुटेना. मग त्या दबक्या, घोगऱ्या आवाजात म्हणाल्या,
“अग बाई! हे काय? तुम्ही कशासाठी असे खाली आलात?”
आणि मग त्या गप्प बसल्या. गणपतराव खाली येणं शक्यच नव्हतं. त्यांना तर कुशीवर वळण्याइतकंही त्राण नव्हतं आणि असा लालभडक अंगरखेवजा शर्ट गणपतरावांना नव्हताच. रमाबाईंनी त्यांना असले कपडे कधीच वापरू दिले नसते. दाराच्या जरा आत उभा राहिलेला गृहस्थ दिसायला अगदी गणपतरावांसारखा होता. लालभडक अंगरख्याखाली गुडघ्यापर्यंतचा भाग झाकला गेला होता. चेहऱ्यावर रेषा नव्हत्या; पण चेहरा पांढरा फटक होता. अगदी एखाद्या प्रेतासारखा. जिवंत होते ते फक्त डोळे, काळे कुळकुळीत, दिव्याच्या प्रकाशात लुकलुकणारे, रमाबाईच्यावर एकटक खिळलेले रमाबाईंनी हाताची मूठ तोंडात कोंबली होती. एक एक पाऊल करीत त्या मागे सरत होत्या. त्यांची पाठ भिंतीला लागली. आता मागे जायला जागाच नव्हती आणि अजूनही तो लाल अंगरख्यातला गणपतरावांसारखा दिसणारा गृहस्थ रमाबाई घोगऱ्या आवाजात किंचाळल्या.
गणपतरावांची आकृती एकाएकी दिसेनाशी झाली. दिवा मालवताच सावली जावी तितकी झटपट. जाग येताच स्वप्न विरघळून जावं तशी. एक-दोन सेकंद रमाबाई होत्या तशाच गोठल्या शरीराने उभ्या राहिल्या आणि मग एक खूप मोठा, थरथरता श्वास सोडून त्या ओट्याकडे वळल्या. ती क्रिया केवळ हजारदा केली होती म्हणूनच त्यांना जमली. तांदूळ वैरले, झाकण ठेवलं, गॅस कमी केला आणि मग मागच्या एका खुर्चीवर बसून त्या

हलकेच रडायला लागल्या स्वत:शीच, आवाज न करता...

✻✻✻

रमाबाई वरच्या खोलीत आल्या, तेव्हा गणपतराव जागेच होते. त्यांच्या चेहऱ्यावर अगदी क्षीणसर असं एक हास्य होतं. दोनतीन तास अगदी छान झोप लागली होती ते म्हणाले. रमाबाई काहीच बोलल्या नाहीत. गणपतरावांची नजर रमाबाईंच्या हलत्या आकृतीबरोबर हलत होती. रमा! ते म्हणाले, रमा? तुझा चेहरा अगदी ओढलेला दिसतोय...दमतेस ना?

''नाही नाही-'' त्या म्हणाल्या. ''मला तसं काही होत नाहीय.''

''आता फार दिवस नाही राहिले.'' गणपतराव त्यांच्या खिन्न आवाजात म्हणाले, 'एकदा सारं आटोपलं की मग मात्र तुला विश्रांती मिळेल.'

''हे पाहा... असं बोलू नका म्हणून सांगते ना!'' मनात दु:खमिश्रित भीतीची भरती आली. कमकुवत झालेले बांध ढासळले. डोळ्यांना पाणी आलं.

''रमा! रमा! तुला दाखवण्यासाठी नव्हतो काही मी बोलत-''

''तुम्ही जाऊ नका! तुम्ही जाऊ नका! रमाबाई त्वेषाने, अगदी मनापासून, पोटतिडिकीने बोलत होत्या. दुपारचा स्थितप्रज्ञपणा कोठच्या कोठे तडकला होता. मनात एवढा बदल कसा झाला हे त्यांना समजत नव्हतं. (किंवा समजून घ्यायचं नसेल!) पण पुढे वाकून त्या त्वेषाने पुन्हा पुन्हा म्हणत होत्या-ऐकलंत ना! सांगून ठेवते! असं मला टाकून जायचं नाही! अजिबात जायचं नाही!''

रमाबाई दम घेण्यासाठी थांबल्या. गणपतरावांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा ते अगदी क्षीण हास्य आलं होतं. ''रमा, माझ्या हातात असतं तर मी तुझं ऐकलं असतं; पण ही वेळ वेगळी आहे. इथे तुझ्या शब्दांनी काही व्हायचं नाही. माझ्या मनात नसतानाही मी आयुष्यभर तुझं ऐकत आलो.''

''पण तुमच्या चांगल्यासाठीच मी सांगत आले ना!'' क्षणभर आपला शोक, आपली भीती विसरून रमाबाई म्हणाल्या.

''तुझा हेतू कदाचित चांगला असेलही पण-''

''पण काय?''

''काही नाही...मनात आल्यावाचून राहात नाही. समजा अमुक झालं असतं ती नोकरीचीच गोष्ट घे समजा, त्या शिंदेबरोबर भागीदारीत गेलो असतो.''

''चांगली सोन्यासारखी नोकरी सोडायला निघाला होतात! आणि तो शिंदे म्हणजे नंबर एकचा भामटा! मी होते म्हणून तुम्ही वाचलात.''

''हो, तेही काही खोटं नाही...पण पुन्हा संधी मिळते का? एकदा तरी साहसाचा धोका पत्करायला काय हरकत होती? आता मनाला अशी रुखरुख लागते.'' एवढं बोलल्याचाही गणपतरावांना थकवा आला होता. कपाळावर घामाचे थेंब चमकायला लागले होते.

''तुम्ही आता जरा स्वस्थ पडा. मी भात घेऊन येते. ज्या गोष्टी झाल्या त्या झाल्या. जर तरच्या गोष्टी आता कशाला? बरोबर आहे ना मी म्हणते ते?''

''हो ना रमा...तुझं नेहमीच बरोबर असतं.'' गणपतरावांनी डोळे मिटून घेतले होते; पण

ओठांच्या कडा एका अगदी अस्पष्ट, संदिग्ध अशा कडवट हास्यात दुमडल्यासारखा वाटत होत्या.

***

डॉक्टर सकाळी नऊच्या सुमारास आले. त्यांची तपासणी औपचारिक होती. स्टेथॉस्कोप खिशात कोंबता कोंबता त्यांनी हाताने बॅग मिटवली, उचलली. दारापाशी ते जरासे थांबले. ''आहे तसंच आहे रमाबाई. आशा तर नाहीच. फक्त तग किती धरतात पाहायचं. जास्तीत जास्त दोन दिवस; पण मनाची तयारी ठेवा. कदाचित आजची रात्रही निघणार नाही...''

डॉक्टरांच्या शब्दाला वरकरणी मानेने हो म्हणत होत्या; पण त्यांचं मन आतून भीतीने करपून जात होतं. लहानशा घरातला अवकाशाचा कण अन् कण भीतीने भारल्यासारखा वाटत होता. डॉक्टरांना त्यांच्या मन:स्थितीची बहुतेक कल्पना आली असावी. रमाबाई, इथे घरात एकट्याच असता ना तुम्ही? मग मदतीला कोणाला तरी बोलवा ना? का एखादी नर्स पाठवू? नाहीतर तुमच्या ओळखीचं, नात्यातलं येण्यासारखं कुणी नाही का? निदान रात्री तरी तुम्हाला जरा विश्रांती मिळायला नको का?''

''तुमचंही वय आता काही कमी नाही काय? पाठवू का नर्स?''

''नको नको मी बोलावून घेते कोणाला तरी''

ठीक आहे; पण आजच बोलवा हं.

डॉक्टर गेले. रमाबाईंनी गणपतरावांच्या खोलीत एक नजर टाकली. ते झोपले होते. चेहरा ओढलेला होता; पण शांत वाटत होता. दारातच उभ्या राहून त्या मनाशी विचार करीत होत्या. चटदिशी आंघोळ-पूजा उरकून टाकावी का? दहा पंधरा मिनिटात काही भलतच होणार नाही ना?

मन घट्ट करून त्या खाली आल्या. त्यांनी चटदिशी स्नान उरकलं, कपडे गरम पाण्यात भिजवले, देवाची पूजा आटोपली आणि मग त्या मागच्या व्हरांड्यातल्या तुळशीला पाणी घालायला स्वयंपाकघरात आल्या आणि जिवाला हिसका बसून गोठल्या. व्हरांड्याच्या दारातच गणपतराव उभे होते. तोच तो लाल पायघोळ अंगरखा, तोच तो पांढरा फटक प्रेतवत चेहरा आणि तेच ते चकाकते, एकटक खिळलेले डोळे. त्या डोळयांत काय होतं? राग? द्वेष?

ती आकृती सावकाश सावकाश रमाबाईंच्या दिशेने पुढे सरकत होती. भेदरलेली नजर रमाबाईंना त्या लकाकत्या काळया डोळयांतून सोडवून घेताच येईना ते ते आणखी जवळ आले रमाबाईंच्या तोंडून विव्हळल्याचा अगदी अस्फुटसा आवाज आला. त्या मागे मागे सरकत स्वयंपाकघराच्या भिंतीला पाठ लावून उभ्या राहिल्या. त्यांच्यावर खिळलेली ती नजर त्यांच्या हालचालीबरोबर वळत होती. स्वयंपाकघराच्या दाराशी शेवटी ते थांबले. पांढरेफेक ओठ जरासे विलग झाले आणि एक घोगरी पुटपुट रमाबाईच्या मेंदूतून झणझण करीत गेली.

''मला...मला...प्रयत्न...करायची...संधीसुद्धा...मिळाली नाही...''

मग ते सावकाश वळून स्वयंपाकघरातून बाहेर व मग वरच्या खोलीकडे जाणाऱ्या

जिन्याकडे सरकत सरकत गेले.
रमाबाईंना हालचाल अशक्य होती, आवाज अशक्य होता, विचारही अशक्य होता. शरीर, घसा, मन सर्व काही पोलादी साखळीने जखडून ठेवलंसं वाटत होतं. भिंतीला टेकवलेले हात दगडाचे होऊन भिंतीतच रुतल्यासारखे झाले होते. पापण्या हलवता येत नव्हत्या, नजर फिरवता येत नव्हती, श्वासही घेता येत नव्हता. ठण् ! आवाज करीत अर्ध्या तासाचा टोला पडला आणि रमाबाई भोवतालच्या शृंखला खाली खळखळत पडल्या. त्यांनी खूप मोठा श्वास घेतला आणि 'देवा रे!' म्हणत हुंदक्याने बाहेर सोडला आणि त्यांनी हाताने ओटा धरला नसता तर त्या खालीच कोसळल्या असत्या. पाय ओल्या मातीच्या गोळयांचे झाले होते आयुष्याचं ओझंच एकाएकी असह्य झालंसं रमाबाईंना वाटलं. ते आपल्याला पेलणार आहे का?
भिंतीचा आधार घेत घेत त्या स्वयंपाकघराबाहेर आल्या, जिन्याने सावकाश सावकाश वर आल्या. मघाशी याच जिन्याने ती लाल आकृती वर गेली होती- किंवा त्यांना दिसली होती; पण नवलाची गोष्ट म्हणजे गणपतरावांना त्या आकृतीपासून काही धोका असेल अशी कल्पनासुद्धा त्यांच्या मनाला शिवली नाही. उलट गणपतरावांचाच त्यांच्यात काहीतरी संबंध आहे, अशी एक शंका त्यांना यायला लागली होती. त्या खोलीत पोचल्या तेव्हा गणपतराव जागेच होते. दाराकडेच पाहत होते. रमाबाई थकून खुर्चीवर बसताच ते जिव्हाळ्याने म्हणाले, ''रमा, कोणाला तरी मदतीसाठी बोलवून का नाही घेत? नाहीतर एखादी नर्स तरी पाहा. तुला एकटीला एवढं कसं झेपेल आणि सोसवेल? तुला आपल्या प्रकृतीची काळजी घ्यायला नको का?'' त्यांच्या आवाजातलं प्रेम, जिव्हाळा नाटकी नव्हता. रमाबाईच्या डोळयांना एकाएकी पाणी आलं. मनात विचार आला- मग...मग...ते दुसरे गणपतराव असे क्रूर, खुनशी का वाटले होते? का गणपतरावांना त्या खरोखर ओळखतच नव्हत्या? एकाएकी आदल्या दिवसाचे गणपतरावांचे ते चमत्कारिक शब्द त्यांना आठवले,...''एकदा ही पिंजऱ्यांची दारं खुली झाली की कोणास ठाऊक बाहेर काय येतं ते! गणपतराव हे स्वत:च्या अनुभवावरून तर नव्हते ना बोलले? गेली कितीतरी वर्ष त्या असल्या एखाद्या हाडामांसाच्या पिंजऱ्याबरोबर तर राहात नव्हत्या? ज्या पिंजऱ्यात सुटकेच्या क्षणाची वाट पाहणारा, सूडाच्या आगीने वखवखलेला हिंस्र वाघ होता? आणि गेली इतकी वर्ष त्या अजाणतेपणाने गणपतरावांना दुखावत आल्या होत्या, त्यांचा हिरमोड करीत आल्या होत्या, त्यांच्या आशा-आकांक्षा महत्त्वाकांक्षावर बोळा फिरवित आल्या होत्या, त्यांना हिणवत आल्या होत्या... आणि या अपमानावर, या कुत्सित निर्भर्त्सनेवर आतला सूडकारी वाघ दिवसा-दिवसागणिक पुष्ट होत चालला होता...
''रमा? अशी काय पाहते आहेस? काही बोलत का नाहीस?''
''नाही-नाही-काही नाही-आताशी मला काही सुचतच नाही.''
''च! असा धीर सोडून कसं चालेल? ही वेळ सर्वांवरच यायची असते.''
''नाही-नाही-नको! नको! तुम्ही जाऊ नका हो!'' रमाबाई अगदी कळवळून म्हणाल्या. दोनच दिवसांत त्यांच्यात केवढा बदल झाला होता?
''या गोष्टी कोणाच्या हातातल्या का असतात रमा! मला एकच गोष्टीचं वाईट वाटतं.

आपण दोघंच्या दोघंच राहिलो. रमा, तुला दोष देत नाही...पण...पण काही मूलबाळ झालं असतं म्हणजे...''
रमाबाई मान वर करून गणपतरावांकडे जरा संशयाने पाहू लागल्या; पण ते प्रांजलपणे बोलत होते. मुलाचा विषय त्यांनी मुद्दाम काढलेला दिसत नव्हता. सुरुवातीसुरुवातीस त्या दोघांच्यात तो खूप वेळा चर्चेचा आणि काही वेळा वादाचा विषय झाला होता. विवाहानंतर दोनतीन वर्षांतच त्यांना समजलं होतं की त्यांच्या संसारात नैसर्गिकरीत्या मूलबाळ येणार नाही. डॉक्टरांच्या मते शस्त्रक्रिया आवश्यक होती आणि रमाबाईंनी त्याला ठाम नकार दिला होता. आयुष्यभर त्यांच्या विचारात बदल झाला नव्हता. शेवटी शेवटी तर या विषयावर बोलायलासुद्धा त्या तयार नसत.
आता त्यांना वाटलं, त्या नोकरीसारखंच हेही इतकी वर्ष यांच्या मनात असं घर करून आहे की काय?...आणि त्या लाल आकृतीच्या द्वेषामागे, रागामागे हेही एक कारण होतं की काय?
''आता कशाला नसते विषय काढून डोक्याला त्रास करून घेता?'' रमाबाई म्हणाल्या. आपली रखमा मोलकरीण आली की तिला खोलीच्या दाराशी जरा वेळ उभी करते अन् मी गोडश्यांच्या यमीला घेऊन येते.
''हो-हो-खरंच आण-'' गणपतराव म्हणाले.
***
गोडश्यांच्या यमीकडे रमाबाई गेल्या होत्या; पण तिच्याच मुलाला बरं नव्हतं तेव्हा ती सर्व दिवस काही येऊ शकणार नव्हती. दुपारी चार वाजता तिचे यजमान कामावरून आले की ती येणार होती आणि मग रात्री नऊपर्यंत थांबणार होती. रमाबाई जरा निराश मनानेच परत आल्या. गणपतरावांचे भाताचे दोन घास खाऊन झाले. रमाबाईंनीही जरासं जेवून घेतलं आणि मग त्या वरच्या खोलीत येऊन आरामखुर्चीत बसल्या. गणपतरावांचे डोळे मिटलेले होते, श्वास नियमित चालला होता; पण त्यांना झोप लागली होती का ते नुसते पडले होते हे कळणं कठीण होतं.
दुपारी चारला यमी आली. तिघांचा चहा झाला. ( गणपतरावांचा सौम्य आणि खूप गोड ) आणि मग जराशा निश्चिंत मनाने रमाबाई कॉटवर आडव्या झाल्या. त्यांना झोप तत्काळ लागली पण...
त्या एका सपाट मैदानावरून चालत होत्या. त्यांच्या पुढेच काहीशा अंतरावर दोन मुलं चालली होती. बहीणभाऊ असावेत. भाऊ तेरा-चौदा वर्षांचा, बहीण पंधरा-सोळा वर्षांची. त्यांचे चेहरे रमाबाईंना दिसत नव्हते; पण ते चेहरे पाहण्यासाठी त्यांचा जीव अगदी तळमळत होता. कितीही प्रयत्न केला तरी त्यांच्यातलं अंतर कमी होतच नव्हतं. मुलं आपापसात काहीतरी बोलत होती; पण मधून मधून आई, 'आई,' हा एकच शब्द तेवढा रमाबाईंच्या कानावर येत होता...जड पाय उचलता येत नव्हते. हाक मारली तर आवाज येत नव्हता...त्या पुढे पुढे चालल्या होत्या...
''रमाकाकू! रमाकाकू!'' यमीच्या हाकांनी त्यांना जाग आली.
''काय? काय?'' खडबडून जाग्या होत त्या म्हणाल्या.

मी निघते आता. काकांना आताच औषध दिलंय. त्यांचा भातही शिजत लावलाय. आता मला जायला हवं.
या घरात आता एकट्याने रात्र काढायची! पोटात आजवर भीतीने असा गोळा कधी उठला नव्हता; पण यमीला तरी त्या काय सांगणार?
''बरं'' म्हणत त्या तिला पोचवायला दारापर्यंत आल्या. बाहेर पडताना तिने खट् ! आवाज करून फाटक लावून घेतलं. रमाबाई दारातच उभ्या होत्या. दार बंद करायला त्यांचा हात धजेना. दार बंद करायचं. स्वत:ला या विटांच्या पेटीत कोंडून घ्यायचं. आपण...आणि...आणि काय? ज्या अवकाशातला कणकण त्यांच्या परिचयाचा होता, ज्या घरातला इंच आणि इंच त्यांचा आवडता होता, तेच सर्व घर, आता शत्रूसारखं झालं होतं. ते घर भयाचा सापळा झालं होतं. एक पिंजरा झालं होतं. त्यात स्वत:ला कोंडून घ्यायची त्यांना भीती वाटत होती. या घरात त्यांनी आजवर अनिर्बंध सत्ता गाजवली होती. केवळ निर्द्रव्य, निर्जीव वस्तूंवरच नाही. घरात राहणाऱ्या व्यक्तीवरही. गणपतरावांवरही. कोणतेही व सर्व उपाय योजून त्यांनी गणपतरावांचं आयुष्य आपल्या मनासारखं घडवलं होतं. गणपतरावांच्याच भल्यासाठी त्या आजवर समर्थन करीत आल्या होत्या. गणपतरावांच्या इच्छा पोरकट, बेजबाबदार, स्वार्थी म्हणून दूर सारल्या गेल्या होत्या आणि कोळिष्टकं कोपऱ्यात सारावीत तशा; पण त्यांना काय माहीत की कालांतराने ती सडून, कुजून त्यातून असं काहीतरी विषारी निर्माण होईल?
इंचाइंचाने करीत रमाबाईंनी बाहेरचा दरवाजा बंद केला. त्या सावकाश वर गेल्या. गणपतराव जागे होते. दाराकडेच पाहत होते. दिव्याच्या प्रकाशाने चेहऱ्यावर सावल्या आल्या होत्या. गेल्या दिवसभरात त्यांचा चेहरा आणखी ओढला गेला होता, रंगहीन झाला होता, डोळे आणखी खोल गेले होते.
''यमी गेली का?'' शब्द अगदी बारीक आवाजात येत होते.
''हो गेली.'' तुमचा भात आणू का?
''नको. आता काही नको. त्यांनी डोळे मिटले. यमीने मघाशी चहा दिलाय...आता झोपतो.''
गणपतराव झोपत होते! रमाबाईंच्या पोटात एकदम धस्स झालं! जर त्यांना दोनदा आलेला अनुभव खरा असेल तर...तर...
''हे पाहा!'' गणपतरावांना जरासं हलवित त्या म्हणाल्या. गणपतरावांनी अगदी सावकाश डोळे उघडले. नजर सावकाश फिरून त्यांच्यावर आली.
''हे पाहा, मला एक सांगता का? तुम्हीच सकाळी म्हणाला होतात आता हा विषय टाळायचा नाही. तेव्हा एक विचारते तेवढं सांगता का?''
''अं?'' गणपतराव अर्धवट स्वगत, अर्धवट मोठ्याने म्हणाले.
''आपण उभा जन्म एकमेकांच्या सहवासात काढला. तुमचं आयुष्य सुखात, समाधानात गेलं ना?'' रमाबाईची छाती धडधडत होती.
''सुख-समाधान...नुसते शब्द.'' गणपतराव पुटपुटले.
''मला सांगा ना...कशाचा शोक, कशाचं दु:ख होतंय का?''

काही वेळ गणपतराव नुसतेच वर पाहात राहिले. मग अगदी हलकेच म्हणाले,''माणसाला कितीतरी गोष्टी हव्या असतात रमा! त्याचं समाधान कधी होईल का? तो कायमच अतृप्त राहतो! सुखी कोण झालाय? मला तूच सांग!''
ते शब्द रमाबाईंच्या कानात तापल्या तेलासारखे पडले. सुखी माणसाचे ते शब्द खासच नव्हते. ज्याने स्वत:च्या आयुष्यावर खूप विचार केला आहे, ज्याच्या मनात कोणता तरी अन्याय सतत खुपत आहे अशा माणसाचे शब्द.
''पण...पण...मी तुम्हाला कधी विरोध केला असला, कधी कशाला नकार दाखवला असला तर... तर ते आपल्या दोघांच्या भल्यासाठीच होतं.''
''साऱ्या आयुष्यात मी तुला कधी दोष तिला आहे का रमा?''
साऱ्या आयुष्यात...सारी खोली गारीगार झालीशी त्यांना वाटली. त्यांना वाटलं, आपण एका उभ्याच्या उभ्या कड्याच्या काठावर उभं आहोत; पायाखाली काळीकुट्ट दरी आहे...एक पाऊल पुढं घेतलं तर...
त्यांनी ते पाऊल टाकण्याचं धाडस केलं.
''आणि हे आयुष्य संपल्यावर? मग?''
''पुढचं कोणाला...माहीत...आहे...रमा...'' गणपतरावांनी डोळे मिटले होते...कदाचित ते झोपलेही असतील...झोपलेही...त्याचा अर्थ ध्यानात येताच रमाबाई एकदम कावऱ्याबावऱ्या होऊन खोलीवरून गांगरलेली नजर फिरवू लागल्या. वर्षानुवर्षाच्या सरावाची खोली, खिडक्यांचे, फुलांचे पडदे, फोटो, अलमारी, अलमारीच्या आरशात प्रतिबिंबित झालेला मागचा भाग. परिचित वस्तू. दिलासा देणाऱ्या वस्तू. त्यांच्यात भयकारक असं काय राहणार?
भिंतीवरचं घड्याळ टकटकत होतं; पण बाह्य जगाच्या कालगणनेशी रमाबाईंचा संबंध राहिला नव्हता. त्यांची स्वत:ची मोजपट्टी वेगळीच होती. तिथे एक मिनिट तासासारखं वाटत होतं. गणपतराव झोपले होते. छातीची अगदी बारीक हालचाल सोडली तर बाकी पूर्ण निश्चल. आता त्यांच्या मनात कसले विचार येत असतील? आता झोपेत कसली स्वप्नं पडत असतील? गणपतराव एकदम दचकले, स्वत:शीच कण्हले, डोळे उघडून वर पाहू लागले. त्यांचे ओठ हलत होते. रमाबाईंनी कान ओठांच्या अगदी जवळ नेला.
''मुलं...हवी...होती...मुलं...रमा...रमा...''
एखादा फटका बसल्यासारख्या रमाबाई दचकून मागे सरल्या. कदाचित त्या आवाजाने असेल, गणपतरावांची वटारलेली नजर त्यांच्यावर वळली...पण त्या नजरेत आता सावधपणा नव्हता; डोळे काही पाहत नव्हते; क्षणभर रमाबाईंना एक भयानक शंका आली; पण नाही, त्यांची छाती अजूनही खालीवर होत होती. हा अंत नव्हता...पण एक भयानक मध्यंतर होतं.
त्या शांततेत खालच्या मजल्यावर एक दार धाडकन उघडल्याचा आवाज आला. त्यामागोमाग फरशीवर दणदण पडणाऱ्या पावलांचा आवाज आला. पुरुषी पावलं. मग स्वयंपाकघराचं दार कोणीतरी दाणदिशी उघडलं...आणि मग काही वेळ शांतता राहिली...काळीज गोठवणारी शांतता...रमाबाईंवी मान एकदा गणपतरावांकडे आणि

एकदा खोलीच्या दाराकडे अशी आलटून-पालटून वळत होती. गणपतरावांचे न मिटणारे डोळे अजूनही त्यांच्यावर तसेच खिळले होते. खळळळ! काचा खळखळत पडल्याचा आवाज आला. स्वयंपाकघरातलं त्यांचं क्रोकरीचं कपाट! त्यामागोमाग कांचेची भांडी, कपबशा, केटल, डिशेस...त्या फरशीवर खळखळत पडल्या...आणि मग पुन्हा एकदा ती जीवघेणी शांतता. आवाज थांबला तसा रमाबाईंचा श्वासही छातीत अडकून राहिला.
मग पुन्हा ती पावलं चालायला लागली. स्वयंपाकघरातून माजघरात आली आणि माजघरातून जिन्याच्या तळाशी येऊन थांबली...जिन्याच्या तळाशी ते उभं होतं...वरच्या खोलीकडे पाहत उभं होतं...होता नव्हता तो सारा धीर एकवटून रमाबाई उठल्या आणि धावत जाऊन त्यांनी खोलीचं दार लावून त्याला बोल्ट लावला आणि धापा टाकत त्या परत गणपतरावांच्या कॉटपाशी आल्या. पावलं जिना चढत होती. सात, आठ, नऊ, दहा, अकरा, पायऱ्या. दाराबाहेर कोणीतरी उभं होतं आणि मग रमाबाईंना एकाच वेळी दोन दिशांकडून आवाज आले. तारवटलेल्या डोळयांनी पाहणाऱ्या गणपतरावांच्या तोंडून आणि खोलीच्या दाराबाहेरून...पण शब्द एकच होते.
‘‘मुलं...मुलं... कोठे आहेत आपली मुलं?’’
दाराला बाहेरून हलकासा धक्का बसला. दाराचा बोल्ट करकरला. रमाबाई एकदम पुढे झाल्या आणि गणपतरावांचा खांदा गदागदा हलवीत हुंदके देत म्हणाल्या.
‘‘अहो!अहो! ऐकता का? जागे व्हा हो! देवा! अहो, उठा!’’
डोळयांच्या पापण्या फडफडल्या; मान जराशी हलली; आवंढा घेतल्यासारखी घशाची हालचाल झाली; मग गणपतराव हलकेच पुटपुटले,
‘‘काय...काय...रमा?...काय आहे?’’
खुर्चीत बसून रमाबाई रडत होत्या आणि त्याच वेळी मनातून एक जळता विचार धावत होता...आपल्याला हे किती काळ सहन होणार आहे? आणि मग त्यांना गणपतरावांचा हलका, पुटपुटता आवाज ऐकू आला-
‘‘रमा...एकदा सांगितलं...ना? माझ्यासाठी...का... शोक करतेस?’’
रमाबाई गणपतरावांच्या फिकुटलेल्या, सुरकतलेल्या, चिंतातुर चेहऱ्याकडे पाहतच राहिल्या...इतके साधेपणाने हे बोलूच कसे शकतात? त्यांना कल्पनाही नव्हती की झोपेत किंवा ग्लानीत त्यांचे डोळे जरासे मिटले की त्यांचाच अंश असलेला तो हिंस्र भयानक आकार घरभर थैमान घालायला लागतो. वरकरणी सौम्य, मनमिळाऊ दिसणाऱ्या गणपतरावांच्या मनात असं जहर होतं.
रमाबाई पुन्हा एकदा कॉटवर वाकल्या. आवाजावर ताबा ठेवीत म्हणाल्या,
हे पाहा...मला आता अगदी खरं खरं सांगावं...माझ्या समाधानासाठी काहीतरी खोटं बोलू नका...तुम्ही मनातून माझा खूप द्वेष करता का?
गणपतरावांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचा भाव आला...पण त्याआधी क्षणभर एक जराशी अस्वस्थपणाची, छद्मी चमक त्यांच्या डोळयांत चमकून गेली होती का? रमाबाईंनी तोच प्रश्न पुन्हा एकदा, जरा मोठ्याने विचारला.
‘‘पण...पण...का?...रमा, कशासाठी द्वेष?’’

‘‘हे पाहा, जरा नीट ध्यान देऊन ऐकता का? मी काय म्हणते ते जरा समजून घेता का? हे पाहा, तुम्हाला झोप लागली ना, की घरात काहीतरी वावरायला लागतं... तुमच्यासारखंच दिसायला...एखादं भूत वावरावं तसं...आणि मला फार भीती वाटते...’’
पण गणपतरावांचं लक्ष पुन्हा भरकटत गेलं होतं. कदाचित दुर्लक्ष असल्याचं त्यांनी सोंगही केलं असेल...किंवा लवकरच होणाऱ्या संक्रमणाची गडद सावली एव्हानाच त्यांच्या मनावर पडली असेल...त्यांचा घोगरा आवाज पुन्हा यायला लागला.
‘‘आता मला जाऊ द्या...दूर दूर जाऊ द्या...नकोत हे पाश...का जखडून ठेवता? का...मागे ओढता?... मोकळेपणाने दूर...लांब... ताऱ्यांच्या पलीकडे जाऊद्यात...ओढू नका...’’
त्यांची स्मृती एकदम बालपणाकडे झुकली असावी...कारण शाळा-खाऊ-परीक्षा...पास, पास...असं काहीतरी ते पुटपुटत होते आणि मग ते काही वेळ थांबले आणि जरा वेगळया आवाजात बोलू लागले-
‘‘मनात खोलवर...मुळासारखं काहीतरी...खोल गेलं आहे...ते माझ्या चांगुलपणावर वाढत आहे...पण त्याची वाढ चांगली नाही...विकृत वाटते...दुष्ट वाटते...रमा का असं?...रमा...’’
एकदम त्यांची मान रमाबाईंच्याकडे वळली आणि पुन्हा एकदा त्यांचे डोळे विस्फारले, वटारून रमाबाईंवर एकटक खिळले...पुन्हा ती ग्लानी आणि लागलीच एखादी तुटलेली फिल्म पुन्हा सुरू व्हावी तसा तो जड पावलांचा आवाज जिन्यावरून वर यायला लागला...दार थरथरलं...आणि रमाबाई काही करायच्या आतच दार दणकन् उघडून ते...ते...खोलीत आलं. सावकाश आलं, कॉटच्या दुसऱ्या बाजूस उभं राहून आपली द्वेषाने, मत्सराने भरलेली क्रूर नजर रमाबाईंवर खिळवून उभं राहिलं.
ते कशाची वाट पाहत होतं! समोर कॉटवर मरणासन्न गणपतराव नसते तर हाच आकार हाडामांसाच्या माणसाचा वाटला असता- इतकं ते खरं दिसत होतं.
गणपतरावांनी मान हलवली, डोळयांची उघडझाप केली. तसं ते ध्यान एकाएकी गडप झालं. गणपतरावांचा पुटपुटता आवाज आला-
‘‘रमा...कपभर चहा...देतेस का...? कशाला...? अगदी कोरड पडलीय... चहात साखर... बरीक खूप...’’
रमाबाईंना खुर्चीतून उठण्याचंही त्राण नव्हतं. खुर्चीचे हात हातात अगदी घट्ट धरून त्या नुसती मान हलवत होत्या. जणू काही त्यांनी खुर्चीचे हात सोडले असते तर त्या एखाद्या स्वाहाकारी भयाच्या लाटेबरोबर वाहवतच गेल्या असत्या. खुर्ची हाच जणू त्यांना आधार होता.
‘‘आता किती कप...संपलं...गोड गोड चहा...’’
आवाज मंदावला, बंद झाला. डोळयांतली जाणीव मावळली. तत्क्षणी कॉटपलीकडे ती लाल अंगरख्यातली आकृती साकार झाली. कदाचित मघापेक्षाही गडद, सुस्पष्ट, पण तीच ती सूडाची जळती नजर आणि आता बोलण्यासाठी त्या आकृतीने तोंड उघडले. तोच तो वरचा काळा, किडका दात, गणपतराव जो काढायला भीत होते तो दात आणि मग दीन तोंडातून तो घोगरा आवाज त्यांच्या कानावर आला.
‘‘आता...फार...वेळ...नाही...’’

मग गणपतराव जरा स्पष्ट आवाजात म्हणाले,“रमा...मला...खरंच चहा...हवा...आहे...”
ती लाल आकृती गडप झाली होती.
पुन्हा शांतता. गणपतराव स्तब्ध झाले आणि तो लाल अभद्र आकार परत आला तेव्हाही ते झोपलेले नव्हते, ग्लानीतही नव्हते. त्यांना स्वत:ला आता स्वत:चं ते दुसरं रूप दिसलं. गणपतराव विस्फारल्या डोळयांनी त्याच्याकडे पाहत होते आणि मग त्यांनी आपल्या थकलेल्या शरीराने उठून बसण्याची एक क्षीण, केविलवाणी धडपड केली. लाल अंगरख्यातला आकार दात विचकून हसत हसत पुढे सरकत होता, कॉटवर वाकत होता. गणपतरावांच्या तोंडून एक अर्धवट गुदमरल्यासारखा आवाज आला आणि त्यांचा चेहरा रमाबाईंकडे वळला. चेहरा पांढरा पडला होता, डोळे वटारले होते, घसा आवळला होता; काहीतरी बोलण्याची त्यांची निष्फळ धडपड चालली होती. तो एक क्षण ते दोन्ही चेहरे रमाबाईंकडे पाहत होते. एक भेदरलेला, पांढराफेक, काहीतरी बोलण्याची धडपड करणारा; दुसरा विचकलेल्या दातांचा, क्रूर, दुष्ट, मत्सराने भरलेला...आणि मग गणपतराव किंचाळले रमा!...मी...मी...मी...
वळून ते एकदम वेडेवाकडे पडले. तोंड उघडं होतं. वटारलेले डोळे छतावर खिळले होते. छातीची हालचाल शेवटी थांबली होती.
आणि मग ते दुसरे गणपतराव कॉटला वळसा घालून सावकाश त्यांच्या दिशेने यायला लागले. डोळे आता एका सैतानी विजयाच्या धुंदीत पेटून उठले होते. रमाबाई जागच्या हलल्याही नाहीत. त्यांच्या मनात भीती, आशा या भावनांना जागाच नव्हती. त्या शेवटच्या काही क्षणांत आता काय होणार आहे याची पुरेपूर कल्पना त्यांना आली होती; पण आता सर्व भावना थिजल्या होत्या. त्यालाच काय, कशालाच काही महत्त्व नव्हतं.
***
गोडश्यांची यमी खरोखर सकाळची येणार नव्हती; पण आदल्या दिवशीची रमाकाकूंची धावपळ तिने पाहिली होती. वेळात वेळ काढून ती सकाळची सातलाच आली होती. रमाकाकूंना निदान स्नान- देवपूजा- याला तरी सवड मिळावी म्हणून. खालचं दार ढकलताच उघडलं. दारातूनच तिने हाक मारली-“रमाकाकू! रमाकाकू!”
हाकेला उत्तर आलं नाही तशी ती आत गेली. स्वयंपाकघरातला दिवा जळतच होता आणि खाली फरशीवर बरण्या, ग्लासेस, कपबशा, डिशेस फुटून त्यांचा चुरा पसरला होता. ते लक्षण यमीला काही ठीक दिसलं नाही. खालची माजघराची खोलीही रिकामी होती. तिथलाही दिवा जळतच होता. जिन्याच्या पायथ्याशी उभं राहून यमीने पुन्हा एकदा हाक मारली-
“रमाकाकू? वर आहात का रमाकाकू?”
वरच्या खोलीतून हालचालीचा काहीतरी आवाज आला; पण यमीच्या हाकेला मात्र उत्तर आलं नाही. हालचाल गणपतरावांची असावी आणि काकू कोठे तरी शेजारी गेल्या असाव्या असं वाटून यमी चटचट जिना चढून वर गेली आणि दारातून आत गेली.
आणि ‘आई ग!’ करीत त्याच पावलावर थिजून उभी राहिली.
समोरचा देखावाच तसा हतबद्ध करणारा होता.

गणपतराव कॉटवर अस्ताव्यस्त पडले होते. त्यांची मान कॉटवरून खाली लोंबकळत होती आणि त्यांचा चेहरा अवर्णनीय भीतीने विकृत झाला होता आणि शेजारच्या खुर्चीत रमाबाई बसल्या होत्या. त्या आपले दोन्ही हात एकमेकावर चोळत होत्या आणि मांडीवर घासत होत्या.
पण...पण...त्यांचा चेहरा! एका विलक्षण आसुरी हास्यात विचकलेले ते दात! यमी खोलीत येताच रमाबाई स्वत:शीच मान हलवीत घोगऱ्या आवाजात हसल्या. त्या घाणेरड्या आवाजाने यमीच्या सर्वांगावर सरसरता काटाच आला. पुढे येत ती म्हणाली,
''अहो रमाकाकू! हे काय झालं हो! कशाला मी तुम्हाला एकटी ठेवून गेले हो! मी रात्री इथेच राहायला हवं होतं.''
यमी जवळ आली तसं रमाबाईंच्या चेहऱ्यावरचं हास्य अधिकच रुंदावलं. हातांच्या मुठींची उघडझाप करीत त्या पुन्हा एकदा मोठ्याने हसल्या. त्यांच्या त्या विलक्षण चकाकणाऱ्या डोळ्यांकडे यमीला पाहावेनाच आणि मग रमाबाईंच्या विलगलेल्या ओठांतून तो घोगरा, खसखसता आवाज आला.
''रांडेची मला जन्मभर छळत होती...कधी मनासारखं वागू दिलं नाही...मुलं होऊ दिली नाहीत... एक संधी आली होती तीही रांडेचीने हिसकावून घेतली...जन्मभर पिरपिर...पिरपिर.''
यमी चट्दिशी मागे सरली म्हणून त्या दोन कृश, काटकीसारख्या, पण वाकलेल्या बोटांच्या पंज्यासारख्या हातात सापडली नाही आणि ती हाताची मूठ तोंडात कोंबून मागे मागे दाराकडे सरकली, तरीही रमाबाई, स्वत:शी मान हलवीत दात विचकून हसत बोलतच होत्या-
आता रांडेची पिरपिर करायची नाही... आता आवाज बंद...आता मी म्हणेन तसं चालणार आहे...आता डोक्याच्या आत कोंबलीय तिला...बसलीय् किंचाळत तिथे...पण आता बकबक करायची नाही...
आणि मग यमी धाडदिशी दार उघडून बाहेर आली, जिन्यावरून धाडधाड खाली आली आणि ओरडत ओरडत त्या घराबाहेर पडली.

□□

## ४. त्रिकोण

### 1. राजेंद्र

दैवाने पलटी खाल्ली म्हणजेच माणसाला तत्त्वज्ञान सुचतं. जेव्हा मी शिक्षणासाठी मुंबईस आलो तेव्हा सुख-दु:ख, कर्म-भोग-प्रायश्चित, दैवसंचित इत्यादी शब्दही माझ्या कोशात सापडले नसते. सधन आई-वडिलांचा मी एकुलता एक मुलगा; अव्यंग; बुद्धिवान. यशाची आणि कीर्तीची सर्व दारं माझ्यासाठी सताड उघडी होती. मी मनात आणीन ते साध्य करण्यासाठी मला संधी, साधनं सर्व काही उपलब्ध होतं. काही जणांना माझा मत्सर वाटला तर मला त्यांचा राग येई, कीवही येई. कारण या सर्व गोष्टी मी जन्मसिद्ध अधिकार म्हणून गृहीतच धरून वागत होतो आणि त्यात माझी तरी काय चूक? कारण मला दुसरं आयुष्यच माहीत नव्हतं.

माणूस किती भाबडेपणाने वागत असतो! पुढचा क्षण आपल्यासाठी काय घेऊन येत आहे याची त्याला कल्पना नसते आणि तो आपल्या अल्पमतीप्रमाणे मोठमोठ्या योजना आखीत असतो. कदाचित ही विधात्याचीच योजना असेल की क्षणाक्षणाला समोर उलगडणारा कालपट मानवाला सर्वथा अगम्यच राहावा; नाही तर भावी दु:ख शतपटींनी वाढतील, भावी सुखं शतांशाने कमी होतील आणि दु:खाच्या ओझ्याखाली आयुष्य असह्य होईल.

ती सकाळ असं काही घेऊन येईल ही काय कल्पना? बाबांची तार आली; पण मला त्यात विशेष काहीच वाटलं नाही. कदाचित ते अचानक काही कामासाठी मुंबईस येत असतील, मला भेटणार असतील. तारेचा कागद उलगडेपर्यंत मी असा अज्ञानी सुखात होतो आणि मग पहिला दणका बसला...

मदर सीरियस. स्टार्ट इमीजिएटली. - फादर.

आई सीरियस! का? कशाने? केव्हा? पण मग बाबा तिकडे त्या लहानशा आडगावच्या खेड्यातच का राहिले? तिला काही आजार झाला असला तर ते टॅक्सी करून सरळ मुंबईला का नाही आले? त्या पहिल्या क्षणीच मला जाणवलं की हा साधा प्रकार नाही. एकदा वाटलं की रिप्लाय पेड वायर करावी; पण लागलीच त्यातला फोलपणाही समजला. बाबा माझ्या येण्याची वाट पाहत असणार. तारातारी करण्यात अर्थ नव्हता आणि तारेच्या उत्तरातही "ताबडतोब नीघ " असंच लिहिलं तर?

तेव्हा मग मी तार कोर्सच्या मुख्यांना दाखवली. त्यांची स्वाक्षरी घेऊन इन्स्टिट्यूटच्या प्रमुखांना दाखवली आणि त्यांची परवानगी घेऊन जी मिळाली त्या पहिल्या गाडीनं मुंबई सोडली. मनमाडपर्यंत मेलचा प्रवास होता, मग पॅसेंजर. पहाटेस केव्हा तरी गाडी स्टेशनला पोचली. स्टेशनवर सदाशिव नावाचा माझा एक खूप दूरचा चुलतभाऊ माझ्यासाठी येऊन थांबला होता. घरच्या टांग्यातून तीन-सव्वातीन मैलांवरच्या वाड्यावर जाता जाता त्याने मला सर्व सांगितले.

माझ्या आईचा अमानुष खून झाला होता.

खून! आईचा खून! छे छे! हे शक्यच नाही! हे खरं असणारच नाही! या गोष्टी इतरांच्याकडे

होतात-वर्तमानपत्रांतून छापल्या जातात. आपल्या घरी नाही!...कोण? केव्हा? कसं? केव्हा कळलं? का? माझ्या प्रश्नांच्या सरबत्तीखाली बिचारा सदाशिव भांबावला. त्याला माहीत होतं ते सर्व त्याने मला पटापट सांगितलं.
बाबा काही कामासाठी चंदनपूरला, तालुक्याच्या गावी जाणार होते. तिथेच त्यांचा दोन दिवस मुक्काम राहणार होता. लहानशा गावी अशी बातमी सर्वांना समजायला काय वेळ लागणार? पण त्यांना ज्यांची भेट घ्यायची होती, ते अधिकारी दौऱ्यावर गेले होते असं पाहून बाबांनी त्याच संध्याकाळी परत यायचं ठरवलं परत यायला त्यांना बराच उशीर झाला. वर्दी नसल्याने अर्थात टांगा स्टँडवर आला नव्हता. ते पायीपायीच निघाले. वाड्यापाशी पोचले तेव्हा रात्रीचे बारा तरी सहज वाजले होते. सर्वत्र अंधार होता, निजानीज झालेली होती.
बाबा आवारात पोचतात तोच वाड्याच्या लहान दारातून कोणी तरी चोरून बाहेर पडून अंधारात लपत छपत दूर गेलेलं त्यांना दिसलं. तसे बाबा धीटच. हातातली थैली तशीच टाकून ते पाठलागावर गेले; पण वाड्याला लागूनच राई होती. त्यात ती आकृती पाहता पाहता गडप झाली. बाबा परत आले. आता वाड्याचं दार उघडंच होतं. कोणाला हाक मारून उठवायची गरजच नव्हती. ते आत आले, मागे त्यांनी अलगद दार लावून घेतलं आणि ते सावकाश ओसरीतून निजायच्या खोलीकडे आले.
खोलीचं दार सताड उघडं! मनात एकदम चर्रर्र झालं! काही चोरी वगैरे तर नाही ना झाली? त्यांनी तसाच अंधारलेल्या खोलीत पाय टाकला. दोन पावलांवरच ते कशाला तरी अडखळून जवळजवळ पडलेच.
जास्त वर्णन कशाला?
खाली जाजमावर आईचाच मृतदेह निश्चेष्ट पडला होता. कोणीतरी गळा आवळून त्या साध्वीचा हिंस्र खून केला होता. गोऱ्यापान गळयावर निळे काळे डाग उठले होते.
***
मी वाड्यावर पोचतो तो सर्व कारभार आटोपला होता. मंडळी आईला पोचवून परतही आली होती. पंधराच दिवसांपूर्वी मी या घरातून गेलो तेव्हा घर कसं हसरं, आनंदी होतं. मी जाणार म्हणून आईची कोण धावपळ चालली होती! बाबांसाठी, माझ्यासाठी सतत झटणारी, आमच्याच सुखात आपलं सुख मानणारी! काय बिचारीने असा देवाचा अपराध केला होता की असा अकाली अघोर मृत्यू तिच्या भेटीला यावा?
बाबाही खचल्यासारखे दिसत होते. तसे ते अबोलच; पण तरीही चेहरा काळा पडला होता, रेषा आणखी खोल कोरल्या गेल्या होत्या, नजर अर्थहीन झाली होती. बोलताना दहादा त्यांना भानावर आणावं लागे. त्यांचं लक्ष कोठेतरी तिसरीकडेच असायचं. मला वाटतं त्यांच्या डोक्यावरच काहीतरी परिणाम झाला असावा. नजर कधी कधी बावरी व्हायची. एखादा लहानसाच आवाज जरी अचानक आला तरी ते केवढ्यांदा दचकायचे! घामाघूम व्हायचे, चेहऱ्यावरचा रंग उतरायचा...
घरचा सर्व कारभार पाहणं त्यांच्या आटोक्यापलीकडचं होतं. शेवटी मलाच माझं शिक्षण अर्धवट सोडून गावातच राहायला यावं लागलं.

काळ हा सर्व दु:खावर औषध आहे म्हणतात; पण बाबांच्यात काही सुधारणा होईना. कदाचित पत्नीचा विरह हा काही वेगळयाच श्रेणीचा शोक असावा. प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रही देवपण विसरून वेडेपिसे नव्हते का झाले?
मी काही कोणी मोठा मानसशास्त्रज्ञ नाही. डॉक्टर तर नाहीच नाही. तेव्हा बाबांच्या मनात काय जडणघडण होत असेल त्याचा अंदाज मला कसा लागावा? आणि खरं म्हणजे अकाली शिरावर पडलेल्या जबाबदारीखाली मी पार खचून गेलो होतो. सर्व व्यवहारांचं तंत्रमंत्र आत्मसात करायला काय थोडा थोडका वेळ लागणार होता? कमी का श्रम पडणार होते?
तेव्हा दिवस जात होते. बाबा दिवसेंदिवस जास्त जास्त अबोल होत चालले होते. शरीर काडीसारखं कृश झालं होतं. डोळयांत एक प्रकारची हरवल्याची भावना दिसत होती. ते कोठेतरी बसून असत नाहीतर वाड्याच्या चौकात गोल गोल प्रदक्षिणा मारीत बसत.
धरणीकंप होण्याच्या क्षणापर्यंत माणसाला कल्पना नसते की एका सेकंदात प्रचंड उद्रेक होणार आहे, सर्व जग उलथेपालथे होणार आहे; कारण ते बदल भूगर्भात खोलवर, नजरेपलीकडे होत असतात. माणसाच्या मनाचंही असंच आहे का? असलंच पाहिजे. नाहीतर मला आधी थोडी तरी कल्पना आली असती-
पण नाही. मला कोणतीही कल्पना नव्हती.
मी अगदी अगदी बेसावध होतो.
रात्रीची जेवणं झाली होती. बाबांना कसं तरी दोन घास अन्न खायला लावलं होतं आणि मग ते त्यांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे चौकात येरझारा घालीत होते. स्वच्छ चंद्रप्रकाश पडला होता. त्या चंद्रप्रकाशात ओसरीच्या खांबाला टांगलेला कंदीलच फिका वाटत होता. ओसरीवरच मी एका बाकावर बसून बाबांकडे पाहत होतो. एका क्षणात त्यांच्या (आणि पऱ्यायाने माझ्याही ) आयुष्याची झालेली परवड आठवून नवल करीत होतो. बाबांकडे माझं अर्धवटच लक्ष होतं. मला एवढं दिसलं की फेरी घालता घालता ते वाड्याच्या दारापाशी गेले होते, तिथेच थांबले होते आणि बाहेर पाहत होते.
मिनिटभरात मला वाटायला लागलं की त्यांच्या या उभे राहण्यात काहीतरी वेगळंच आहे, काहीतरी अनैसर्गिक आहे. मी चट्‌दिशी उठलो, सोप्याच्या पायऱ्या उतरून चटचट त्यांच्याजवळ गेलो आणि हलकेच म्हणालो,
बाबा, आत चला झोपायची वेळ झाली.
ते माझ्याकडे वळलेही नाहीत. त्यांची नजर समोरच कशावर तरी एकटक खिळली होती; पण समोर काय होतं? काहीही नाही. उघड्या दारातून समोरचा सरळच्या सरळ गेलेला धुळीचा पायरस्ता दिसत होता. प्रखर चंद्रप्रकाशात तो आता अगदी उजळून निघाला होता; पण संपूर्ण रिकामा होता.
"बाबा! चलता ना आत?" त्यांच्या खांद्याला मी हलकेच स्पर्श केला. स्पर्शाखाली त्यांचं सर्व शरीर थरथर कापताना मला जाणवलं.
"बाबा!" मी जरा मोठ्याने म्हणालो.
त्यांच्या चेहऱ्याकडे पाहता पाहता मला जराशी भीतीच वाटायला लागली होती. त्यांचे

दात गच्च आवळले होते, मानेच्या शिरा तट्ट फुगल्या होत्या, डोळे वटारलेले होते.
“ते बघ! ते बघ, राजू!” ते जवळ जवळ पुटपुटलेच.
“काय बाबा? काहीही नाही तिथे. घरात चला.”
“ते बघ! ते बघ! देवा! राम राम! नको!”
त्यांचा आवाज माझ्या शरीरावर शहारा आणत होता.
“बाबा,” मी जरा पुढे होऊन त्यांच्या खांद्यावर हात ठेवला.
पण काहीतरी ओरडून त्यांनी मला एक धक्का दिला. माझा तोल गेला. माझं डोकं दाराच्या अवजड लाकडी चौकटीवर आपटलं, डोळ्यासमोर काजवे चमकले, सर्व जग एका अवाढव्य चक्रात गोलाकार फिरलं.
माझी शुद्ध हरपली.
****
मी परत शुद्धीवर आलो तेव्हा माझ्या झोपायच्या खोलीत होतो. किती वेळ गेला होता नक्की समजत नव्हतं; पण बराच गेला असावा. डोकं विलक्षण दुखत होतं, मान वर करवत नव्हती, नजर अजूनही स्थिर नव्हती. माझ्या अनवधानाचं हे एकमेव कारण वा स्पष्टीकरण (समर्थन नाही) मी देऊ शकतो. वास्तविक बाबांची अवस्था आठवून मी त्यांची (त्याही अवस्थेत ) चौकशी करायला हवी होती; पण अगदी साहजिकच माझी समजूत झाली की बाबा त्यांच्या खोलीत जाऊन झोपले असतील. इतरांना माझ्याकडेच पाहता पाहता मुष्कील झालं असेल. बाबांकडे कोण लक्ष देणार? कोणाला कल्पना तरी कशी येणार की ते वाड्यात परत आलेच नाहीत!
दुसऱ्या सकाळी स्फोटासारखी बातमी पसरली. थोरले मालक खोलीत नाहीत. मग एका एकाला आठवलं- रात्रीचं दूध मागितलं नाही; मग दिसलं कॉट होती तशीच आहे; पलंगपोस विसकटलेला नाही; ब्लँकेटची घडी मोडलेली नाही...
त्या रात्री बाबा गेले ते गेलेच!
मी त्यांचा किती शोध घेतला! किती जाहिराती दिल्या! किती तरी खाजगी एजन्सीजकडे कमिशनवर काम सोपवलं...पण त्यांचा मागमूसही लागला नाही. जणू काही ते हवेत विरघळूनच गेले!
त्यांचा विचार मनात आला की आतड्यांना कसा पीळ पडतो. समजा त्यांना अगदी वेड लागलं असलं, तरीही निदान त्यांच्या पोटापाण्याची तरी मी काळजी घेतली असती. थंडी-ऊन-वारा-पाऊस यांपासून तरी त्यांचं संरक्षण केलं असतं...आता बिचारे कोठे आणि कोणत्या अवस्थेत भरकटत असतील देवच जाणे! का...त्याहीपेक्षा एक भयंकर विचार मनात येतो...त्यांनी त्या वेडाच्या झटक्यात जिवाचं काही बरंवाईट तर नाही ना करून घेतलं?
अजूनही कधी कधी ती रात्र आठवते. समोर पसरत गेलेला तो पांढरा शुभ्र रस्ता...त्यावर खेळलेली बाबांची भयचकित नजर...त्यांना त्या रस्त्यावरून त्यांच्या दिशेने असं काय येताना दिसलं की त्यांच्या मनाची अशी छकलं उडावीत? अजूनही शरीरावर सरसरता काटा येतो...

असा हा देव आहे. एका हाताने देतो, दुसऱ्या हाताने काढून घेतो.
एकाक्षणी मी सुखाच्या शिखरावर होतो-
दुसऱ्या क्षणी दु:खाच्या गर्तेत ढकलला गेलो.
घरदार, धनधान्य, पैसा-अडका, शेतीवाडी, दागदागिने सर्वकाही आहे. हाताशी नोकरचाकर आहेत. मानमरातब आहे. शब्दाला मान आहे; पण आईवडिलांकडून पोरका झालेला मी-
मला यात कशातही गोडी वाटत नाही.

## 2 . काशीनाथपंत

काशीनाथपंत. एक लेबल. मातीच्या एका बाहुलीला लावलेलं लेबल. होय, उद्या हे शब्द खरे होणार आहेत. या अस्थिपंजर शरीरात धुगधुगणारी ठिणगी एवढ्यातच मालवली जाणार आहे. मागे काय राहणार आहे? कपड्याखाली झाकून ठेवलेल्या या शरीराचा चेहरा तरी कापड उचलून पाहण्याइतकं कुतूहल कोणामध्ये असेल का? आणि असलंच तरी ते किती शमणार आहे? ‘काशीनाथपंत.’ त्याला उत्तर मिळेल. त्या एका शब्दाने त्याला कितीसा बोध होणार आहे? ‘काशीनाथपंत’ या नावाने मी गेली वीस वर्षे वावरतो आहे- पण तेही मी स्वत:च्या सोयीसाठी धारण केलेलं नाव आहे- माझं खरं नाव ते नाही किंवा नसावं. काही वेळा वाटतं, मला यापूर्वी नाव नव्हतंच, फक्त एक नंबर होता. नंबर सातशेसत्तेचाळीस. हीही अक्षरंच, काशीनाथपंत हीही अक्षरंच; पण 747 ही अक्षरं भयानक वाटतात; मनाचा थरकाप करतात, शरीरावर काटा उभा करतात...747 ही संख्या ऐकली, पाहिली किंवा वाचली की मनात नाना अर्धस्मृत आठवणी गदारोळ करून उठतात...निरर्थक अचकट विचकट बडबड...जीवघेण्या यातना...आसुरी हास्याचा खदखदाट...मोठ मोठे लोखंडी गजाचे दरवाजे दणादण बंद केल्याचा खणखणाट...हातापायांना आवळलेल्या लोखंडी पट्ट्या...नकोत! नकोत! त्या आठवणीच नकोत! तो नंबर नको! त्यापेक्षा ‘काशीनाथपंत’ हे नाव हजारपटींनी चांगलं वाटतं.
मनाला पीळ पाडून थरथरत्या हाताने मी अक्षराअक्षराने करीत या ओळी लिहीत आहे. कशासाठी? कोणासाठी? इतरांच्या स्वनिष्ठ आठवणीत कोणाला स्वास्थ्य असतं? आणि शिवाय ही काही माझी कहाणी नाही. कारण माझ्या आयुष्यातले अनेक खंड मलाच अज्ञात आहेत. एखाद्या दोऱ्यात वेगवेगळे मणी ओवावेत तशा या पृथक पृथक आठवणी आहेत...
माझ्याच मनाच्या धाग्यात गुंफलेल्या...काही पुरातन, स्वच्छ, स्पष्ट, विलोभनीय, अविश्वसनीय वाटतात; तर काही भयानक, जीव घाबरा करणाऱ्या, शरीर घामाघूम करणाऱ्या वाटतात; तर काही स्वप्नांसारख्या असंभाव्य, अशक्य कोटीतल्या, भासांसारख्या वाटतात. यातल्या खऱ्या किती आणि खोट्या किती? देवासच माहीत. मला तर माहीत नाही.

***

जीवनाच्या सीमारेषेवरून मी मागे वळून पाहत आहे. समोर तर अज्ञाताचा अथांग सागर पसरला आहे. त्यात आता माझ्या अस्मितेची ठिणगी विझून जाणार आहे; पण मी कोणत्या

मार्गाने येथवर येऊन पोचलो आहे? काळाच्या रेतीवर पावलांच्या खुणा उमटल्या आहेत. ही पावलं वीस वर्षांपर्यंत मागे जातात. रक्ताळलेली, ठेचाळलेली, रखडणारी पावलं. एकाकी, दु:खी, वंचित, उपेक्षित, दीनवाणी, अस्थिर आयुष्याची वीस वर्षं ओलांडून ती पावलं येथपर्यंत पोचली आहेत.

या वीस वर्षांत मी मानवाच्या पातळीला फार थोड्या वेळा पोचलो. बहुतेक कालखंड पशूसारखा स्वार्थाच्या, पापाच्या कर्दमातून सरपटतच क्रमला आहे; पण त्यामागे, त्याआधी काय आहे? त्याआधी सर्व काही धूसर, अस्पष्ट आहे; पण वीस हे काही माझं खरं वय नाही. कारण मी वृद्ध आहे, म्हातारा आहे.

तसा स्वत:चा जन्म, जीवनाचा आरंभ कोणालाच आठवत नाही. त्याला तो दुसऱ्या कोणाकडून तरी जाणून घ्यावा लागतो. माझी गोष्ट तशी नाही. मला जाणीव आली तेव्हा मी एका अनोळखी शहराच्या आडरस्त्याने लपतछपत चाललो होतो. पाय थकले होते, पोटात भुकेने काहूर माजलं होतं; पण मी कोठे होतो, कशापासून दूर दूर पळत होतो, कोठे, चाललो होतो, मी कोण होतो याचा कशाचाही मला गंधही नव्हता.

समाजाचे अनेक नियम मला भारी किंमत देऊन शिकावे लागले. फुकट काही मिळत नाही. अन्नाच्या प्रत्येक घासासाठी घाम गाळावा लागतो. कोणीही अनामिक राहू शकत नाही. प्रत्येकाला नाव-गाव-पत्ता हा हवाच. शरीराच्या गरजा काही दाम मोजून पुऱ्या करून घेता येतात; पण मनाच्या गरजा कोठेही अशा पैसे मोजून भागवता येत नाहीत. मला नाव हवं होतं, गाव हवं होतं, व्यवसाय हवा होता. एकेका अनुभवानंतर मी एकेक धारण केलं. शरीरावर वस्त्रावर वस्त्र चढवावं तसं...पण ते सोपं नव्हतं; त्या अनुभवांचे व्रण अजूनही मी वागवत आहे- शरीरावर आणि मनावर, सर्वत्र.

अनेक गावांतून मी राहिलो आहे. ते एखाद्या चित्रपटांसारखे मन:चक्षू समोरून सरकतात; पण कोठेही जिवाला चैन लाभली नाही. काहीतरी पाठलागावर असल्याची जाणीव मनाला सतत होत होती. अजूनही होते. आयुष्याची अखेर आली पण हे रहस्य उलगडलं नाही. कदाचित तेही माझ्याबरोबरच या सीमारेषेपार येणार असेल. कदाचित तिकडेच त्याची उकल होणार असेल-कोणी सांगावं?

***

डोळ्यांसमोर एक चित्र येतं, एक टुमदार घर. लहानसा मळा. शेतीवाडी. त्या घरात संपत्ती, ऐश्वर्य, नोकरचाकर सर्व काही आहे. घराचा मालक सधन, यशस्वी आहे; पण त्याचा स्वभाव तापट, विलक्षण मत्सरी वाटतो. घरधनीण सुस्वरूप आहे, सुस्वभावी आहे; पण मालकांच्या मनात तिच्याबद्दल संशय आहे. या जोडप्याला एक सुपुत्र आहे; पण तो तिथे राहात नसावा. तो हुशार आहे. आज्ञाधारक आहे; पण त्याची प्रतिमा विलक्षण पुसट आहे; कधी कधी तर त्याच्या अस्तित्वाची जाणीवही नसते; पण मला एक नवल वाटतं- बाह्यत: परक्या वाटणाऱ्या या माणसाच्या अगदी अंतर्मनातले लहानसहान विचारही मला एवढे बारकाव्यासह कसे माहीत असावेत?...

का...का तो माझाच पूर्वाश्रमींचा अवतार आहे? असंच असलं तर...

तर मग माझ्या मनातलं संशयपिशाच्च मला शांतता लाभू देत नव्हतं. सदानकदा पत्नीच्या

शीलाची शंका मनाला त्रस्त करीत असे आणि म्हणून एका दुर्दिनी मी माझ्या पत्नीची परीक्षा पाहायचा निश्चय केला. परगावी कामाला जाण्याचा बहाणा करून घराबाहेर पडलो आणि मध्यानरात्री नंतर चोरून परत आलो आणि वाड्याच्या दाराबाहेर लपून पहारा करीत बसलो.

आणि हाय रे देवा! माझ्या सर्व शंका खऱ्या ठरल्या. काही वेळातच दरवाजा हलकेच उघडला आणि एक चोरटी आकृती हलकेच बाहेर पडली. संतापाने बेभान होऊन मी त्याच्या दिशेने झेप घेतली; पण अंधाराचा फायदा घेऊन तो घरामागच्या झाडीत पाहता पाहता दिसेनासा झाला. एखाद्या वाऱ्यासारखा, एखाद्या सावलीसारखा... कधी कधी शंका येते- तो खरा तरी होता का? का संशयाने पिसाळलेल्या मनाचा तो एक भास होता?

पण हा सद्विवेक सुचण्याच्या मन:स्थितीत मी तेव्हा नव्हतो. संतापाने शरीराची लाही लाही होत होती. मत्सराने मेंदू आगीवर धरला होता. पौरुषाचा हा अपमान असह्य होत होता. डोळ्यासमोर सूडाचे लाल पटल पसरले होते. त्यात सारासार विचाराची होळी झाली होती. अतिरेकी संतापाने मी बेभान झालो होतो, आंधळा झालो होतो...

त्याच उघड्या दारातून मी वाड्यात आलो तसाच चोरपावलांनी मी माझ्या खोलीत आलो. खोलीत अंधार होता; पण खोलीचा इंचन् इंच माझ्या परिचयाचा होता. मला कशाला प्रकाश हवा? मी सरळ पलंगाकडे गेलो; पलंगावरून हात फिरवला! पलंगावरचे कपडे अस्ताव्यस्त झाले होते; पण तिथे ती...ती...तिला माझी पत्नी कशी म्हणू?...ती...ती...कुलटा नव्हती. माझी चाहूल लागताच कोठे तरी लपून बसली होती की काय?

होय! कारण खोलीच्याच कोपऱ्यातून मला कोणी तरी अगदी चोरून घेतलेला श्वास ऐकू आला. तीच ती असणार ती कोपऱ्यात. दुसरं कोण? एखाद्या चवताळलेल्या वाघासारखी मी त्या दिशेने झेप घेतली...ती कोपऱ्यात अंग चोरून घेऊन बसली होती! तिच्या तोंडून निघू पाहणारी किंचाळी मी मुळातच रोखली. एका क्षणात माझे दोन्ही हात तिच्या गळ्याभोवती आवळले गेले. काही क्षण तिच्या शरीराची तडफड झाली...आरोप करीत बसण्यात काय अर्थ होता? इतका पुरावा मिळाला असताना तोंडून कबुली हवी होती कशाला? आणि तो पापी चेहरा पाहायचा तरी कशाला? त्या गडद अंध:कारातच, त्या घुसळत्या शांततेतच तिच्या व्यभिचारी आयुष्याचा शेवट झाला...मी केला!

***

ही एक चित्रमालिका, हे एक भडक स्वप्न असं संपलं. मी त्यात भूतकाळ वापरला आहे; पण वास्तविक वर्तमानकाळच हवा. कारण त्या घटना सतत होत असतात. माझ्या मनात संशय जागा होतो, मीच मनाशी हा सैतानी बेत आखतो, मीच गावाला जाण्याचा बहाणा करून बाहेर पडतो, मीच परत रात्री लपत छपत येतो, मीच संसाराची विटंबना पाहतो आणि मीच त्याचा शेवट करतो...तेच ते, पुन्हा पुन्हा...

या भडक चित्रांसमोर माझं भटकंतीचं, रखडतं, हरकाम्याचं आयुष्य किती नीरस, किती रंगहीन, किती क्षुद्र वाटतं! न स्वास्थ्य, न चैन, सदान्कदा पायाला भोवरा. ऊन-वारा-थंडी-पाऊस...धूळ, खडे, चिखल...ना कधी वसंत फुलला, ना कधी पक्ष्यांनी कूजन केलं...

पण हे सर्व परवडलं. ती त्या रात्रीची ती एक आठवण नको. कारण ती आठवण मेंदू

थिजवते, रक्त गोठवते, शरीराचा थरकाप करते; पण नको म्हटल्याने ती राहते का? फिरणाऱ्या चक्रावरच्या अणकुचीदार टोकासारखी तीही नेमाने येते. त्या एका टोकावर जीव कसा फुलासारखा फडफडतो...पण त्या अवाढव्य नियतीचक्राला कसली दया, कसली करुणा?

मी एका दारात उभा आहे. दार तरी खरं आहे का सांकेतिक आहे?

मला माहीत नाही. माझ्या शेजारीच कोणीतरी आहे; पण तो अनामिक आहे. त्याच्या अस्तित्वाची केवळ जाणीव आहे, बाकी काही नाही. समोर पांढरा रस्ता दूरपर्यंत पसरत गेला आहे आणि त्या रस्त्यावरून, दूरवरून काही तरी माझ्या दिशेने येत आहे... आधी ते अस्पष्ट आहे, पण त्याच्या बाह्यरेषा झपाट्याने स्पष्ट होत आहेत...ती एक मानवी आकृती आहे...नाही, ती एक स्त्री आहे...एक स्त्री नाही, ती माझी पत्नी आहे. माझी दिवंगत, मृत पत्नी!

तिच्या अंगावर पांढरी शुभ्र पायघोळ साडी होती. सरळ पडलेल्या चंद्रप्रकाशात त्या चेहऱ्याची रेषा न् रेषा एक प्रकारच्या अनैसर्गिक स्पष्टतेने दिसत होती. चेहरा निर्जीव, मृत होता. गळयावरच्या निळया काळया खुणा स्पष्ट दिसत होत्या. नजर माझ्यावरच खिळलेली होती! त्या नजरेत राग नव्हता, द्वेष नव्हता, सूडाची धमकी नव्हती, खेदही नव्हता...पण ओळख होती. असं वाटत होतं की ही भेदक नजर एखाद्या सुरीसारखी पार खोलवर जात आहे, मनातल्या त्या हलाहलाला स्पर्श करीत आहे...

त्या भयप्रद आकारासमोर मी उभाच कसा राहणार? कोणी तरी मला अडवण्याचा प्रयत्न केल्याचं स्मरतं...मी सर्व अडथळे दूर सारले आणि त्या जीवाचं भीतीने पाणी पाणी करणाऱ्या आकृतीपासून दूरदूर पळत सुटलो...ती जागा मागे टाकली, त्याचबरोबर नाव-गाव-नाती-गोती-आठवणी, सर्व पूर्वायुष्यच मागे टाकलं जणू!

***

तेव्हा काळजातला शूल हा आहे तर! या आकृतीपासून मी गेली वीस वर्षे पळत आहे. आता सत्यस्थिती आणि भास यांच्यातली सीमारेषा पुसली गेली आहे. एखादा चंदेरी प्रकाशात उजाळलेला रस्ता दिसला की जीवाची कालवाकालव व्हायला लागते. वाटतं, एवढ्यातच दूरवरून ती भयानक पांढरी आकृती अशी वाऱ्यासारखी झपाट्याने जवळ येईल...काही वेळा पांढरं काहीतरी दिसलंही आहे...मी त्याची परीक्षा पाहायला थांबलेलोच नाही.

हे वर्णन करताना जिवाचा थरकाप झाला होता. आता कसं शांत वाटतंय; पण सांगून मनावरचा बोजा काही कमी झाला का? मुळीच नाही! ज्या साशंक, धूसर अवस्थेतून या प्रसंगाची सुरुवात होते तिथंच ती संपते.

हा बोजा अखेरच्या क्षणीच खाली उतरला जाणार आहे.

त्या वैतरणी नदीचा तीर आता जवळ आला आहे. थकलं भागलेलं, जीर्णशीर्ण शरीर आणि गोंधळलेलं एकाकी मन मागे ठेवून मी त्या नव्या प्रदेशात प्रवेश करणार आहे. तिथे तरी माझ्यासाठी काही आपुलकीचा ओलावा, काही मनाची माणुसकी असेल अशी आशा मनाशी करीत...

***

## 3. अनामिका...अव्यक्त

मृत्यूचा क्षण. जणू काही भूत-भविष्यातली सर्व जाणीव त्या एका क्षणात खेचून घेतली जाते! त्या एका क्षणात साठवली जाते. सपाट मैदानावर एखादाच वृक्ष नजरेत भरावा, त्या मैदानावरची खुणेची जागा बनावा तसा अन्यथा साध्या आयुष्यातला हा एकमेव क्षण बनतो. त्याच्या मागची पुढची संवेदना तीव्र असते, आठवणी सुस्पष्ट असतात.

ती काळरात्र माझ्या अशरीरी अस्मितेत कायमची कोरली गेली आहे.

माझे पती परगावी गेले होते आणि सर्व नैमत्तिक कार्यक्रम उरकून मी झोपायच्या खोलीत आले होते. पडल्या पडल्या शांत झोपही लागली होती आणि त्या झोपेतून मला अचानक जाग आली होती. कशाने? मला माहीत नाही. पण मनाला सतत कसल्यातरी संकटाची जाणीव होत होती.

मला माहीत होतं, वाड्यात, अवतीभोवती नोकरचाकर आहेत. मी काही ओसाड घरात एकटी नाही; पण अशा कोरड्या आश्वासनांनी अंतर्मनातील भीती कधी कमी होते का? मनाला संकटाची दूरवरची चाहूल लागली होती आणि ते बावरलं होतं. आजवर मी एकटी काय राहिले नव्हते का? पण असा अस्वस्थपणा कधी आला नव्हता.

शेवटी मनाची उलघाल एवढी वाढली की अंधारातच चाचपडत जाऊन मी उशालगतचा दिवा लावला; पण प्रकाशाने मनाला धीर येण्याऐवजी मनातली भीतीच वाढायला लागली. सर्व दिशांना अंधार होता. माझ्या खोलीतल्या प्रकाशाची लहानशी चीरसुद्धा चटदिशी बाहेरून दिसेल...आणि बाहेरच्या अंधारात जे काही वावरत होतं त्याला नेमका माझा माग लागेल! त्याच क्षणी मी दिवा मालवून टाकला. अंधारात अदृश्यता होती, अनामिकता होती, सुरक्षितता होती.

कोठून तरी क्षीणसर प्रकाश खोलीत झिरपत होता, वस्तूंना अस्पष्ट आकार येत होते. परिचित वस्तू आता शत्रुवत झाल्या होत्या. प्रत्येक काळोख्या कोपऱ्यात धमकी भरली होती. तोंडून आवाज फुटेना. शेवटी डोळे घट्ट मिटून घेऊन पांघरूण डोक्यावरून घेऊन मी तशीच पडून राहिले. किती वेळ? देवासच माहीत...त्या निष्ठूर जगात देव असला तर!

मनातली भीती खोटी नव्हती. मला पावलांची चाहूल लागत होती.

हलकेच, चाचपडत, परकी पावलं.

ते होतं तरी काय? अंधार होता म्हणून चाचपडत होतं की त्यातली निखळ दुष्टता निर्बुद्ध होती म्हणून? मला बाहेरचं काहीच दिसत नव्हतं! पण मनात अशी एक वेडी शंका आली की दिवा आपण जळत तर नाही ना ठेवला? आणि त्या प्रकाशामुळे तर ती अंधारातील राक्षसी निर्मिती अशी गोंधळून चाचपडत नसेल?

शेवटी भीती हीच माणसाला बुद्धिहीन बनवते. भीतीच्या प्रभावाखाली माणूस असा विसंगत वर्तन करायला लागतो... आणि ते उमजूनही त्याला वेगळं काही करता येतच नाही... जीवनरेषा ओलांडून मृत्यूच्या अंधारछायेत आलेले आम्ही...क्षणाक्षणाला अनंतकाळपर्यंत आम्ही हेच अनुभवत आहोत...

पूर्वायुष्यातल्या त्याच त्या प्रसंगातल्या छायांतून आम्ही वावरत असतो. त्यातून

वावरणाऱ्या आमच्या स्वत:च्या जाणिवांनाही आम्ही अस्पर्शच राहतो; आणखी कोणी असे दुर्दैवी जीव आसपास वावरत असतील तर त्यांनाही आम्ही अदृश्यच असतो; अशा एकाकी छायांकित जागांतून दडून बसतो; एकेकाळी प्राणाहूनही प्रिय असणाऱ्या व्यक्तींशी दोन प्रेमाचे शब्द बोलायला तळमळत असतो; पण आमची वाणी बंद असते आणि एकमेकांच्या प्राणभयाने वावरत असतो... जसे ते आम्हाला भेदरतात तसेच आम्हीही त्यांना भेदरतो...ही विसंगतीच नाही का?
आणि मध्येच असा एखादा अनपेक्षित क्षण येतो की ही अदृश्यतेची अस्पर्शतेची बंधनं गळून पडतात; दोघांमधला पडदा दूर होतो; प्रेमाची किंवा द्वेषाची दुर्दम्य शक्ती मृत्यूवरही मात करते आणि दोघांची दृष्टादृष्ट होते...मागे राहिलेल्यांना सांत्वनाचे वा इशाऱ्याचे वा प्रेमाचे दोन शब्द ऐकवायला किंवा त्यांच्या अपराधाचं प्रायश्चित द्यायला दोन क्षणांचा अवधी मिळतो...
त्यांना आम्ही कोणत्या रूपात दिसतो हे आम्हाला माहीत नाही; पण दुर्दैव असं की ज्यांच्यावर जन्मभर जिवापाड माया केली, ज्यांना केवळ सांत्वन, दिलासा द्यायचा आहे त्यांनाही आम्ही अघोरी रूपातच दिसतो...ज्यांच्याकडून आम्ही कणभर प्रेम, सहानुभूती, ममता यांची अपेक्षा करीत असोत त्यांची ही गोष्ट!
असा जीव भीतीने पिचला होता; प्रत्येक श्वास अखेरचाच ठरणार अशी भीती मनाला घोर लावत होती...कारण ते काहीतरी खोलीत आलं होतं...पण मग त्यालाच कसली तरी भीती वाटली असावी...कारण ते आलं तसंच, त्याच चोरट्या चाचपडत्या पावलांवर परत गेलं...
सुटकेचा मी एक दीर्घ श्वास सोडला...आणि कोणाला तरी सोबतीला बोलावण्यासाठी मी पलंगावरून उतरलेही होते...
पण मी इतक्या लवकर समाधान मानायला नको होतं. सुटकेची भावना फसवी ठरली. कारण ते परत येत होतं! आणि आता हालचाल चोरटी नव्हती... पावलापावलागणिक जमिनीचा कंप जाणवत होता... आता मी काय करू? कोठे जाऊ? कोण माझ्या मदतीला येणार? दातखिळी बसली होती, शरीर लाकडासारखं ताठ झालं होतं...
काहीतरी खोलीच्या दारापाशी आलं, क्षणभर थांबलं...
अंगाभोवती शाल घेऊन मी खोलीच्या कोपऱ्यात अंग अगदी चोरून बसले होते. देवाचं नाव घ्यायचा प्रयत्न करीत होते; पण भांबावलेलं मन शांतच होत नव्हतं. कसं होणार? काहीतरी खोलीत आलं होतं...पलंग चाचपून पाहत होतं...माझाच शोध घेत होतं!
देवा! आता मी काय करू? आता मला कोण वाचवणार?
ते पलंगापासून वळलं आणि जणू काही अंधारातही दिसत असावं त्यासारखं नेमकं माझ्याच रोखानं आलं.
माझी किंचाळी घशातच राहिली. मी सुटण्यासाठी तडफड केली; पण माझी अबलेची शक्ती त्या सैतानी आक्रमणापुढे कितीशी टिकणार? पोलादी हातांचा तो मृत्यूचा कांच गळ्याभोवती आवळला गेला. काचेच्या धाग्यासारखा तो अखेरचा क्षण लांबला, लांबला...आणि शेवटी तुटला...
***

शेवटच्या क्षणापर्यंत मला ते कोण होतं ते समजलं नाही आणि मग तर कळण्याची आशाच नाही. एकदा मृत्यूच्या प्रदेशात प्रवेश केला की मग इतर कोणतंही ज्ञान होत नाही. जिवंतपणी शेवटच्या क्षणापर्यंत जे काही हाती लागेल तीच नंतरच्या सर्व अनंत आयुष्यातील ज्ञानाची गोळाबेरीज. जवळ राहतात त्या गतायुष्यातल्या आठवणी-त्यांवर नवल करीत बसणं हेच तेवढं हाती असतं. त्यातलं कोणतंही रहस्य उलगडत नाही, कोणतंही कोडं सुटत नाही. मृत्यू हे काही वरदान नाही. मृत्यूने मानवाचा काही देव होत नाही. तो काही सर्वज्ञानी होत नाही, अभिज्ञानीही होत नाही. जिवंत असताना ज्या ज्या गोष्टींनी तो चक्रावलेला असतो त्या त्या सर्व तितक्याच अगम्य राहतात...आमचा प्रदेश अंधारा आहे; एकाकी, भयाण, ओसाड आहे; आमच्या व्यतिरिक्त तिथे आणखी कोणकोण किंवा काय वावरत असतं याची कल्पना नसते; पण भीती मात्र वाटत असते...काटेरी जाळीतून मधूनच एखाद्या हिंस्त्र श्वापदाची हालचाल दिसावी की जीव कसा घाबराघुबरा होतो, तशीच एखादे वेळी कसली तरी जवळीक जाणवते. मग ती कोणा जिवंत व्यक्तीची आहे का आमच्यासारख्याच एखाद्या दुर्दैवी शोकात्म्याची आहे, कळत नाही. कशाला लोक आमच्या मागं लागतात? ज्या गोष्टी आम्हाला अगम्य आहेत त्या जाणण्याची लोक का इच्छा धरतात? ज्या काही थोड्या गोष्टी आम्ही अनुभवतो त्या तुमच्या समजापलीकडच्या आहेत...तुमच्याशी संदेशन करायला आम्हाला तुमचीच भाषा जमेल तशी वापरली पाहिजे...शेवटी आम्ही काही कोणा नव्या जगातले रहिवासी नाही आहोत...त्या तुमच्या एकमेव जगाशिवाय दुसरं जग आम्हाला माहीतच नाही...पण आमच्यासाठी त्या जगात सूर्यप्रकाश नाही, रंग नाही, हास्य नाही, संगती नाही, क्रीडा नाही, पक्ष्यांचे कूजन नाही, मायाममता नाही, प्रेम नाही, प्रेमासाठी त्यागही नाही...

सर्वच मृत लोक अशा या अंधाऱ्या, बदललेल्या जगात सांदी-कोपऱ्यातून भयभीत होऊन, निराश- हताश होऊन वावरत असतात का? मला माहीत नाही. का मला अनैसर्गिक मृत्यू आला म्हणून अखेरच्या क्षणी माझा आत्मा मुक्त झाला नाही आणि याच अंधाऱ्या घळीमधून एखाद्या निर्बुद्ध पशूसारखा परिक्रमा करीत राहणार आहे? आणि हे कोठवर चालणार आहे? का या अशरीरी स्मृती वापरून गुळगुळीत झाल्या की त्यांचे ठसे पुसट होणार आहेत आणि मी स्वत:ला विसरून त्या अनंतात विलीन होणार आहे? देवा, या विश्वात तू कोठे असशील तर माझ्यावर दया दाखव आणि या अवस्थेतून सोडव! कशी अघोरी योनी की जिथे आपली सर्वात प्रिय माणसे आपल्याला दुरावतात,आपल्यापासून भयातिरेकाने मागे मागे सरतात! ते शेवटचंच एक सांगण्यासारखं बाकी आहे.

***

तुमच्या जगातील ती रात्री होती. त्या वेळी तुम्ही आपापल्या घरात जाता, दिवे मालवून टाकता. त्या वेळीच केवळ आम्ही आमच्या सांदीकोपऱ्यातून, माळयावरून, जिन्याखालून, तळघरातून, विहिरीच्या कपारीतून, झाडांवरून, फडताळातून बाहेर येऊ शकतो. चार मोकळे श्वास घेऊ शकतो. आमच्या आठवणीतल्या जुन्या स्थळांना, आमच्या जुन्या निवासस्थानांना भेटी देऊ शकतो, खिडक्यांतून आमच्या जुन्या वापरातल्या खोल्यांवरून नजर फिरवू शकतो, क्वचित प्रसंगी प्रत्यक्ष घरात प्रवेश करून निद्रावश झालेल्या आमच्या

एकेकाळच्या प्रियजनांचे चेहरे डोळे भरून पाहूही शकतो. अशीच एखादी संधी मिळावी म्हणून मी आमच्या वाड्याच्या आसपास किती तरी दिवस घुटमळत होते. हे कोणते पाश असतात माहीत नाही; पण आमचा प्रिय मित्र वा एखादा जन्माचा वैरी जोवर तिथे वास्तव्य करीत आहे तोवर त्या जागा आम्हाला जखडून ठेवतात. कोणत्या ना कोणत्या मार्गाने माझ्या यजमानांना, माझ्या प्रिय पुत्राला मी दृग्गोचर व्हावे, त्यांच्याशी दोन शब्द बोलता यावेत, त्यांना माझी सध्याची अवस्था कळावी, त्यांच्यापर्यंत माझं प्रेम, माया, ममता, जिव्हाळा पोचावा, यासाठी मी किती किती धडपड करीत होते! पण मी जवळ जाताच त्यांना जाग येई किंवा ते जागे असेलच तर त्यांची जळजळीत नजर माझ्यावर वळे...आणि त्या नजरेची मला इतकी भीती वाटे की सर्व काही विसरून मी मागे मागे सरकत असे.

त्या रात्री मी त्यांच्या शोधावर त्या घराभोवती सतत घिरट्या घालीत होते. ते दिसण्याची उत्कंठा होती, ते दिसण्याची भीतीही होती. चंद्राचा चंदेरी प्रकाश आम्हाला मानवतो, एक प्रकारचा धीर देतो. त्या रात्री मी दूरवर उभी राहून वाड्याकडे पाहत होते तोच मला वाड्याच्या मोठ्या दारात दोघं दिसले...माझे यजमान आणि माझा मुलगा! आणि मी जवळ येताच मला दिसलं की माझे यजमान अगदी सरळ माझ्याकडे पाहत आहेत. त्यांना मी दिसत होते! इतक्या दिवसांनी!

इतक्या दिवसांनी! आमच्यातला पडदा दूर झाला होता. अखेर प्रेमाने मृत्यूवरही मात केली होती. त्या एका आनंदाच्या जाणिवेत माझी भीती कोठच्या कोठे नाहीशी झाली. विरहाने त्यांचा आत्मा पोळला असेल; आठवणींनी वेड लागायची वेळ आली असेल; त्यांना दोनच सांत्वनाचे शब्द ऐकवावयाचे होते...मी सुखी आहे... मला विसरा...

म्हणून मी सावकाश त्यांच्याजवळ आले. मनातल्या मनात मला वाटलं, माझा चेहरा नक्कीच सुंदर,शांत, हसरा, प्रेमळ दिसत असला पाहिजे. मला त्यांचा एकच स्पर्श हवा होता, कानात एकच शब्द उच्चारायचा होता. ही मधली अलंघ्य दरी ओलांडून क्षणभराचा प्रेमसहानुभूतीचा संपर्क साधायचा होता.

पण हाय! मी जवळ पोचताच माझ्या यजमानांचा चेहरा भयातिरेकाने पांढरा फटक पडला, डोळे वटारले, चेहऱ्यावर प्रेताची अवकळा आली. काहीतरी ओरडत ते दोन पावलं मागे सरले आणि शेजारीच उभ्या असलेल्या, त्यांना सावरायला पुढे झालेल्या माझ्या मुलाला जोराचा धक्का मारून ते एकाएकी वेगाने दूर दूर पळून गेले. क्षणभरासाठी साधला गेलेला दुवा असा तट्दिशी तुटला; त्या घरालाच आठवणींनी जखडलेली मी...मी माझ्या यजमानांमागे जाऊ शकले नाही...त्यांचा आता काय ठावठिकाणा आहे मला माहीत नाही.

तिथे मूर्च्छा येऊन पडलेल्या माझ्या मुलाला चाकरांनी उचलून घरात नेला. त्याला मी कितीही प्रयत्न केला तरी माझ्या अस्तित्वाची एवढीशीही जाणीव देऊ शकलेले नाही. कदाचित त्याच्यात व माझ्यात आवश्यक तेवढा सहवास घडलाच नसावा.

पण माझे यजमान असे का वागले? त्यांच्या प्रिय पत्नीच्या जागी त्यांना असं काय भयप्रद दिसलं? दैवाने असा का सूड उगवावा माझ्यावर? या दोघांची मी अशी वैरीण का झाले? जितेपणी यजमानांना अशी विरहात लोटून आले आणि आता मृतावस्थेत आल्यावरही

मुलावर असा पितृवियोगाचा दुर्धर प्रसंग आणला!
हाय रे दैवा!

□□

# ५.

## तीस वर्षांपूर्वी

विद्याधरच्या बदल्या इतके वेळा व इतक्या वेगवेगळया गावी झाल्या होत्या की ती गोष्ट आता त्याच्या आणि नंदाच्या, दोघांच्या अंगवळणी पडली होती. मुलं कर्तीसवरती होऊन रांगेला लागली होती. शिवाय असं काही एक गाव नव्हतं की जे दोघांना आपलं खास आवडतं वाटत होतं-जिथून हलताना वाईट वाटावं- जिथे स्थायिक होण्याचे मनसुबे आखावेत. ज्या गावी जातील तेच आपलं गाव मानण्याचा त्यांचा स्वभाव झाला होता. तशी दोघांची प्रकृती उत्तम होती, तेव्हा बदली हा खऱ्या अर्थाने बदल वाटत होता; पण सोलापूरला जायचं आहे हे कळताच नंदाचा चेहरा क्षणभर उल्हसित झाला होता; पण दुसऱ्याच क्षणी किंचित हसू न तिने खांदे उडवले होते. विद्याधर हसून म्हणाला होता,

"आणि आता या प्रतिक्रियेचं स्पष्टीकरण दे बरं!"

"अगदी सोपं आणि सरळ- ती हसत म्हणाली,"

"सोलापूरपासून पाचसहा मैलांवरच बाळे नावाचे गाव आहे. तिथे माझ्या लहानपणी मी माझ्या थोरल्या काकांकडे जात असे. मॅट्रिकनंतर तर चांगली दीड दोन वर्षं राहिलेली मला आठवते...या सगळ्या आठवणी आल्या... मग पुढचंही आठवलं...त्यांची मुलं चांगली निघाली नाहीत...शिवाय या कुळकायद्याखाली तिथली जमीनही कुळांच्या मालकीची झाली...काकांच्या मालकीचा तेवढा तो मोठा वाडा मात्र राहिला असेल...आणि आता तोही ओस पडला असेल..."

"एवढंच?"

सांगण्यापुरतं एवढंच...नंदा काहीशी गंभीर झाली होती. विद्याधरने तो विषय पुढे वाढवला नाही. तो आता पन्नाशीच्या पुढे गेला होता, नंदाही अठ्ठेचाळीस वर्षांची होती. इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर एक गोष्ट त्याला पटली होती...प्रत्येकाच्या आयुष्यात असे काही प्रसंग असतात की त्याची आठवण स्वत:लासुद्धा नकोशी वाटते...ते अनुभव मनात खोलवर गाडून टाकण्याची प्रत्येकाची खटपट असते...आणि इतर कोणालाही त्यांची चर्चा करण्याचा किंवा ते उगाळीत बसण्याचा अधिकार नसतो...आणि प्रेमातल्या व्यक्तींनी तर आपल्या साथीदाराचे मन जपायला हवं. त्यांनी तर हे उल्लेख कटाक्षाने टाळायला हवेत. निवेदनाने दु:ख हलकं होतंच असा काही नियम नाही...नंदा खाली मान घालून बसली होती...तिच्या एकेकाळच्या काळयाभोर केसात आता तुरळकशी चंदेरी रेषा दिसायला लागली होती. तिने आपलं वय लपवण्याचा कधीच प्रयत्न केला नव्हता. जशी वर्षे उलटत गेली तसा (त्याच्यासारखाच!) तिलाही विषाद वाटला होता.

"चाळीशी उलटली की दिवस कसे पळायला लागतात नाही?" विद्याधर एकदा म्हणाला होता; पण त्यावर हसून मान हलवीत तो म्हणाली होती,

"अं हं! सुखाचे दिवस लवकर जातात!"

त्याने ही चर्चा लांबवली नव्हती. त्या एका वाक्यात त्यांच्या जीवनाचे सार साठवलं आहे

असं त्याला वाटे. कारण अनेक वेळा त्याने ते वाक्य मनाशी आठवलं होतं आणि या लहानशा प्रसंगाने मनावर थोडीशी छाया आलीशी वाटली. तिच्या गतायुष्यात असं काही होतं का की त्याची आठवण तिला दु:सह व्हावी? पण स्वत:चे काही अनुभव स्वत:शीच ठेवण्याचा हक्क त्याला मान्य होता. एक लहानसा उसासा टाकून त्याने विचार केला- शेवटी माणसं एकमेकांपासून अलिप्त राहतात हेच खरं! आता जवळ जवळ पंचवीस वर्ष एकमेकांच्या निकट सहवासात काढल्यावरही अशी रहस्यं शिल्लक होतीच!

तो सोलापूरला कामावर रुजू झाला. डिस्ट्रिक्ट हेडक्वॉर्टर असल्याने त्याच्या वापरासाठी गाडी होती. एका रविवारी सकाळी (त्याच्या मनात हा विचार बरेच दिवस घोळत होता ) तो नंदाला म्हणाला, नंदा, आज येतेस का तुझ्या त्या जुन्या वाड्यावर? हवा सुंदर आहे- जास्तीत जास्त दहा-बारा मैलांचं अंतर असेल. तासाभरात जाऊन येऊसुद्धा!

क्षणभर ती अगदी स्तब्ध झाली आणि मग म्हणाली,''पण तिथे आता काय असणार आहे? माणसं गेली, वाडा ओस पडला, आता तर पडीक झाला असेल!''

''पण पाहू तर खरं! माझी इच्छा आहे समज- पुन्हा आपण या बाजूला येणार नाही हे खास. काही खास हरकत आहे का तुझी?''

''तशी हरकत नाही- जरा वेळ थांबून ती म्हणाली, ठीक आहे- जाऊ या''

अंतर दिसायला लहान होतं; पण रस्ता इतका वाईट होता की त्यांना पोचायला ( वाटेत रस्ता विचारीत यावं लागलं ) तासाच्या वर वेळ लागला. गाव लागलं तशी नंदा एका एका ओळखीच्या जागेची आठवण सांगायला लागली आणि मग गाव संपल्यावर त्यांचा वाडा आला. चारी बाजूंनी डबराची भिंत बांधलेली होती; पण तिचा बहुतेक भाग ढासळला होता. जागा दाखवण्यापुरते दगड शिल्लक होते. दोन दगडी खांबात लाकडाचं फाटक असावं, आता फक्त दोन काळे, कुजलेले लाकडी खांब जाग्यावर होते. मधला रस्ता गवताने व्यापला होता. खाचखळग्याची कल्पना नसल्याने विद्याधरने गाडी अतिशय सावकाश आत नेली.

त्याचे लक्ष रस्त्यावर होते, म्हणून त्याला आधी वाडा दिसलाच नाही. शेजारी बसलेल्या नंदाच्या तोंडून ''अगबाई!'' असा आश्चर्याचा उद्गार निघताच त्याने आधी तिच्याकडे व मग तिच्या विस्फारलेल्या डोळयांच्या रोखाने समोर पाहिले आणि मग त्याला तिच्या त्या उद्गाराचं कारण समजलं.

तिला तर धक्का बसणं अगदी नैसर्गिक होतं. वाडा ओसाड असेल, पडीक असेल अशी तिचीही कल्पना होती; पण असा? भग्न? कोसळलेला? विद्रूप? विद्याधरने सहानुभूतीने नंदाकडे पाहिलं. तिच्या चेहऱ्यावरची वेदना अगदी बोलकी होती- त्याच्याही जिवाला चटका लावण्याइतकी.

''पुढे जायचं, का इथूनच परत फिरायचं?'' काही वेळाने त्याने विचारले.

आता परत फिरण्याने काय होणार आहे? ती व्यथित आवाजात म्हणाली. ''जे दिसायला नको ते दिसलं आहे. जे दृष्टीआड राहायला हवं होतं ते समोर आलं आहे...आता यापुढे मनात ती जुनी आठवण कशी राहील? ती कायमची गेली आहे...चला...सर्व काही पाहू... जखम नीट वाहून तरी जाऊ दे...!''

नंदाला कोणत्याही प्रकारे अधिक दुखवायची त्याची इच्छा नव्हती. काहीही न बोलता त्याने इंजिन बंद केलं, दार उघडून तो बाहेर आला. नंदाबरोबर सावकाश वाड्याच्या दिशेने निघाला. ती रस्त्याच्या कोणत्या तरी जुन्या आठवणीवरून चालली होती. खाली गवत आणि तण माजलं होतं. पायाभोवती खसखसत होतं. किडे आणि टोळ पावलागणिक उडत होते. ते दोघे पुढे आले. वाडा समोर आला. भिंतीचा सांगाडा उभा होता. दुसऱ्या मजल्यावरची कौलं निसटून खाली गवतात पडली होती. छपराचे वासे उघडे पडले होते, पावसाने कुजले होते. वावभर रुंदीच्या दगडाच्या जोत्याच्या भिंती वडाच्या, पिंपळाच्या झाडांनी फोडल्या होत्या...ती झाडं पुरुषपुरुष उंचीची झाली होती.

मोठ्या दरवाजाचं एक पाल तुटून गेलं होतं, दुसरं एखाद्या दारूड्यासारखं एकाच बिजागरीवर कललं होतं. दोघं सांभाळून आत गेले. आतमध्ये मोठं अंगण होतं. चारी बाजूंनी दुमजली बांधकाम होतं. आधेमध्ये रान माजलं होतं आणि बाजूच्या सर्व बांधकामाची पडझड झाली होती. मध्यभागी उभी असलेली नंदा अविश्वासाच्या नजरेने तिच्याभोवती पुन्हापुन्हा पाहत होती...

विद्याधरला वाटलं, कोणत्याही क्षणी तिच्या डोळयांत पाणी येईल...!

''इतकं वाईट वाटतं, नंदा?'' त्याने हळुवार आवाजात विचारलं.

''मला...मला कल्पना नव्हती- ती गुदमरलेल्या आवाजात म्हणाली, सगळं सगळं गेलं- नाहीसं झालं- मातीत, अक्षरश: मातीत मिसळलं-'' आणि मग तिने पुन्हा एकदा खांदे किंचित उडवले, मान वर केली. तिच्या डोळयात एक वेगळीच चकाकी आली होती. ती हसली आणि बोलली तेव्हा आवाज ठिसूळ आणि कठीण झाला होता...किती वेडं असतं माणसाचं मन, नाही? स्वत:च्या मनातल्या आठवणींच्या धाग्यांनी तो सृष्टीला बांधू पाहतो! आपण हलतो आहोत तसं सारं जग, सारी चराचर सृष्टीही आपल्या बरोबर हलते आहे, दिवसादिवसाने जुनी होत आहे, बदलत आहे ही गोष्ट तो विसरतो! तो स्वार्थी आहे! त्याच्या मनातली स्वप्नं त्याला भंग पावायला नको असतात! जरा काही बदल झाला की त्याला अगदी जिव्हारी जखम होते!

अन्योक्तीच्या रूपाने ती स्वत:च्याच संवेदना सांगत होती असं विद्याधराला वाटलं. तिला दिलासा कसा द्यावा किंवा तिची ही वेदना सौम्य कशी करावी हेच त्याला समजेना. शेवटी तो तिच्याकडे न पाहता म्हणाला,

''इथे होतीस त्याला आता किती दिवस झाले? तेव्हा केवढी होतीस?''

''माझा जन्म चोवीसचा...इथे होते तेव्हा युद्ध चाललं होतं...पण संपलं नव्हतं...म्हणजे मी अठरा-एकोणीस वर्षांची असेन... सुदैवाने त्याला योग्य तेच शब्द सापडले होते. तिच्या मनाभोवती आवळलेल्या आठवणीच्या पोलादी पट्टीची कळ सापडली होती, फिरवली गेली होती; पट्टी सुटत होती...''

''आता कितपत शिल्लक आहे कुणास ठाऊक... पण चला ना, दाखवते तुम्हाला कुठे कुठे काय काय होतं ते...'' तिच्या आवाजातला तो अनैसर्गिक कठीणपणा गेला होता; एका नैसर्गिक उत्साहाने ती उजवीकडच्या खोलीकडे वळली होती.

पहिली खोली स्वयंपाकघराची होती आणि भिंतीचा वरचा भाग धुराने काळाकुट्ट झालेला

होता. भिंतीच्या एका कोपऱ्यात जुन्या पद्धतीचं मोठं चुलाण होतं. ''हिवाळ्यात सकाळी आमची बैठक इथे असायची...अंघोळीसाठी चुलीवर रात्रीच मोठा हंडा ठेवलेला असायचा...काकू त्याच्याभोवती पोत्यांच्या घड्या घालून ठेवी- त्याला 'बुवा' म्हणायची...पहाटेस खाली फुफाटा असायचा...तिथे आम्ही शेक घेत घेत कांदे- बटाटे भाजून खात बसायचे...''

मधल्या मोडक्या दारातून ती दोघं शेजारच्या खोलीत गेली. एका अंगाची भिंत पडली होती. मातीच्या ढिगाऱ्यावर चढून बाहेरचं गवत आत आलं होतं. नंदा अजूनही तिच्या भूतकाळाच्या आठवणीतच वावरत होती.

'हे काकूचं माजघर होतं. दुपारची ती येथेच काहीतरी करीत असायची. मोठी उद्योगी बाई. आता आठवतं, दुपारची एकदाही तिला कधी झोपलेली पाहिली नाही मी. बाईला निवडण काढून देईल, तिच्यावर देखरेख करील...नाहीतर कोणाचे काही कपडे दुरुस्त करायचे असतील तर त्यांचा ढीग आणि सुई दोरा घेऊन बसेल... आणि ती भजनही फार सुंदर म्हणायची हो...त्या खुंटीला...नंदाचा हात वर गेला आणि खाली आला. ती भिंतच उभी नव्हती- खुंटी कोठून असणार?...तिथे...तिथे...खुंटीला तिची एकतारी असायची.'

ते घाईने पुढच्या खोलीत गेले. तिथून वरच्या मजल्याकडे एक जिना जात होता; पण जिन्याच्या पाच सहाच पायऱ्या शिल्लक होत्या... तिथेच तो एखाद्या हवेतल्या बुरुजासारखा थांबला होता. त्यावरचा सर्व भाग कोसळला होता. एका परिचित, सवयीच्या, गृहीत धरलेल्या वस्तूची ती उलटापालट मोठी चमत्कारिक होती. शून्याकडे नेणारी ती वाट...त्या वाड्याचं भविष्यच जणू दाखवत होती...मनातल्या खिन्न विचारांचं विद्याधरला नवल वाटलं. त्याला क्षणभर असं वाटलं की अस्तित्वाचे शेवटचे क्षण मोजणाऱ्या या वास्तूभोवती आतापासूनच पलीकडच्या त्या अगम्य जगाचा प्रभाव पसरू लागला आहे.

''आई ग!'' एक लहानशी किंचाळी देऊन नंदा झटकन मागे सरली. भिंतीच्या कोपऱ्यात एक भला मोठा सरडा आपल्या मण्यासारख्या डोळयांची नजर त्यांच्यावर खिळवून, खालचा जबडा लहानमोठा करीत बसला होता...एक लहान दगड त्याच्या दिशेने फेकताच तो पाहता पाहता अदृश्य झाला होता...पण पुढची पावलं नंदा खाली पाहत पाहत काळजीने टाकत होती.

एक मोठी फरसबंद खोली लागली. बाहेरच्या काही झाडांच्या संरक्षणामुळे इथला बराच भाग- निदान बाहेरच्या भिंतींचा तरी- शाबूत होता.

''काही मोठं कार्य असलं की इथे पंगत बसे.'' नंदा म्हणत होती.

आमचा गणपती-उत्सवही याच दिवाणखान्यात होई. याच्यावर काकांची मोठी खोली होती. त्याच्यावर गच्ची होती- आणि गच्चीच्या टोकाची एक लहानशी खोली मी वापरत होते...विद्याधर तिच्या शब्दांबरोबर वर पाहत होता. वरच्या दोन्ही कडीपटांना मोठमोठी खिंडारे पडली होती आणि त्यांच्यातून वरच्या खोलीचा आणि तिच्यावरच्या लहानशा खोलीचा काही काही भाग दिसत होता.

खालची मोठी खोली ओलांडून ते पलीकडच्या भागात आले. इमारत डावीकडे वळली

होती. कोपऱ्यातल्या खोलीत आणखी एक जिना होता. बहुतेक तिच्या काकांच्या खाजगी वापरासाठी तो असावा. त्याच खोलीत बाहेरच्या बाजूस उघडणारं एक दार होतं. आता त्याची चौकटसुद्धा शिल्लक राहिली नव्हती. सकाळचा प्रखर सूर्यप्रकाशात त्या मोठ्या चौकोनातून आत येत होता.

विद्याधर परत एकदा मागे वळून मागच्या मोठ्या खोलीकडे पाहत होता; पण त्यापेक्षा त्याच्या मनात तरुण नंदाचा विचार होता. सतरा-अठरा वर्षांची नंदा खालच्या पंगतीत जिन्नस वाढत असेल...आताही ती चांगली कामसू होती...तेव्हा तर विजेसारखी चपळ असेल...आणि मग तिसऱ्या मजल्यावरच्या तिच्या त्या लहानशा खोलीत जात असेल...त्याने परत समोर पाहिले तेव्हा त्याला नंदा दिसली नाही. त्याने हाक मारली- नंदा! पुन्हा एकदा...पण तिची ओ काही येईना...त्याची नजर वर गेली...वर तिची खोली होती...तिथे तिच्या अनेक आठवणी गुंतल्या असल्या पाहिजेत...सुरुवातीस तिची इथे यायची इच्छा नसली तरी एकदा इथे आल्यावर ती जुन्या स्मृतींच्या प्रभावाखाली आली असणार...नक्कीच ती वर गेली असणार!

नंदा! सांभाळून हं! इथेच पडके जिने आणि कोसळल्या भिंती मोठ्या धोक्याच्या होत्या आणि नंदाही आता काही तरुण राहिली नव्हती...आणि तरीही तिचा प्रतिसाद आला नाही तेव्हा विद्याधरही वर निघाला.

जिन्यात उन पडलं होतं- कारण एका बाजूचं छत कोसळलं होतं. वर चढता चढता त्याला भिंतींची दुर्दशा दिसत होती. गिलावा पडला होता, विटा खचल्या होत्या. त्यांचा खच वाटेत पडला होता. नंदा इतकी झटपट वर गेली तरी कशी? पहिला जिना संपला. काकांच्या खोलीचं दार आलं. दार मोडकं होतं- आत कललं होतं. भिंतीजवळची दोन फुटांची फरशी शिल्लक होती. मधला सगळा भाग खाली कोसळला होता.

"नंदा!" विद्याधरने पुन्हा एकदा हाक मारली, हाकेला उत्तर यायची काही वेळ वाट पाहिली आणि उत्तर आलं नाही तसा तो आणखी वर निघाला. आधीपासूनच हा जिना लहान होता. हे असे डगमगते जिने, पायाखालची जमीन पक्की नाही. नको नको ते विचार मनात येऊन त्याची छाती धडधड करायला लागली. त्याला एकाएकी या भग्न पडक्या वाड्याचा राग आला. स्वत:चं गुपित आपल्या कोषांत घेऊन बसलेली ती वस्तू एकदम एखाद्या शत्रूसारखी वाटायला लागली...

त्या दहा बारा पायऱ्या संपल्या आणि तो वरच्या खोलीच्या दाराशी आला. दाराच्या चौकटीचा आधार घेऊन तो आत वाकून पाहू लागला...पण आत काहीच नव्हतं... सर्व जमीनच खाली कोसळली होती...खाली...खाली तळमजल्याची फरशी होती...

आणि तिथेच नंदा होती. फरशीवर अस्ताव्यस्त पडली होती. एक हात एका बाजूला लांब गेला होता, दुसऱ्या हाताची घडी होऊन पंजा कपाळावर होता. कपाळापाशी बारीकशी जखम होती. तिथून एक लालभडक ओघळ निघाला होता...क्षणभर त्यालाच भोवळ आल्यासारखी झाली. नंदा! नंदा! तो ओरडला सोनेरी ऊन काजळलं होतं, घराचं घुमट चारी बाजूंनी त्याला आवळत होतं. हे घर, जुनाट, मोडकं, मरणाच्या पंथाला लागलेलं घर- त्याने शेवटी तिचा बळी घेतला होता! नंदा इथे यायला नाखुश होती. त्यानेच तिला

बळेबळे इथे आणली होती...पण तरीही तिला इथे वर यायची काय जरुरी होती? मनात विलक्षण दु:ख आणि तितकाच राग दाटून आला. दाराची चौकट हातात घट्ट धरून तो खाली वाकला आणि मोठ्याने ओरडला- "नंदा! तरी सांगितलं होतं! सांभाळून जा म्हणून सांगितलं होतं! कशाला आलीस वर?"
ती वर आली असेल, एखादी ओळखीची जागा पाहायला पुढे झाली असेल आणि पायाखालचा आधार निसटून वीस-बावीस फूट खाली, सरळ, त्या फरशीवर पडली असेल...इतकी निश्चल पडली होती की खासच मृत झालेली असणार... सर्व देखावा नजरेभोवती गरगर फिरायला लागला...त्याला वाटलं, आता जर मी स्वत:ला आवरलं नाही तर माझाही तोल जाईल आणि मीही खालच्या फरशीवर नंदाशेजारी कोसळून कपाळमोक्ष करून घेईन. डोळे घट्ट मिटून घेऊन तो मागे वळला आणि चाचपडत जिन्याची भिंत शोधायला लागला...
एकाएकी त्याच्या हाताची हालचाल थिजून गेली.
त्याच्या मागे; त्या अर्धवट खचलेल्या खोलीत, कोणीतरी स्वत:शीच गात होतं. आवाज ओळखीचा वाटत होता; पण कुणी असेलच कसं तिथे? का अनिवार दु:खाने एवढ्यातच त्याच्या मेंदूच्या चिंधड्या उडाल्या? काही क्षण तो तसाच मिटल्या डोळ्यांनी, हालचाल न करता उभा राहिला.
गाणारी व्यक्ती स्त्री होती, नाही- तरुण मुलगी होती. त्या लकेरीचे सूर ओळखीचे...किती ओळखीचे वाटत होते!...नंदाचा आवाज! विद्याधरचे सर्व अंग थरथर कापायला लागले. त्या आवाजाचा प्रत्येक तरंग त्याच्या काळजातून सुरीसारखा आरपार जात होता...पण मागे वळून पाहायची त्याची हिंमत होत नव्हती...अजून नव्हती...पण शेवटी त्या ताना जेव्हा अगदी असह्य झाल्या तेव्हा त्याने गर्रकन शरीर वळवलं आणि खोलीत पाहिलं.
आपल्याला वेड लागतंय की काय अशी त्याला शंका आली.
कारण मघाची पडीक, विनाजमिनीची खोली गेली होती आणि तिथे आता एक सुसज्ज, सामानाने भरलेली, चांगल्या अवस्थेतली खोली होती...आणि त्या खोलीत एक तरुण स्त्री- स्त्री कसली, यौवनाच्या काठावरची मुलगीच- वावरत होती. खिडकीतून सकाळचं तिरकं ऊन खोलीत येत होतं. ती मुलगी गात होती...स्वत:शीच विलक्षण आनंदात गात होती...तिचा चेहरा एकदम वळला आणि विद्याधरकडे फिरला. काळजाला एक हिसका बसून त्याचं मन मागे, एकदम मागे, तीस वर्षांपूर्वीच्या एका क्षणाकडे गेलं...समोरचा चेहरा परिचित होता...
ती नंदाच होती...पण अठरा वर्षांची, तीस वर्षांपूर्वीची नंदा...
काळ नुसताच मागे गेला नव्हता, त्या अविस्मरणीय क्षणी थांबला होता...
सर्व विश्वच थांबलं होतं...त्याची नाडी थांबली होती...त्याच्या नजरेला एक अनैसर्गिक धार आली होती. एकाच वेळी तो खोलीतील सर्व काही आणि त्याच क्षणी खोलीच्या फरशीतून खालच्या दिवाणखान्याची जमीन व त्यावर अस्ताव्यस्त पडलेली नंदाची ती निश्चल आकृतीही पाहू शकत होता.
नंदाने निळी साडी नेसली होती, केसांच्या दोन वेण्या घातल्या होत्या...

खांद्यापाशी फुगे असलेला ब्लाऊज घातला होता...कानात निळया खड्यांचे चौकडे होते...हातात जाळीच्या पाटल्या होत्या...एकदाच अनुभवलेली आणि कालप्रवाहात कायमची गडप झालेली नंदाची यौवनातील आकृती त्याच्यासाठी या क्षणी साकार झाली होती.
त्याच्यासाठी?...एक कळ उठली...त्याच्यासाठी नाही...
नंदा गात गात टेबलापाशी पोचली होती...टेबलावरचा एक फोटो उचलून तिने जवळ घेतला होता...विद्याधरला त्या फोटोतला चेहरा दिसला...हसरा, उमदा, पण परका...संपूर्ण परका! ही नंदा त्याच्यासाठी गात होती...विद्याधरसाठी नाही. विद्याधरची नंदा खाली वीस फूट खोल, फरशीवर पडली होती...आणि त्या भयानक, जीवघेण्या शांततेत त्याच्या कानावर एकतारीचा आणि भजनाचा पुसटसर आवाज आला. सर्व अंगावरचे केस शहारून ताठ उभे राहिल्याची त्याला जाणीव झाली. एखादा साधा आवाज इतका भीतीदायक असू शकतो यावर त्याचा विश्वास बसला नसता...त्याच्या आसपास होत होतं तरी काय?...
त्याला या चमत्काराची काय मातब्बरी होती? त्याला आता कशातच काही स्वारस्य नव्हतं...नंदा गेली होती, तिच्याबरोबर सर्व काही गेलं होतं...थिजलेल्या नजरेने तो फरशीतून दिसणाऱ्या त्या अस्ताव्यस्त आकृतीकडे पाहत होता...तिच्या अंगावर निळं पातळ होतं- निळं? मेंदूचा एक कोपरा विचारीत होता...पण आज त्याच्या बरोबर येताना तर ती पांढरी वायल नेसली होती...असेना का निळं! आता कशाला काय अर्थ होता? आयुष्याचा यापुढचा रिकामेपणा, निरर्थकपणा, एकाकीपणा त्याच्याभोवती एखाद्या वणव्यासारखा उसळत होता...श्वास घेणं कठीण होतं...छाती जळत होती.
यौवनाने रसरसलेली, स्वत:शी गाणारी, आपल्या प्रियकराचा फोटो जवळ घेणारी तीस वर्षांपूर्वीची नंदा तो विसरला...जड, जड, शिशाच्या पावलांनी एक एक पायरी उतरून खाली आला...आणखी एक जिना उतरून आला...आणि आता डोळयाला पाणी आलं होतं...समोरचं अस्पष्ट दिसायला लागलं होतं.
जवळ जवळ चाचपडत तो खोलीच्या मध्याकडे निघाला...तिथेच ती आकृती पडली होती...आणि वर, त्याच्या माथ्यावर, ती दुसरी नंदा होती...
गुडघे टेकून तो खाली बसला....
अगबाई! मागून आवाज आला, हे काय चाललंय?
विद्याधर हात पुन्हा पुन्हा फरशीवर फिरवत होता. फरशी रिकामी होती. तिथे काही नव्हतं. त्याच्या केसावर कोणाचा तरी हात होता; पण अजून तो मागे पाहात नव्हता...वर पाहात होता...वरची ती भूतकाळातून क्षणापुरती तरंगत आलेली खोली आता नाहीशी झाली होती...वर पडक्या भिंती आणि कौलं नसलेलं छप्पर होतं... मग तो वळला...
त्याच्या शेजारी नंदा उभी होती. असं काय करताहात? तिने पुन्हा विचारलं; पण त्याचा चेहरा पाहताच ती एकदम स्तब्ध झाली.
तूच आहेस ना, नंदा? खरी आहेस ना?
त्याचा आवाज एकदम घोगरा झाला होता. डोळे बावरल्यासारखे झाले होते. एखाद्या भयानक स्वप्नातून जाग आल्यासारखी त्याची अवस्था झाली होती. डोळयांवरचा विश्वास

काही क्षणांपुरता तरी गेला होता (आता याच डोळ्यांनी त्याची भयानक फसवणूक केली होती ) म्हणून पुढे होऊन त्याने नंदाला हात लावून पाहिला... हाताला, दंडाला, केसांना, मग गालांना...नंदा काही बोलली नाही, तरी तिच्या गौरवर्णी गालांवर एक स्पष्ट रक्तिमा आला...
पण विद्याधर कोणत्यातरी चमत्कारिक आणि भीतीदायक प्रसंगातून गेला आहे ही गोष्ट तिच्या ध्यानात आली आणि ती काही न बोलता त्याच्यापाशी नुसती उभी राहिली.
✻✻✻ते दोघं वाड्याबाहेर आले होते. सुंदर सूर्यप्रकाश पसरला होता; पण त्याला या वाड्याबद्दल, या सर्व वास्तूबद्दलच एक विलक्षण तिरस्कार वाटायला लागला होता. या भग्न वास्तूच्या गाभ्यात एखाद्या विषारी किडीसारखं काहीतरी दबा धरून बसलेलं आहे, बेसावध माणूस त्याचं सावज बनतो अशी त्याची खात्री झाली होती. बुडता बुडता वाचलेल्या एखाद्यासारखी त्याची दमछाट झाली होती. अजूनही त्याची नाडी नेहमीसारखी धावत नव्हती- मधूनमधून काळजाची एकदम धडधड होत होती.
‘‘आता कसं वाटतं? बरं वाटतं का?’’ नंदा विचारीत होती. तिच्या आवाजात थट्टेचा एवढासाही अंश नव्हता. तिच्या आवाजात, हावभावात, डोळ्यात त्याच्यासाठी फक्त सहानुभूती होती, काळजी होती, प्रेमाचा ओलावा होता...अगदी त्या क्षणीही त्याने स्वत:ला बजावलं- हा तिचा पंचवीस वर्षांचा प्रेमळ सहवास मला विसरता कामा नये- इतर सर्व तर्क ठरतील, ही मी अनुभवलेली वस्तुस्थिती आहे...
‘‘आता-आता ठीक आहे-’’ तो अडखळत म्हणाला आणि गाडीला टेकून उभा राहिला. समोरच्या त्या पडक्या वास्तूकडे आता तो न बिचकता पाहू शकत होता. तोंडून भक्ष्य सुटल्याने चवताळलेल्या हिंस्र श्वापदासारखा तो वाडा दिसत होता. नंदाला याची काही कल्पना होती का? त्यासाठीच ती सुरुवातीस इथे यायला आढेवेढे घेत होती का? पण ते तिला विचारण्याआधी त्याला त्याचा अनुभव तिला सांगायला हवा होता...कारणं दोन होती... एक तिच्या या खाजगी आयुष्यात तिच्या अपरोक्ष डोकावण्याचा त्याला अधिकार नव्हता...आणि दुसरं...त्याला दिसलेलं खरं असेलच यावर त्याचा विश्वास नव्हता; त्याचं मन कलुषित करण्यासाठीही हा कट असण्याची शक्यता होती. कुणाचा कट? ते मग...आणि यातला खरा प्रकार समजल्यावर मगच त्याला आपल्या अजब अनुभवाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न तरी करता येईल...तेव्हा मग...पण तो काही बोलण्याआधीच नंदा त्याच्याजवळ आली आणि म्हणाली,
‘‘आता सांगा- मघाशी काय झालं होतं तुम्हाला?’’
‘‘सांगतो-त्याआधी एकच प्रश्न...तू अचानक कुठे नाहीशी झालीस? तू वर गेलीस या कल्पनेने मी जिन्याने वर गेलो...’’
‘‘मी? मी तर मागच्या दाराने बागेत पाहून आले...नाही म्हटलं तरी जुन्या आठवणी येतातच...तिथेच आमचा झोका होता...त्यापलीकडे जाईचा मांडव होता...तिथे उन्हाळ्याच्या रात्रीच्या आम्ही जमत असू... किंवा कुणाची मंगळागौर जागवायची असली तर त्याच अंगणात जमायच्या साऱ्याजणी...’’
‘‘तुला पाय घसरून, नाहीतर काही होऊन अपाय व्हायचा अशी भीती वाटली...म्हणून

तुला हाका मारीत मारीत मी वर गेलो...''
''मला हे घर आणखी कसला अपाय करू शकणार आहे? जो काही घात व्हायचा तो पूर्वीच झाला आहे. आता मला दुखवायची शक्तीच या घरात उरलेली नाही. ते एक कलेवर आहे...अर्थहीन, निर्जीव, अभद्र...''
''नंदाचा आवाज पुन्हा एकदा विलक्षण कडवट झाला होता. विद्याधर जरा पुढे वाकून म्हणाला, नंदा, आता ऐक, एवढ्यात मला काय दिसलं- किंवा दिसल्याचा भास झाला ते...दिसलं असणं असंभाव्यच आहे...पण ऐक...तू इथे राहात होतीस तेव्हा अठरा वर्षांची होतीस ना? त्यावेळी तुझं निळया रंगाचं, पांढऱ्या फुलांच्या काठाचं पातळ होतं? निळया खड्यांचे चौकडे होते? पांढऱ्यावर निळया ठिपक्यांचा ब्लाऊज होता? खांद्यापाशी फुग्याच्या बाह्यांचा? गळयात दोनपदरी सोन्याचा हार असायचा? तुझ्या त्या वरच्या खोलीत हिरव्या मेणकापडाचा टॉप असलेलं टेबल होतं? खिडक्यांना पिवळया, पातळ कापडाचे पडदे होते? त्याच्या प्रत्येक प्रश्नाबरोबर तिचा चेहरा बदलत होता...क्षणाक्षणाला त्यावरचं नवल वाढत चाललं होतं...विद्याधर अगदी हळू आवाजात म्हणाला आणि नंदा, त्या टेबलावर कुणाचा तरी फोटो होता, हो ना?''
तिचा चेहरा एकदम गोरामोरा झाला. तिच्या हातावर हात ठेवीत विद्याधर म्हणाला, नंदा, या घरात काय झालं ते तुला विचारायच्या आधी मला काय दिसलं हे मी तुला सांगितलं आहे. तुझ्यावर माझा कोणताही आरोप नाही... मला सांगच असाही आग्रह नाही...हलकं वाटणार असलं तर सांग...या तीस वर्षांपूर्वीच्या घटनांशी मला काहीही कर्तव्य नाही.
नंदाचे डोळे पाण्याने भरून आले होते. 'तो श्रीरंगाचा फोटो होता-'
ती खालच्या मानेने बोलत होती, माझा मामेभाऊ होता. त्याने नुकतंच कमिशन घेतलं होतं आणि ड्यूटीपूर्वीच्या रजेवर तो काकांना भेटायला आला होता. फार फार चांगला होता हो तो...त्याच त्या जाईच्या मांडवाखाली आमच्या दोघांच्या भेटी झाल्या होत्या...आणाभाका झाल्या होत्या. श्रीरंग बर्मा फ्रंटवर गेला...आणि...आणि...मी इथे असतानाच तार आली...तो...तो...
तिला एकदम रडू कोसळलं. ती लहान मुलासारखी भडाभडा रडत नव्हती. जमिनीच्या खोल, खोल गर्भातून आलेल्या पाण्यासारखं हे डोळयातलं पाणी काळजाचा गोठलेला गाभा फोडून बाहेर आलं होतं. त्या वेदनांमागे तीस वर्षांचा पीळ होता. विद्याधरपाशी सांत्वनाचे शब्द तरी कुठे होते? त्याने हलकेच नंदाला जवळ घेतली...तिला आवेग आवरत नव्हता...
''मला त्यावेळी कशाची कल्पना होती? आयुष्याचा वरवरचा निळाशार, नितळ, मोहक पृष्ठभाग दिसत होता...त्यावर तरंगणारी प्रतिबिंब मी खरीच मानून चालत होते...मला काय माहीत या पृष्ठाखाली विश्वासघातकी, जीवघेण्या कपारी आहेत? इथेच मी प्रेमाचं पहिलं स्वप्न पाहिलं... आणि इथेच ते अगदी माझ्या डोळयासमोर तडकलं...''
कुणाला काही कल्पना नव्हती...मी माझं दु:ख कसं लपवलं देवास माहीत...पण मग इथून मी जी एकदा गेले ती परत या वाड्यात आले नाही-

‘‘पण मला सांगितलं असतंस तर आपण इथे आलोच नसतो!’’
‘‘त्यावेळच्या भावना तीव्र होत्या, त्या खऱ्याही होत्या... ते दुःख खरं होतं... पण मग त्याची माझ्यावरची पकड ढिली झाली...आता ती साधी आठवण झाली होती... तुमच्या त्या अचूक वर्णनाने तो क्षण परत डोळ्यासमोर उभा राहिला...’’
‘‘तेच मला दिसत होतं. तीस वर्षांपूर्वीची तू दिसलीस...’’
‘‘पण खालच्या फरशीवर तुम्ही काय करीत होतात?’’
‘‘मला भास झाला की तू खाली पडली आहेस- जाऊ दे! आता सर्व काही- निदान बहुतेक सर्व- उलगडा झाला आहे. परत आपण या बाजूला येणार नाही हे नक्की...त्या वाड्याला आपलं गुपित घेऊन बसू देत.’’
एकच क्षण त्याला वाटलं होतं की नंदा गेली- आणि त्या कल्पनेच्यासुद्धा चटक्याने त्याचा जीव पोळला होता. जणू अग्निपरीक्षाच झाली होती आणि नंदाची प्रतिमा तप्त सुवर्णासारखी तावून सुलाखून निघाली होती. तिच्याबद्दल त्याच्या मनात कधीच शंका आली नव्हती. हातच्या कंकणाला आरसा कशाला हवा होता?
आरसा? त्याला दिसलं होतं ते एक भासात्मक, प्रतिबिंबासारखंच चित्र नव्हतं का?
एका ठराविक कोनातच आरसा प्रतिबिंब दाखवतो. या वाड्यात तरुण, भावविवश नंदाच्या प्रखर भावना साठवल्या गेल्या होत्या. क्षणभर त्याला त्याचेच तर चित्र दिसलं नाही? पण नाही, हे बरोबर वाटत नव्हतं... त्याला खालच्या फरशीवर दिसलेल्या आकृतीचं त्याने स्पष्टीकरण होत नव्हतं...सर्व मनाचेच भास म्हटलं तरी त्या भासामागेसुद्धा काहीतरी कारण आवश्यकच होतं...असं वाटत होतं की या विकारांनी भारलेल्या वास्तूवर आपटून काळाचे दोन प्रवाह होत होते...एक भूतकाळात जात होता आणि दुसरा भविष्यकाळात. त्या घरात त्याला तीस वर्षांपूर्वीची नंदा गाताना, आनंदात दिसली होती...आणि तोल राखण्यासाठी की काय, भविष्यातलं एक सांकेतिक चित्र दिसलं होतं...निश्चल झालेली नंदा...
केवळ विचारानेही त्याचा गळा आवळून आल्यासारखा झाला. एका प्रेमभंग झालेल्या कोवळ्या जिवाच्या भावनांचा उत्सर्ग त्या वाड्यात साठवला होता...आणि तीच नंदा परत त्या वास्तूत येताच त्याचा हा असा भयानक आविष्कार त्याला दिसला होता...एकदाच... बस् ! पुन्हा नको! पुन्हा कधीही नको!

□□

## ६. पुनर्भेट

बागेच्या फाटकातून तो आत शिरला होता तेव्हा त्याच्या मनात क्षणभर एक अनिश्चिततेची भावना येऊन गेली होती; पण आता या वडाच्या झाडाखाली, गारेगार हिरव्या सावलीत येऊन पोहोचताच त्याचं मन सुखावलं होतं. या हिरव्यागार सावलीसारख्याच आठवणी चारी बाजूंनी त्याच्यावर झाकाळून आल्या होत्या. डोक्यावरच्या हजारो सळसळत्या पानांसारख्या त्या सळसळत होत्या.

उन्हाचे ठिपके सारखे हलत होते आणि धक्का बसलेल्या पाण्यासारखे त्याचे विचार हिंदकळत होते. समोरची पारंबी मनातल्या आठवणी जाग्या करीत होती. त्या संध्याकाळी भ्याललेली चिमी...

पण ते सगळे कोठे होते? दत्तू, शंकर, ललिता, चिमी...सगळे होते तरी कोठे? त्याने कान देऊन ऐकलं, पण त्यांचा आरडाओरडा कानावर येईना. मोटेच्या चाकाची कुरकुर तरी कानावर यायला हवी होती; पण आज मोटेलाही सुटी होती वाटतं; पण बाकीचे सारे कोठे गेले होते? निदान ललिता तरी...

तिचा विचार मनात येताच त्याच्या सर्वांगावर एक गोड शिरशिरी उठली. आजच सकाळी त्याने तिला विहिरीपाशी एकटी गाठली होती आणि मनातला विचार बोलून दाखवला होता. ती किती लाजली होती! किती कावरीबावरी झाली होती! त्याने तिला पुन्हा पुन्हा विचारलं होतं तरी तिला काही बोलायलाच सुचत नव्हतं. शेवटी तो गप्प बसेना तेव्हा ती इकडे तिकडे पाहात अगदी हलक्या आवाजात म्हणाली होती, ‘‘इथे नको! दुपारी बागेत भेटा ना!’’ आणि मग तिच्या टपोऱ्या डोळ्यांतली याचना पाहून तो तिथे फार वेळ थांबला नव्हता. वासूकाकांची भीती होती. त्यांच्या कानावर काही गेलं असतं तर साऱ्या घरभर त्यांचा आवाज गरजला असता...

पण आता त्यांचा तर नाहीच; पण इतर कोणताच आवाज कानावर येत नव्हता. वास्तविक बाग इतकी शांत कधीच नसायची. जमनी नाहीतर हरबा, कोणीतरी सारखं कामावर असायचंच. एका कोपऱ्यात गोठा होता. गाई-म्हशींच्या गळयातल्या घुंगरांचा आवाज, त्यांच्या हंबरण्याचा आवाज, गव्हाणीवर शिंगे आपटल्याचा आवाज, साखळया खळखळल्याचा आवाज...काहीच कसं ऐकू येत नव्हतं? जमनी गोवऱ्या थापीत असायची, तिची सारखी बडबड चाललेली असायची- तिचा आवाज येत नव्हता. हरबाचंही बागेत काही ना काही काम चाललेलं असायचं. आज तोही दिसत नव्हता. मग सगळे होते तरी कोठे?

इतका वेळ तो झाडाला टेकून उभा होता. झाडाची साल पाठीत रुतल्यामुळे असेल; पण त्याच्या पाठीतून बारीक बारीक चमका निघत होत्या. समोरच्या हलणाऱ्या कवडशांनीही असेल; पण डोळे थकल्यासारखे झाले होते, पाणावल्यासारखे होत होते, लांबवरचं स्पष्ट दिसत नव्हतं, दिपल्यासारखं वाटत होतं.

त्याला एका जागी उभं राहवेना. इतरांचा शोध घ्यायला हवा होता. ही चमत्कारिक

शांतता का हेही पाहायला हवं होतं. घराकडे जायची जवळची वाट होती. अळूच्या खाचरापलीकडेच दगडाची उतरंड रचलेली होती.उतरंडीवरून गेलं की खूप मोठा वळसा वाचत होता. तिकडे तो निघाला. नेहमीसारखा लांब लांब पावलं टाकीत; पण आज त्याचा पाय कोठेतरी लचकला असावा- कारण त्याला लांब पाऊलच टाकता येईना- मग उतरंड कसली चढतो! तो पायवाटेवरून निघाला.

अजूनही ती शांतता भंग पावत नव्हती. मनाला विलक्षण अस्वस्थ करणारी शांतता आणि वाटेवर हे एवढं तण कोठून आलं? वासूकाकांची एवढ्यात बागेत फेरी झाली नव्हती वाटतं. नाहीतर त्यांनी हरबाला जाग्यावरच ठेवला नसता. त्यांना गवताच एक पातं खपत नसे- आणि आता तर सगळीकडं रान माजल्यासारखं झालं होतं...

त्याची वाट चुकली होती की काय! एव्हाना केळीचा मोठा वाफा यायला हवा होता- पण त्याला वाफ्याची ती जागा आठवत होती तिथे तर एक खूप मोठा रिकामा खड्डा होता...वाळक्या पाला पाचोळयाने भरलेला. क्षणभर त्याला काही समजेनाच. तो तसाच पुढे गेला. पुढे विहीर होती.

विहीर? ही? त्याचा आपल्या डोळयांवर विश्वासच बसेना. विहीर तर होती, पण मोरीचे दगड उखडले होते, मोटेच्या धावेवर गुडघा गुडघा गवत वाढलं होतं, पाणी साठायचा हौद नाहीसा झाला होता, पन्हाळीची खूणही नव्हती. डोळयांवर विश्वासच बसत नव्हता. हलके हलके चढत तो विहिरीच्या काठापाशी पोचला. चिरेबंदी दगड निखळले होते, ढासळून पडले होते; एक मोठं झाड वाढून आत वाकून पाहत असल्यासारखं वाटतं होतं. काठावरून वाकून त्याने खाली पाहिलं...

कोठे गेलं ते स्वच्छ पाणी? खाली शेवाळ होतं. भिंतीतून मोठमोठी झुडपं वाढून बाहेर आली होती. त्याच्या शरीराच्या हालचालीने काठचा एक मोठा दगड निखळून एकदम आत पडला...शांततेत तो आवाज किती मोठा वाटला! तोही दचकून मागे सरला. आत पाखरं फडफडत होती. त्याने पुन्हा वाकून खाली पाहिलं...

आता वरचा पाण्याचा काही पृष्ठभाग शेवाळापासून स्वच्छ झाला होता. एखाद्या चिकट पदार्थासारखं पाणी सावकाश हेलकावे खात होतं आणि त्या हलत्या पृष्ठभागावर त्याला एक चेहरा दिसत होता- सुरकतलेला चेहरा, कृश गाल, पांढरे केस...मागे कोण आहे हे पाहण्यासाठी तो गर्रकन मागे वळला; पण विहिरीच्या काठावर तो एकटाच होता. परत जेव्हा त्याने वाकून खाली पाहिलं तेव्हा तो विद्रूप चेहरा गेला होता. पाण्यावर परत एकदा शेवाळ जमलं होतं. काहीच न समजून तो सावकाश माघारी फिरला. मातीच्या उतारावरून खाली आला. हजारदा पायाखालून गेलेल्या वाटेवरून घराकडे निघाला.

तो स्वत:च्याच विचारात इतका गढून गेला होता की आसपास त्याचं लक्षही नव्हतं. ललिता कोणाजवळ बोलली की काय? वास्तविक पाहता ती त्याची मावसबहीण होती; पण ती जर काही बोलली असेल तर घरात अगदी गहजब उडणार यात शंका नव्हती! वय लहान आहे, ते म्हणणार... पण एकोणीस म्हणजे काय लहान वय झालं? ललितासुद्धा अठरा वर्षांची नव्हती का? असेल ती घरची गरीब- पण तो तर या सगळया शेतीमळयाचा, घरादाराचा एकुलता एक वारस होता ना? आणि प्रेम ही किती दिव्य भावना होती! ती

काय असल्या पैशाअडक्यासारख्या, घरदारासारख्या क्षुद्र गोष्टीवर अवलंबून होती का? कधीच नाही!
विचाराच्या तीक्रतेने त्याच्या मुठी आवळल्या गेल्या होत्या. आज मी कोणालाही घाबरणार नाही, तो मनाशी म्हणता होता. आज मी वासूकाकांच्या गरजण्याला दबणार नाही, की आईच्या विनवणीला भीक घालणार नाही. त्याला स्वत:च्या अशा काही भावना होत्या की नाही? आयुष्यापासून काही आनंदाची अपेक्षा करण्याचा हक्क होता की नाही? एवढ्यातच फडक्यांची कोणतीशी कादंबरी त्याने वाचली होती- आशा? उद्धार? जादूगार?...त्याला नाव आठवत नव्हतं; पण त्यातल्या सुंदर भाषेने, आयुष्यावरच्या एका रसिक, आग्रही आसक्तीने त्याचा जीव हुरळून गेला होता. तशी त्याच्या वयाची सर्व पिढीच या कादंबऱ्यांनी वेडी झाली होती म्हणाऱ्या
विचारांच्या गतीबरोबरच शरीराची गतीही वाढली; पण का कोणास ठाऊक; आज त्याला विलक्षण थकल्यासारखं वाटत होतं. पावलात त्राणच नव्हतं. खूप मोठ्या आजारातून उठल्यावर माणसाला असंच वाटत असेल; किंवा आयुष्याच्या अखेरच्या उतरणीवर असलेल्या, थकलेल्या वृद्धांना असंच वाटत असेल, त्याला वाटलं...आणि त्या विचाराने शरीरावर एक शहारता काटा येऊन गेला... आताच्या क्षणी हे वृद्धापकाळाचे अभद्र विचार कशासाठी करावयाचे?

ललिताची सुबक आकृती त्याच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. गोरापान वर्ण, काळेभोर कुरळे केस, चापून चोपून नेसलेली नऊवारी साडी, हातात सोनेरी वर्खाच्या बांगड्या... आज दुपारी ती बागेत आली असती तर त्याने ते कोमल हात हाती घेण्याचाही कदाचित धीर केला असता; अनेक प्रीतीचे शब्द ओठापाशी आले... हरकत नाही ते कोणकोणत्या कादंबरीतून उधार घेतले असले तरी...मनातल्या भावना व्यक्त करायला त्याच्यापाशी अधिक योग्य शब्द होतेच कोठे?
***
लांबवरून फर्रर्रर्र-फट्-फट् असा यंत्राचा आवाज आला. तो क्षणभर होता तिथेच थांबला. आता दुपारच्या वेळी कोणाची बरं मोटार? अहमदची बस अकरालाच गावातून गेली होती. आता तो रात्री साडेआठ-नऊला परत येणार. मग त्याला आठवलं. डॉक्टर गोऱ्ययांचा सर्वात ल हान मुलगा मुंबईहून डिप्लोमा घेऊन आला होता आणि त्याचबरोबर सहाशे का सातशे रुपयांना एक टी फोर्डही घेऊन आला होता. गावच्या एकुलत्या एक धुळीच्या रस्त्यावरून त्याची ती मोटार फर्रर्रर्र करीत (आणि गाई-म्हशी उधळीत ) वेळी अवेळी धावत असायची...तीच आता चालली असेल. त्याला क्षणभर केशवचं हसू आलं. थोडासा हेवाही वाटला- कारण स्वत: वासूकाका या सर्व परक्या गोष्टींविरुद्ध होते. नाहीतर टी फोर्डच काय, डेमलरसुद्धा घ्यायची त्यांची ऐपत होती; पण वासूकाकाचे दैवत लोकमान्य टिळक.
टिळक गेले तेव्हा ती आठनऊ वर्षांचाच असेल; पण घरातले ते सात आठ दिवस त्याच्या स्मरणातून कधी कधीही जाणार नाहीत. वासूकाकांच्या भावना त्यावेळी तर त्याला

उमगल्या नव्हत्याच; आताही त्याला तीच शंका होती. त्यांचा पिंड काही वेगळाच; पण केवळ वल्गना नाहीत. स्वत:च्या श्रद्धांप्रमाणे वागायचा करारीपणा त्यांच्यात होता. त्याला कधीकधी वाटे, त्यांच्या मानाने आपण फारच ठिसूळ आहोत. संकटाची काय, भावनेची काय किंवा वेदनेची काय, कसलीच आंच आपल्याला सोसत नाही. जीव गलबलायला लागतो. इतका हळवेपणा चांगला का? निदान पुरुषात तरी?

सुंदरी गाईचा गोऱ्हा तीन आठवड्यांचा होऊन मेला होता तेव्हा म्हणे त्याला रडून रडून ताप भरला होता असं आई सांगायची. तो लहान होता तेव्हा वासूकाका कधी गावालाही गेले नाहीत. त्याने खंत काढली तर काय याची त्यांना सतत भीती असे. हेही आईनेच त्याला सांगितलं होतं. तो नाही नाही म्हणायचा; पण एवढ्यातच त्याची आजी, वासूकाकांची आई, गेली होती तेव्हा तो किती कावराबावरा झाला होता! वास्तविक पाहता आजी थकली होती. देवापाशी मागणी करीत होती की मला आता सोडव. मुलाचा सोन्याचा संसार भरल्या डोळ्यांनी पाहून ती तृप्त झाली होती. ती गेली ती समाधानाने गेली होती; पण त्याला कितीतरी दिवस अन्न जात नव्हतं! आजीच्या खोलीत गेला तर श्वास घेणंही कठीण जाई. वासूकाका एक-दोनदा रागावलेही होते त्याला याच्याबद्दल - असा तो हळवा!

***

मनाशी आठवणी काढीत तो चालला होता. आज पावलंच चटपट उचलली जात नव्हती आणि नकळत आतल्या मनाला प्रश्न पडत होता- दहा माणसाचं गजबजलेलं घर- एवढं शांत शांत कसं? काहीच आवाज, गडबड, वावराची खूण कशी नाही?

वळणावर आंबा होता. त्या शेजारी चाफा असायला हवा होता; पण तो त्याला चटदिशी दिसेच ना आणि म्हणून गोंधळून तो आतल्या बाजूला पाहू लागला आणि त्याला समोरचा गोठा दिसला; पण गोठा कसला? कुडाच्या भिंती कोसळल्या होत्या, वैरणीचा माळा खाली आला होता. वासे झिंगल्यासारखे वेडेवाकडे कलून उभे होते. गुराढोरांचा पत्ताच नव्हता!

त्याला कशाचा अर्थच समजेना. दोन दुभत्या गायी होत्या, एक कालवड होती. तीन म्हशी होत्या, औताचे दोन बैल होते-ही सगळी जनावरं गेली कोठे? ही अवस्था होईपर्यंत गोठ्याकडे कोणाचंच लक्ष कसं गेलं नाही?

त्याने इकडे तिकडे पाहिलं. घराच्या एखाद्या वेगळ्याच बाजूने तर तो आला नव्हता ना? झाडांच्या बाबतीतही एवढ्यातच त्याची अशीच गल्लत झाली होती- पण ते शक्य नव्हतं. गोठ्याशेजारीच गुरांसाठी पाण्याचा हौद होता. त्या दगडी हौदाचीही पडझड झाली असली तरी तो ओळखू येत होता. काय झालं असावं याचं मनाशी नवल करीत तो पुढे निघाला; पण आता मात्र त्याची पावलं रेंगाळत होती ती त्याच्याच इच्छेने...त्याच्या इच्छेविरुद्ध नव्हे.

***

गोठ्याच्या त्या पडक्या अवशेषाला वळसा घालून तो पुढे आला आणि दगडी पुतळ्यात रूपांतर झाल्यासारखा जमिनीला खिळून उभा राहिला. विस्फारलेले डोळे तसेच राहिले. आश्चऱ्याने तोंडाचा आ झाला होता तोही मिटेना. समोर त्याचं घर होतं खरं- पण कसल्या

अवस्थेत!
अंगणातल्या तुळशी वृंदावनाभोवती ही झुडपं माजली होती. त्यापुढच्या पायऱ्यांचे दगड निखळून गेले होते. सोपा उघडा पडला होता. वरचे नळीचे पत्रे नाहीसे झाले होते. एखाद दुसरा तुटक्या-गंजलेल्या अवस्थेत वरून खाली वेडावाकडा लोंबकळत होता. खाली धूळ होती, वाळकी पानं होती, गवत होतं...ज्या सारवलेल्या सोप्यात एका भिंतीपाशी वासूकाकांची गादी आणि डेस्क असायचं, दुसऱ्या भिंतीपाशी मोठी आडवी घडवंची असायची त्या सोप्याची ही अवस्था झाली होती...पण अशी कशी?
तो एवढ्यातच या पायऱ्या उतरून गेला होता...किती वेळापूर्वी? दोन तासांपूर्वी? तीन? जाऊ द्या...एवढ्यातच गेला होता खरा- तेव्हा हे घर स्वच्छ सुंदर होतं. माणसांच्या हसण्याने, वावराने गजबजलेलं होतं. या सोप्यात भल्या मोठ्या दोरव्यावर वासूकाकांची गादी होती. पानदान पुढे ओढून ते विडा बनवायच्या तयारीत होते... आता ही अवस्था कशी?
मघापासून वाटणारी अस्वस्थता आता मनाभोवती एखाद्या काटेरी कुंपणासारखी दाटून येत होती- किंवा एखाद्या गुरफटून टाकणाऱ्या जाडजाड पाशांच्या जाळयासारखी मनाला जखडत होती.एकाएकी त्याला समोरच्या त्या पडक्या घराची भीती वाटायला लागली - ते त्याचं स्वत:चं घर असूनही! रखडणाऱ्या पावलांनी तो पायऱ्यांपर्यंत पोचला. एक एक पायरी करीत वर पोचला. ती अवस्था जवळून पाहून तर त्याच्या मनाची कालवाकालव व्हायला लागली. आधारासाठी त्याने एका खांबाला हात लावला मात्र...सर्व खांबच गदगदा हलायला लागला. तो दचकून मागे सरला...
आसपास विलक्षण शांतता होती. तोफांच्या गडगडाटापेक्षाही ती शांतता भयानक होती. त्याच्या मस्तकात कोठेतरी मोठी घणघण सुरू झाली होती. समोरचा देखावा हेलकावे खात होता. स्वत:ला कसातरी सावरीत तो सोप्याच्या दारातून मधल्या मोठ्या माजघरात गेला. सोपा पाहून बसलेला धक्का काहीच नव्हता अशी माजघराची स्थिती होती. वरचं छप्पर कोसळलं होतं. भिंती पडल्या होत्या. उभा होता तो एक सांगाडा. ज्या काही भिंती शिल्लक होत्या त्या काळवंडून गेल्या होत्या. खांबांवरही त्याच त्या काळजीचा लेप होता. खालची जमीन उखडली होती. त्यात मोठमोठी बिळं होती. उंदीर?घुशी?
त्याची नजर त्या खोलीवरून फिरत होती; पण मेंदूत त्या दृश्याचा अर्थच शिरत नव्हता. इथे कपड्यांचं कपाट होतं, इथे भाताची कणगी होती, इथे आईचं जातं होतं, इथे कोनाडा होता- त्यात कंदील ठेवलेला असे. इथे तो आजारी असताना त्याची गादी टाकली होती...लहानमोठ्या, क्षुल्लक महत्त्वाच्या, हजारो आठवणी गांधीलमाशांच्या उठलेल्या मोहोळासारख्या त्याच्या मेंदूत भिरभिरत होत्या. या खिडकीशी आई पोथी वाचायला बसायची, या खांबापाशी आजी त्यांना संध्याकाळची गोष्ट सांगत असे... आता काय होतं? खिडकी नाही, खांब नाही...आई नाही, वासूकाका नाहीत... ललिता नाही...ललिता नाही? एखादी धारदार सुरी उरात खुपसावी तसा तो विचार मनात घुसला. त्याच्या घरादाराची ही राखरांगोळी कशी झाली? त्याची सगळी माणसं, सगळी सगळी माणसं... आई,वडील, मित्र, गडी, नोकरचाकर, जिवाभावाची ललिता...सर्वजण गेले तरी कोठे? केवळ त्या

विचारानेच त्याचे पाय लटपटायला लागले होते...
समोरच्या भिंतीत एक भगदाड होतं. एकेकाळचा दरवाजा. त्यातून गेलं की एका हाताला स्वयंपाकघर लागे, दुसऱ्या हाताला देवघर लागे; पण आता त्याची पुढे पाय टाकायची हिंमत होत नव्हती; पण एक वेडी आशा त्याला पुढे पुढे खेचत होती. रखडत्या पावलांनी तो पुढे चालला.
मागची ओसरी पडली होती. त्यामागची लहानशी भिंतही पडली होती. घर आकाशाला आणि निसर्गाला उघडं झालं होतं. दुपारच्या उन्हाचे कवडसे वरच्या मोडक्या छपराच्या जाळीतून खाली पडले होते. तो त्या उन्हात वेड्यासारखा उभा होता. जिथे पूर्वी स्वयंपाकघर होतं त्या जागेकडे पाहत होता. तिथे काहीच नव्हतं. ज्या कोणत्या भीषण हलकल्लोळात ही वास्तू सापडली होती त्यात स्वयंपाकघराचा तर संपूर्ण बळी गेला होता. तो देवघराकडे वळला.
देव! कसले देव! तेही या अग्निप्रलयातून वाचले नव्हते. तेथे आता नुसता अंधारच दिसत होता. बाहेरच्या प्रकाशाने दिपलेल्या त्याच्या डोळयांना आतलं काही दिसतच नव्हतं. तो सावकाश आत गेला. आत कांचेसारखं काहीतरी चमकलं. तो आणखी पुढे गेला. एकेकाळी समोर मोठा देव्हारा होता. भिंतींना रविवर्म्याची शिळाप्रेसची देवादिकांची मोठमोठी चित्रं होती. त्यांच्या फ्रेमा आणि काचा आता खाली इतस्तत: पडल्या होत्या...
तो आणखी पुढे गेला. भिंतीला उभ्या ठेवलेल्या काचेत त्याला काहीतरी हलताना दिसत होतं. पुढे जाऊन जरा वाकून पाहताच त्याला तो चेहरा दिसला. मघाशी विहिरीच्या पाण्यात क्षणभर दिसलेला...पांढरे केस,सुरकतलेला चेहरा, विस्फारलेले डोळे...
उराशी इतका वेळ दाटून आलेली भीती आता ऊर फोडून एका किंचाळीने बाहेर पडली. स्वत:भोवती गिरक्या घेत आवळून आलेलं विचारांचं वेटोळं तुटलेल्या स्प्रिंगसारखं ताडदिशी उलगडलं. भय, वियोग, विफलता, संताप यांचा इतका वेळ मूक आक्रोश चालला होता. त्याला आता वाचा फुटली!
त्याने आपलं मस्तक दोन्ही हातांनी गच्च आवळून धरलं होतं. तो त्या भग्न वास्तूतून अडखळत्या पावलांवर पळत बाहेर येत होता आणि त्याच्या तोंडून एकामागून एक किंकाळ्या बाहेर पडत होत्या. वाटेत कशाला तरी त्याचा पाय अडखळला आणि तो खाली कोसळला. एकदाच एक विव्हळल्यासारखा आवाज त्याच्या तोंडून निघाला. मग तो निश्चल झाला.
***
त्याचं ओरडणं ऐकून दोन माणसं घाईघाईने त्या पडक्या वाड्याकडे यायला निघालीच होती. सोप्याच्या पायरीपाशीच त्यांना त्याची वेडीवाकडी आकृती दिसली. ते दोघं त्याच्यापाशी थांबले आणि वाकून त्याच्या छातीला हात लावून पाहू लागले. त्यांच्यातला एक वयोवृद्ध होता- साठी उलटलेला आणि दुसरा पस्तिशीच्या आसपासचा होता. त्या तरुण माणसाच्या चेहऱ्यावर त्रास, संताप, चिडकेपणाचा भाव दिसत होता; पण त्या वृद्धाच्या चेहऱ्यावर मात्र दु:ख आणि त्याबरोबरच एक विलक्षण अनुकंपा होती. त्याच्या नकळत त्याच्या तोंडून च् ! च् ! असा आवाज निघाला.

''काय चुकचुक करताय दत्तूकाका!'' तो तरुण त्रासिक आवाजात म्हणाला.
''अरे अविनाश, काय याची गत झालीय पाहा तरी जरा!''
''काही पाहायला नको! जरा दुपारचं पडावं तर हा आरडाओरडा! ही धावाधाव! तुम्हाला तरी बरी हौस नसती त्रांगडी गळयात घ्यायची!''
''अरे माझा बालपणापासूनचा मित्र हा! त्याला काय असा रस्त्यावर सोडू? का मरायला इस्पितळात पाठवू?'' तो वृद्ध खाली पडलेल्या आकृतीकडे वळला. आणि अविनाश, असा नेहमी नाही रे करीत! एखाद्याच वेळी असा झटका येतो त्याला - आणि मग ही धावपळ- आता आठदहा दिवस कण्हतकुथत बसेल...
खाली पडलेली आकृती आता जराशी हालचाल करायला लागली होती.
कृष्णा! ए बाळकृष्णा! आलास का रे शुद्धीवर? दत्तूकाका खाली वाकून विचारत होते. खाली पडलेल्या माणसाचे डोळे सावकाश उघडले.
***
मधली काही मिनिटं त्याच्या स्मरणातून गेली होती. आता एकदम त्याला समोर तो अनोळखी चेहरा दिसत होता; पण अनोळखी तरी कसा म्हणावा? ते उभट नाक, ते जवळ जवळ वाटणारे डोळे, ती रुंद जिवणी असाच चेहरा फार फार पूर्वी त्याला दिसला होता का?
''कृष्णा, अरे मी दत्तू! ओळखलंस की नाहीस मला?''
दत्तू! दत्तू! त्याचा बालमित्र! त्याच्याबरोबर नदीवर येणारा, त्याच्याबरोबर डोंगरदऱ्यातून येणारा... पण हा म्हातारा दिसतो...दत्तू तर तरणाबांड होता. हनुवटीवर नुकतीच लव यायला लागली होती त्याच्या...
''कृष्णा, अरे अजून भूतकाळातच का वावरतो आहेस? जरा शुद्धीवर ये!''
''पण-पण-दत्तू-'' त्याचा घोगरा आवाज मोठ्या कष्टाने घशातून निघत होता. जणू जिभेला अनेक दिवसांत शब्दांची सवयच नव्हती. आवाजही गंजल्यासारखा झाला होता.
हो-दत्तू! दत्तू म्हणणारा तूच एक राहिला आहेस बाबा आता!
पण-पण-दत्तू- त्या घराचं- कृष्णाने एक थरथरता हात त्या पडक्या घराच्या दिशेने हलवला.
''किती वेळा सांगू बाबा तुला! दत्तूकाका म्हणाला, अरे! तुझा हात पाहा- अंग पाहा- कपडे पाहा- तू आता वीस वर्षांचा नाहीस- तू आता साठी गाठली आहेस--''
काहीच न कळल्यासारखा कृष्णा चेहरा हलवीत होता.
पण-पण-काका?...आई?...ललिता?...
एक आवंढा गिळून दत्तूकाका बोलू लागला. ''अरे कृष्णा, त्यांना आता विसर रे! त्यांची राख झाली, हाडांची माती झाली त्यांच्या! तुला कसं सांगू रे...हजारदा सांगितलं असेल-- पण पटतच नाही तुला...''
काका-आई-ललिता - पडक्या घराकडे पाहात कृष्णा स्वत:शी तीच नावं पुन्हा पुन्हा उच्चारीत होता. घटकेपूर्वी त्याच्याशी बोलणारी, त्याच्याशी थट्टा- विनोद करणारी ही प्रिय माणसं गेली? कोठे गेली? कशी गेली?

अरे तू बागेत गेला होतास नि इकडे घराला आग लागली- मी घरी होतो, हरबा गावाकडे गेला होता- घरात फक्त काका, काकू, ललिताच होते...काही काही करता आलं नाही रे! आपण किती धावपळ केली आठवत नाही का तुला? तू तर एखाद्या राक्षसारसारखा त्या आगीशी झुंज देत होतास...जिवाची पर्वा केली नाहीस...माझ्या घरी पडून होतास दोन महिने, आठवतं? शरीरावर भाजून नुसत्या लाह्या फुटल्या होत्या, आठवतं? त्यानंतर त्यातूनही तू उठलास खरा- पण मन गमावून उठलास रे! त्यापेक्षा गेला असतास तरी बरं झालं असतं- दत्तूकाकांचा आवाज घोगरा झाला होता. शेजारच्या अविनाशकडे त्यांचं लक्षही नव्हतं ते कृष्णाला हात देऊन सावकाश उठवत होते.

“तू त्या दिवसापलीकडे गेलाच नाहीस रे कृष्णा! एवढ्या मोठ्या इस्टेटीचा तू एकुलता एक मालक- पण तुला कशाकशाचं भानच नाही रे! कशा कशाने म्हणून तुझ्या डोक्यातली ती कल्पना जातच नाही रे! घराचा कोळसा झाला. बागेचं रान झालं, अंगणाचं स्मशान झालं- पण तू आपला तुझ्या त्याऽ वेडातच वावरत असतोस-”

“जरा बरं वाटलं की त्या बागेत जातोस - आणि मग हे असं मोडकं-तोडकं, जळकं घर नजरेसमोर आलं की घाबरतोस, किंचाळतोस- तुझी आई, तुझे वडील, तुझी प्रेयसी- सर्व सर्व गेले...किती वेळा या यातना भोगशील? मलाच बघवत नाही रे कृष्णा!”

त्याचा हात धरून दत्तूकाका त्याला आपल्या घराकडे नेत होते.

त्या दोन थकलेल्या बालमित्रांकडे नवलाने पाहत तरुण अविनाश त्यांच्यामागून सावकाश चालला होता.

□□